# इस्लामसंबंधी एक आधुनिक दृष्टिकोण

# A Modern approach to Islam

आसफ ए. ए. फैझी
भाषान्तर: भास्कर लक्ष्मण भोळे

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

# इस्लामसंबंधी एक आधुनिक दृष्टिकोण

लेखक

आसफ ए. ए. फैझी

भाषान्तर

डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई : ४०० ०३२

" अ मॉडर्न अॅप्रोच टू इस्लाम "
या पुस्तकाचे भाषान्तर

प्रथम आवृत्ती : नोव्हेंबर, १९९१

प्रकाशक
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई : ४०० ०३२

मूळ ग्रंथाचे प्रकाशक
आशिया पब्लिशिंग हाऊस
मुंबई, कलकत्ता, नवी दिल्ली, मद्रास, लखनौ, लंडन, न्यूयॉर्क

© १९९१, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

मुद्रक
समाज मुद्रणालय
सिटी पोस्टासमोर, शनिवार पेठ, कोल्हापूर : ४१६ ००२

मूल्य : रुपये
रु. १० फक्त

## प्रस्तावना

इस्लामसारख्या एकेश्वरवादी आणि एकच धर्मग्रंथ प्रमाण मानणाऱ्या धर्माची शिकवण तसेच ऐहिक व पारलौकिक जीवनासंबंधीची या धर्माची तात्त्विक भूमिका यांचा सूक्ष्म अभ्यास करणाऱ्या विद्वानांमध्ये असफ ए. ए. फैजी यांना मानाचे स्थान दिले जाते. त्यांच्या " अ मॉडर्न अॅप्रोच टू इस्लाम " या इंग्रजी ग्रंथात त्यांनी १९५३ ते १९६२ या काळात प्रकाशित केलेले चार निबंध त्यात आवश्यक तेथे सुधारणा करुन समाविष्ट केले होते. कुराण या धर्मग्रंथाचा मध्यवर्ती संदेश हा या ग्रंथातील भाषेपेक्षा जास्त काळ टिकणारा आहे अशी फैजींची धारणा होती. इस्लामी कायद्यास इस्लाम धर्मापासून अलग करुन ते त्याचा विचार करीत असत. इस्लामी कायद्याचे फैजी हे एक नामवंत भाष्यकार होते. विसाव्या शतकातील परिस्थितीचे अवधान ठेवून त्यांनी इस्लामची आधुनिक दृष्टि-कोनातून चिकित्सा करण्याचा नेहमीच प्रयत्न केला. तो कडव्या सनातन्यांना रुचण्यासारखा नव्हता. तरीही त्यांनी ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब करुन आणि आधुनिक विज्ञानाने सिद्ध केलेल्या घटितांचे भान ठेवून भारतीय मुसलमानांच्या दृष्टिकोणातून इस्लामची समीक्षा केली.

त्यांच्या या छोट्या पण महत्त्वाच्या ग्रंथाचे भाषांतर करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने डॉ. भास्कर भोळे यांच्यासारख्या राज्यशास्त्राच्या ख्यातनाम अभ्यासकांवर सोपवली होती. त्यांनी भाषांतर करताना मूळ इंग्रजी ग्रंथातील टिपांमध्ये राहून गेलेल्या संदर्भांच्या चुका दुरुस्त केल्या आहेत आणि डॉ. मौलवी हकीम सूफी मार मोहम्मद याकूब खान यांनी केलेल्या कुराणाच्या मराठी भाषांतरातून अवतरणे घेतली आहेत. डॉ भोळे यांनी " इस्लामसंबंधी एक आधुनिक दृष्टिकोन " या नावाने केलेले फैजींच्या मूळ इंग्रजी ग्रंथाचे भाषांतर वाचकांना उपयुक्त वाटल्याशिवाय राहाणार नाही.

**य. दि. फडके**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

## प्रास्ताविक

विषयाच्या विशेषज्ञापेक्षा सर्वसामान्य वाचकासाठी इथे संकलित केलेले चार निबंध गेल्या दशकात निरनिराळ्या वेळी लिहिले गेले. तरीपण एकाच मध्यवर्ती विषयसूत्राची प्रेरणा त्या सर्वांच्या मुळाशी आहे. ते विषयसूत्र असे की, वर्तमान स्वरुपातील इस्लामी मत-प्रणालीचे पुनरर्थबोधन करण्याची नितांत आवश्यकता आहे. का ? कोणते ? कसे ? हे प्रश्न अनुत्तरित आहेत. ऐतिहासिक व तुलनात्मक तत्वांच्या आधारे इस्लामचे पुनरर्थबोधन या विषयावरील पुरेशा समावेशक प्रबंधामधून पुढे कधी तरी या प्रश्नांना उत्तरे देण्याची विनम्र आशा मी बाळगून आहे.

तूर्त तो विचार संक्षिप्त स्वरुपात, आणि कदाचित्. खात्री पटविण्याच्या बाबतीत असफलरीत्या, या छोटयाशा पुस्तकातून मांडलेला आहे. मला अशी आशा मात्र वाटते की ज्यांना कुणाला या अरबी धर्माच्या वर्तमान अवस्थेची जाणीव असेल ते एकतर स्वतःला त्याच्या चौकटीत कोंबून बसवण्याचा किंवा विसाव्या – म्हणजे इस्लामच्या स्थापनेपासून चौदाव्या – शतकातील जीवनाच्या गरजांच्या चौकटीत त्याला बसवण्याचा गंभीरपणे विचार करू लागतील. तिसरा एकच पर्याय आहे, आणि तो म्हणजे त्याला पूर्णपणे मूठमाती देण्याचा. मी स्वतः या भूमिकेच्या संपूर्ण विरुद्ध आहे, कारण माझा असा ठाम विश्वास आहे की इस्लामचा योग्य अर्थ काढला तर आजच्या जगातील मानवी चित्शक्तीला देण्यासारखे त्याच्याजवळ खूपसे आहे.

पहिल्या निबंधात मौलाना अबुल कलाम आजाद ह्यांची इस्लामच्या संकल्पनेची रुपरेषा दिली आहे. सर्व धर्म आणि सर्व धर्मांचे आचार्य हे सारख्याच आदरास पात्र आहेत, अशा निष्कर्षाप्रत येणारा आधुनिक व उदारमतवादी अन्वयार्थ आजादांनी इस्लामचा लावला आहे. दुसऱ्या निबंधात धर्म आणि कायदा यांच्या व्याख्या करुन इस्लामच्या चौकटीतच त्यांना परस्परांपासून वेगळे करण्याचा प्रयत्न आहे. इस्लामी विचारवंतांनी इस्लामी कायदा व ईश्वरशास्त्र यांच्या क्षेत्रात केलेल्या कार्याचे संक्षिप्त विवरण तिसऱ्या निबंधात आहे आणि शेवटच्या, चौथ्या निबंधात ऐतिहासिक, शास्त्रीय व तुलनात्मक तत्वांवर आधारलेले इस्लामवरचे ताजे भाष्य पुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

हे सर्व निबंध पूर्वप्रकाशित आहेत. इथे त्यांना संकलित व पुनर्मुद्रित करताना बरेच संस्करण व फेरबदल केले आहेत. टोरॉन्टो युनिव्हर्सिटी क्वार्टर्ली, जर्नल ऑफ द एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बे आणि मिड्ल ईस्ट जर्नल, वॉशिंग्टन, डी. सी. यांनी या पुनर्मुद्रणास संमती दिल्याबद्दल त्यांचे आभार मानायला हवेत.

२९ मे, १९६२ : मुंबई

**आसफ ए. ए. फैज़ी**

अनुक्रमणिका

प्रस्तावना

प्रास्ताविक

प्रकरण पहिले इस्लामचे सार / १

प्रकरण दुसरे इस्लाममध्ये कायदा आणि धर्म / ३१

प्रकरण तिसरे भारतात इस्लामी कायदा आणि ईश्वरशास्त्र / ६६

प्रकरण चौथे इस्लामचे पुनरर्थबोधन / ९२

बनाम खुदा व खिरद
बयाद
अबुल कलाम अहमद
उर्फ मौलाना आजाद

मेरे दिलका कोअी यकीन अैसा नही है जिसमे शक के सारे कांटे न चुभ चुके हो और मेरी रूह का कोअी एतकाद ऐसा नहीं है जो इन्कार की सारी आजमाइशो मेंसे न गुजर चुका हो । मैं ने जहर के घूंट भी हर जाम के पिये हैं। और तिर्याक के नुस्खे भी हर दावश शफा के आजमाये है । जब मैं प्यासा था तो मेरी लब् तिश्नगियां दूसरों की तरह न थीं, और जब मैं सैराब हुआ तो मेरी सैराबी का सरचष्मा भी शाहराहे आम पर न था :

राही कि खिजर दाश्त ज सरचष्मा दूर बूद,
लब् तिश्नगी ज राहे दिगर बुरदह एम मा !

तरजुमान कुरआन जीम, अलिफ्, साद 76 (मुकद्दमा)

एकमेव चिरंतन आहे,
अनेक बदलतात आणि नाश पावतात.

...... अॅरिस्टॉटल

सर्व प्रकारची वास्तविकता विलक्षण आकर्षक असते; जीवनाशी एकरुप झालेली नैतिकताच आपल्याला तारुण्यातील निष्कपटी अवास्तवतेपासून दूर ठेवीत असते.

,..... थॉमस मॅन

**'ए स्केच ऑफ माय लाइफ,'** मधून

सत्यमय असलेला इमाम जाफर बिन मुहम्मद म्हणाला :
परमेश्वरी मुखातील शब्द आणि
दृढविश्वास आणि
धर्माज्ञांचे पालन
म्हणजेच धर्मश्रद्धा

...... काजी अन्–नूमान बिन मुहम्मद,

**'दआइमुल–इस्लाम,'** मधून

माणूस कसा असावा आणि त्याने कशाची कास धरावी याचे अध्ययन हे सर्व अध्ययनात उदात्ततम अध्ययन आहे.

....... प्लेटो

**'गोर्जियास,'** मधून

प्रकरण पहिले

# इस्लामचे सार

मतविषयक वाद, इतिहास, कायदा, वाङ्मयीन प्रवृत्ती व तत्त्वज्ञानात्मक संकल्पना ह्यांच्या अभ्यासाच्या गदारोळात धर्माची मूळ शिकवणूक पुष्कळदा अंधुक होत जाते. 'इस्लामची भूमिका कोणती ?' हा प्रश्न मधून मधून विचारणे आवश्यक होऊन बसते. कोणत्या काळात हा प्रश्न विचारला जातो, कोणत्या देशात त्याचे उत्तर मिळते आणि कोणती व्यक्ती ते देते यावर त्या प्रश्नाचे उत्तर अवलंबून असते.

भारतात अनेक लेखकांनी या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. अलीकडच्या काळातील काही ठळक उदाहरणे सांगायची झाल्यास अमीर अली व इकबाल यांची सांगता येतील. अमीर अली यांचा '**स्पिरिट ऑफ इस्लाम**' हा एक अभिजात ग्रंथ मानला जातो. त्याचे प्रथम प्रकाशन लंडन येथे १९२२ साली झाले. पुढे त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. इकबाल यांचा '**रीकन्स्ट्रक्शन ऑफ रिलिजस थॉट इन इस्लाम**' नामक ग्रंथ प्रथम १९६० साली लाहोर येथे प्रकाशित झाला, त्याचेही पुढे फेरप्रकाशन झाले.

स्थूल मानाने हे दोन लेखक दोन भिन्न मतप्रवाहांचे प्रतिनिधित्व करतात. अमीर अलींनी प्रेषित महंमदाच्या जीवनाचे आस्थापूर्वक गुणग्रहण केले आहे. एक माणूस या नात्याने प्रेषिताची थोरवी सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. आपल्या काळातील अरबस्तानातल्या दुष्ट प्रवृत्ती नाहीशा करण्याचा प्रेषिताने कसा प्रयत्न केला हेही त्यांनी सांगितले आहे. इस्लामच्या प्रवर्तनानंतर त्यात निर्माण झालेल्या उणिवांच्या कारणांचे स्पष्ट वर्गीकरण अमीर अलींनी केलेले दिसत नाही. महंमदाने सांगितलेली खरीखुरी तत्त्वे. आपण जर आचरणात आणली तर सर्व आधुनिक प्रश्न आपण सोडवू शकू असे सांगणाऱ्या समर्थकाचीच त्यांची भूमिका आहे.

उलट इकबाल हे आधुनिक तत्त्वज्ञानात – विशेषतः गूढवादात – खोल अवगाहन केले होते. त्यांनी क्रियाशील इस्लामबद्दलचा निश्चित दृष्टिकोण मांडला. सूफी पंथाच्या शांतिवादापेक्षा हा अगदीच निराळा असा दृष्टिकोण होता. **इज्माच्या** ( स्थूल मतैक्य )

प्राचीन तत्त्वाशी संबधित व कायदे करण्यासंबंधीच्या आधुनिक संकल्पनेशी सुसंगत अशा सुधारणा पद्धतीचा त्यांनी इस्लामसाठी पुरस्कार केला. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांत इकबाल यांचा मोठा अनुयायी वर्ग आहे. याचे मुख्य कारण हे की, ते एक महान कवी होते, आणि त्यांची बरीचशी तत्त्वे उर्दू व फारसी भाषांमधील लक्षणीय काव्यरचनांमधून थोडक्यात पण स्पष्टपणे अभिव्यक्त झालेली आढळतात.

या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे प्रयत्न अनेक मार्गांनी केले जाऊ शकतात. एक आहे ऐतिहासिक पद्धतीचा मार्ग. ऐतिहासिक दृष्टीने इस्लामचा विचार करून काही निश्चित निष्कर्ष हाती लागू शकतील अशा रीतीने त्याच्या प्रवृत्तींचे विश्लेषण करता येईल. दुसरी पद्धत म्हणजे धर्मतत्त्वांचा अभ्यास करणे. कुराण आणि पवित्र कायदा ( शरीअ ) यांची मुख्य शिकवण तपासून त्यांच्यामधून लेखकाला मूलभूत वाटणारी तत्त्वे निवडून काढणे. इतरही काही पद्धती संभवतात. उदा० वैधानिक किंवा तत्त्वज्ञानात्मक. पण त्यात इथे शिरण्याची गरज नाही.

प्रस्तुत निबंधात अबुल कलाम आजाद या आधुनिक भारतीय ग्रंथकाराच्या लिखाणाचे परीक्षण करून त्यांची शिकवण थोडक्यात देण्याचे योजिले आहे. मौ. आजाद ( १८८८–१९५८ ) हे आधुनिक भारताच्या अत्यंत थोर मुस्लिम नेत्यांपैकी एक होते. एक लेखक, विचारवंत व राजकारणी म्हणून परिचित असलेले मौ. आजाद हे इस्लामचे व्यासंगी विद्वान होते. गेल्या दोनशे वर्षांत त्यांच्याएवढा या विषयाचा व्यासंगी अभ्यासक-विचारवंत या देशात दुसरा कोणी झाला नाही. **तर्जुमानुल कुर्आन**–कुराणाचा अनुवाद–हा त्यांचा मुख्य ग्रंथ आहे त्यात अनुवादाच्या जोडीलाच त्यांनी उर्दूतून संक्षिप्त भाष्यही दिलेले आहे. दुर्दैवाने त्यांचे हे काम अपूर्ण राहिले आहे. या ग्रंथाच्या दोन खंडांमध्ये कुराणाचे तेवीस अध्याय सामावलेले आहेत. म्हणजे या पवित्र ग्रंथाच्या एकूण विस्तारा–पैकी निम्म्यापेक्षा थोडयाशा जास्त भागाचाच अनुवाद या ग्रंथात आलेला आहे. पहिला खंड अधिक महत्त्वाचा आहे. कारण त्यात **अम्मुल कुर्आन** ( कुराणाची जननी ) म्हणजे कुराणाच्या पहिल्या '**सुरतुल् फातेहा**' नामक प्रकरणावरचे तपशीलवार व सविस्तर भाष्य आहे. सुमारे दोनशे पृष्ठांच्या या भागात इस्लामी धर्माच्या सारभूत तत्त्वांचे निरूपण करण्यात आलेले आहे.

या निबंधात त्यांच्या शिकवणुकीचा आराखडा देण्यामागे पुढील कारणे आहेत : पहिले, कोणत्याही दृष्टीने पाहता मौ. आजाद हे सखोल विचारवंत, गाढे पंडित व उर्दू वाङ्मयातील एका नव्या शैलीचे निर्माते आहेत. दुसरे, सर्व थोर धर्मांतील सत्य मान्य करून त्यावर भर देणारे ते संग्राहक ( इक्लेक्टिक् ) वृत्तीचे आहेत. तिसरे, वंश–जात–पंथ वा प्रदेश या कोणत्याही आधारावरील भेदभावाचे ते विरोधक आहेत. चवथे, आधुनिक

विचार आणि तौलनिक धर्म या विषयांशी त्यांचा घनिष्ठ परिचय होता. पाचवे, महात्मा गांधींच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर खूपच प्रभाव पडलेला होता. आणि शेवटचे कारण असे की, पाकिस्तानच्या निर्मितीला व ' दोन संस्कृतींच्या सिद्धांता 'ला त्यांचा कसून विरोध होता. त्यांचे संपूर्ण लिखाण उर्दू भाषेत असल्यामुळे युरोपीय अभ्यासकांना त्याचा फारसा परिचय नाही. म्हणून पाश्चात्य जगासमोर मौ. आजादांची शिकवण सुगम आणि पद्धतशीर स्वरूपात ठेवणे मला अत्यंत इष्ट वाटते. [१]

सूरतुल् फातेहावर भाष्य करीत असताना मौ. आजादांनी इस्लामच्या तत्त्वज्ञानाच्या सारभूत अंगांचा तपशील दिला आहे. तुलनात्मक धर्माच्या विद्यार्थ्यांना सुपरिचित असलेल्या एका सत्याचे त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले आहे. ते सत्य असे की, एकेश्वरनिष्ठा हा इस्लामचा पायाभूत आधार आहे. त्यानंतर ईश्वराच्या तीन गुणविशेषांची त्यांनी चर्चा केली आहे. ते असे : रबूबिय्य ( पालकत्व ), रहमा (करुणा) आणि अदाला ( न्यायीपणा ). या संपूर्ण चर्चेत त्यांचा भर पुढील तीन तत्त्वांवर दिसून येतो :

अ) सर्व धर्म आपापल्या क्षेत्रात संपूर्णतः सत्य असतात;

ब) ईश्वराने पाठवलेले सर्व प्रेषित सच्चे प्रेषित आहेत, आणि

क) आधीच्या धर्मांनी व प्रेषितांनी शिकवलेल्या सत्य श्रद्धेला अधिक दृढ करणे एवढेच इस्लामचे कार्य आहे.

कुराणाच्या पहिल्या अध्यायाचे बायबलमधील प्रभुप्रार्थनेशी ( लॉर्डस् प्रेयरशी ) वारंवार साम्य दाखविले जाते. या पवित्र ग्रंथाच्या इतर सूऱ्यापेक्षा ( अध्यायांपेक्षा ) त्याचेच पठण अधिक होत असते. कुराणाच्या शिकवणुकीचे सार त्यात आले असल्याचे नेहमी मानले जाते. ' फातेह खेरीज प्रार्थना होऊच शकत नाही, ' असे परंपरेने मानले जाते. ' ग्रंथाचा प्रारंभ ', ' ग्रंथाची जननी ', ' खजिना ', ' पाया ' वगैरे अभिधाने या अध्यायांस दिलेली आढळतात. खुद्द कुराणातच त्याचा उल्लेख सब मसानी किंवा ' पुनः पुन्हा उच्चारित होणारे सप्तक ' ( कुराण–१५.८७ ) असा करण्यात आला आहे. कुराणप्रणित ईश्वरकल्पना आणि माणसाने त्या ईश्वराची पूजा कशी करावी याबद्दलची शिकवण या अध्यायात आहे. संदर्भाच्या सोयीसाठी पिक्थॉलने केलेल्या भाषांतरापासूनच आरंभ करू : [२]

परम दयाळू ( आणि ) कृपाळू परमेश्वराच्या नांवानें ( मी आरंभ करितों )

१. सर्व स्तुति, सकल जगाचा पालनकर्ता असा जो परमेश्वर त्यालाच ( योग्य ) होय.

२. ( तो ) परमदयाळू ( आणि ) कृपाळू ( आहे ).

३. ( तो ) ( शेवटच्या ) निर्णयाच्या दिवसाचा धनी ( आहे. )

४. ( हे परमेश्वरा ) तुझीच आम्ही भक्ति करीत आहों; व तुझीच आम्ही मदत मागत आहों.

५. तूं आम्हांस सरळ मार्ग दाखीव.

६. ( म्हणजे ) ज्या ( लोकां )वर त्वां कृपा केली आहेस त्यांचा मार्ग ( दाखीव ).

७. पण ज्यांच्यावर ( तुझा ) कोप झाला आहे त्यांचा ( मार्ग ) नको आणि आडमार्गी भटकणारांचाही नको.

( कुराण– १, १–७ )

या प्रार्थनेचा खरा अर्थ समजण्याच्या दृष्टीने मौ. आजादांनी धर्माची चार मुख्य उद्दिष्टे स्पष्ट केली आहेत. ( तर्जुमा खंड १. २७ ) ती अशी :

१. ईश्वराच्या गुणविशेषांचे यथार्थ आकलन असणे;

२. न्याय्य फलनिष्पत्तीच्या सिद्धान्तावर विश्वास असणे, म्हणजे असे की सत्कर्माचीउत्तम फळे आणि दुष्कृत्यांच्या परिणामी योग्य ते प्रायश्चित नक्कीच मिळणार अशी श्रद्धा असणे;

३. मरणोत्तर जीवनावर व ईश्वरी न्यायावर विश्वास असणे.

४. सचोटी अथवा सदाचार यांचा मार्ग समजावून घेऊन त्या मार्गाने जाणे.

वरील गोष्टी ध्यानात ठेवून पहिला जो शब्द आपणास समजून घ्यायचा आहे तो म्हणजे ' स्तुती ' किंवा ' पूज्यभाव ' ( हम्द ). कारण वरील प्रार्थनेतील तो पहिला शब्द आहे. विश्वाचा रचयिता म्हणून ईश्वराचा शोध जेव्हा मानवी मन घेऊ लागते तेव्हा प्रथम आश्चर्याची व नंतर गूढतेची भावना निर्माण होते आणि त्यातूनच पूज्यभाव उदयास येतो. आश्चर्य आणि गूढता आणि प्रेम या भावनांनी मानवी मनाचे उन्नयन झाले पाहिजे. भय, दहशत आणि शिक्षेसंबंधीचे विचार ह्यांनी ते भारून जाता कामा नये. इस्लामने प्रतिपादलेला ईश्वर शक्तिमान व सूडबुद्धी असलेला नसून दयाळू व न्यायी असा आहे.

ईश्वराचा पहिला गुणविशेष आहे रूबूबिय्य ' पोषकत्व ' (किंवा पालकत्व); कारण तो सकल जगाचा म्हणजेच त्याने निर्माण केलेल्या विश्वाचा ' स्वामी ' आणि ' नियंता '

आहे. रूबूबिय्य हे भाववाचक नाम आहे. रब्ब हा 'स्वामी', 'नियंता', 'पोषणकर्ता' या अर्थांनी नेहमी वापरण्यात येणारा सेमेटिक शब्द आहे. अरबी कोशकर्त्यांच्या मते रूबूबिय्य म्हणजे 'एखाद्या वस्तूचे, ती पूर्णत्वास व परिपूर्णतेस पोचेपर्यंत, तिच्या बदलत्या गरजा व स्थिती ह्यांना अनुसरून पायरीपायरीने, पालनपोषण करणे.' अशा प्रकारे ईश्वराच्या अंगी केवळ निर्मात्याचाच गुणविशेष नाही तर तो पोषक व पालकही आहे. सजीवप्राणी आपल्या पूर्ण अवस्थेप्रत जाईपर्यंत तो त्याचा विकास करतो. जेव्हा मूल जन्माला येते तेव्हा ते मासाचा लोळागोळा असते. माता त्याचे आरंभी स्वतःच्या दुधावर व नंतर क्रमशः नाना प्रकारच्या अन्नपदार्थांवर पोषण करते. व त्याला स्वास्थ्य व शक्ती येईपर्यंत वाढवते. ही रूबूबिय्यची भावना मातेच्या ठिकाणी ईश्वरानेच निर्माण केलेली आहे. बालकाच्या बाबतीत जे घडते तेच सर्व वस्तुजाताबाबतही घडते, आणि त्यात एक निश्चित योजना आहे. ही वाढीची व विकासाची प्रक्रिया योगायोगात्मक नाही.

न्याय्य प्रमाणांच्या सिद्धांतानुसार पोषण आणि निर्वाह घडत असतो. ईश्वराचा प्रत्येक अनुग्रह हा न्याय्य परिमाणातच होत असतो. कुराण म्हणते :

> आणि जितक्या म्हणून वस्तू होत, आम्हांपाशी त्या सर्वांची ( भंडारेंची ) भंडारे ( भरपूर पडलीं ) आहेत.
>
> आणि आम्ही एका नियमित अंदाजाने ( सृष्टीच्या उपयोगासाठी ) त्या पाठवीत असतों.
>
> ( १५, २१ )

> आणि त्याच्यापाशी दरेक गोष्टीचा अंदाज मक्रर होय.
>
> ( १३, ८ )

> आम्हीं सर्व वस्तूंस एका अंदाजाप्रमाणें पैदा केले आहे.
>
> ( ५४, ९-४९ )

पालनपोषणाच्या या प्रक्रियेत प्रमाणाच्या व न्याय्य परिमाणाच्या सिद्धांताच्या जोडीलाच एक आंतर आशयही आहे त्याला मौ आजाद 'आंतर मार्गदर्शन' असे नाव देतात. ही आंतरिक बाजू बहिर्गत किंवा केवळ भौतिक बाजूपेक्षाही अधिक महत्त्वाची आहे. ईश्वरी मार्गदर्शन स्पष्ट करण्यासाठी आणखी दोन कल्पना स्पष्ट करणे आवश्यक आहे. त्या आहेत तकदीर ( नियती किंवा प्राक्तन ) आणि हिदाय ( मार्गदर्शन ). कुराण म्हणते :

त्यानेंच प्रत्येक वस्तु निर्माण केली व मग हरेक बस्तूसाठी एक ( योग्य ) अंदाजा ठरवून दिला.

( २५, २ )

**तकदीर** म्हणजे कोणत्याही गोष्टीचे यथार्थ मूल्यमापन करून तिच्या अस्तित्वासाठी विशिष्ट स्थिती वा अवस्था ठरवून देणे. त्या निर्दिष्ट स्थितीच्या कक्षा ओलांडणे कोणत्याच वस्तूला शक्य नसते. आपली कक्षा सोडून ग्रहांना बाहेर पडता येत नाही; स्वस्थान सोडून समुद्राला जाता येत नाही; पक्षी पाण्यात आणि मासे जमिनीवर जगू शकत नाहीत; उष्ण कटिबंधातील वनस्पतींची लागवड ध्रूव प्रदेशात केली जाऊ शकत नाही आणि ध्रूवप्रदेशीय अस्वल विषुववृत्ताच्या जवळ जिवंत राहू शकत नाही. सूज्ञ व परोपकारी निर्मात्याने आज्ञापिलेली ही नियती आहे. जशी प्रत्येक जीवाची आपापल्या पर्यावरणातील जीवनासाठी तयारी केली आहे, तद्वतच प्रत्येक पर्यावरणाचीसुद्धा अशी काही रचना केली आहे की त्याची उत्पादने व त्याचे परिणाम निश्चित नियमांनुसारच घडतील. त्यामुळे पर्यावरण व तदंतर्गत जीवमात्र यांच्यात स्थिर स्वरूपाची तडजोड कायम राहून जीवन धोक्यात येत नाही. [3]

विधिलिखितासंबंधी इस्लामची कल्पना अशी मूल्यांकनाच्या कल्पनेशी संलग्न आहे. सर्वशक्तिमान देवतेच्या इच्छेवर आधारित अशा मनःपूत आदेशांच्या नव्हे तर विशिष्ट तत्त्वांच्या आधारे प्रमाणशीर भाग ठरवून देणे त्या कल्पनेत अभिप्रेत आहे.

'पोषकत्वा'ची दुसरी बाजू हिदाया, 'मार्गदर्शन' ही आहे. हिदायाचा अर्थ होतो 'मार्ग दाखविणे' आणि या मार्गदर्शनाचे अनेक प्रकार असतात. मार्गदर्शन सहजप्रवृत्तीवर अवलंबून असू शकेल किंवा विवेकशक्तीवर आधारलेले असू शकेल. आपले लेखक ( मौ. आजाद ) या संदर्भात दोन औचित्यपूर्ण उदाहरणं देतात. इंग्रजी भाषेत ( इथे मराठी भाषांतरात ) त्यांच्या मांडणीचे सामर्थ्य व सौंदर्य व्यक्त करणे अवघड आहे. ती उदाहरणे अशी : ( १ ) आपल्या मातेचे स्तनाग्र शोधणारे मूल आणि ( २ ) पिलांना जन्म देण्याच्या बेतात असलेली मांजरी. स्तनपानाची विद्या बालकाला कुणीच शिकवलेली नसते किंवा होऊ घातलेल्या या मातेला ( मांजरीला ) आपल्या पिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती दक्षता घेण्याचे कुणी शिकवलेले नसते. आणि तरीसुद्धा ती दोघे सहजप्रवृत्तीनुसार निसर्गाशी पूर्णतया सुसंवादी वर्तन करतात.

दैवी मार्गदर्शनाची दुसरी पायरी ज्ञानेंद्रियाद्वारे किंवा विवेकशक्तीद्वारे गाठली जाते. मनुष्य, पशू, पक्षी आणि इतर सर्व सजीव प्राणी आपापल्या ज्ञानेंदियाद्वारे वस्तूंचे ज्ञान संपादून आपापल्या शक्तींचा वापर मार्गदर्शनार्थ व संरक्षणार्थ करीत असतात. कुराण–वचन असे आहे की,

> आमचा पालनकर्ता तोच होय कीं ज्यानें प्रत्येक ( सृष्ट ) वस्तूस तिची संघटना अर्पण केली; नंतर त्याने (ज्या ज्या कामासाठी त्या वस्तु निर्मिल्या होत्या तीं तीं कामें ईश्वरीतंत्राप्रमाणे बजाविण्यास तींस ) मार्ग दाखविला.
>
> ( २०, ५० )

निर्मिती आणि विकास यांचे चार टप्पे कुराणाने पुढीलप्रमाणे सांगितले आहेत :

> ज्याने ( सर्व सृष्टीला ) निर्मिलें व ( फारच ) परिपूर्ण बनविलें; आणि ज्यानें ( प्रत्येक वस्तूचा उद्देश व मर्यादा यांचा ) अंदाज ठरविला व ( त्याला त्या ) मार्गास लावून दिलें.
>
> ( ८७, २–३ )

अशा प्रकारे ' पालकत्वा 'त पुढील चार गोष्टी समाविष्ट होतात : ( १ ) निर्मिती, ( २ ) योग्य क्रमवारी, ( ३ ) अचूक परिमाण आणि ( ४ ) मार्गदर्शन. धर्माकडे पाहण्याच्या बुद्धिप्रामाण्यवादी व पद्धतशीर दृष्टिकोणावर आणि (अ) नियंतेपणा, (ब) दयाळूपणा आणि (क) न्यायीपणा यांनी युक्त अशा ईश्वराचा अंगीकार करण्यावर कुराण भर देते.

निर्मितीचे तत्त्व आणि त्याच्या जोडीला विश्वातील सुव्यवस्था हे इस्लामचे एक मूलभूत श्रद्धातत्त्व आहे. इस्लाम असे मानतो की, ईश्वराने सर्वप्रथम शून्यातून विश्वाची उत्पत्ती केली. नंतर त्याला त्याने उचित ' सुव्यवस्थित स्वरूप ' दिले, म्हणजेच त्याला योग्य प्रमाणात रूप आणि आकार दिला. नंतर त्याने त्याला योग्य परिमाण दिले, म्हणजे योग्य रूप दिल्यानंतर त्याला त्याने उचित आकारमान दिले. निर्मितीची प्रक्रिया सुरू असतानाच आकारमान, आकार, रूप आणि परिमाण या सर्व बाबींकडे त्या सर्व शक्तिमानाचे लक्ष होते. आणि शेवटी त्याने सर्व निर्मित वस्तूंना ' मार्गदर्शन ' ( हुदा )

केले. निर्जीव वस्तू निसर्गाचे नियम पाळतात. तेच त्यांना मार्गदर्शन होय. सजीव प्राणी आपापल्या सहजप्रेरणा, आपापली ज्ञानेंद्रिये यांच्या आज्ञा पाळतात. मनुष्यप्राण्याला मात्र यांच्या जोडीला आणखी एक शक्ती मार्गदर्शन करते आणि ती म्हणजे त्याची विवेकशक्ती.

' पोषकत्व ' या गुणविशेषाबद्दल बोलताना कुराण विचारते :

> ( हे पैगंबरा ! या लोकांस इतकें तर ) पूस कीं तुम्हांस आकाशांतून व पृथ्वीतून कोण रोजी पुरवितो ? अगर ( वस्तुत: तुमचे )कान व ( तुमचे) डोळे यांजवर कोणाची सत्ता आहे ? आणि कोण ( असा आहे कीं जो ) जिवंतास मेलेल्यातून काढतो आणि मेलेल्यांस जिवंतांतून काढतो ? आणि ( सृष्टीत ) प्रत्येक कामाची व्यवस्था कोण लावतो ? *

( १०. ३१ )

मौ. आजादांच्या मते, कुराणाचा युक्तिवाद पुढीलप्रमाणे आहे :

१. महंमदाचा संदेश मिळण्यापूर्वी ईश्वर आणि धर्म याबद्दलच्या ज्या संकल्पना प्रचलित होत्या त्यांना विवेकबुद्धीचा स्पर्श झालेला नव्हता. बुद्धिप्रामाण्यरहित श्रद्धेवर व अंधविश्वसावरच त्या आधारलेल्या होत्या. ईश्वरभक्तीला विवेकयुक्त संकल्पनेचा आधार कुराणाने दिला आहे.

२. कुराणाचे आवाहन ग्रहणशक्तीला आणि विवेकबुद्धीला आहे. विशेषत: माणसाला ते असे आवाहन करते की, संपूर्ण निसर्गाचा विचार कर, त्यावर चिंतन कर आणि ती ईश्वराची निर्मिती आहे हे लक्षात घे.

३. विश्वाची रचना असे दर्शविते की, त्यातील प्रत्येक गोष्ट ही हेतुपुरस्सर निर्माण केलेली आहे, मन:पूतपणे नव्हे.

४. एकदा या रचनेचा प्रत्यय माणसाला आला की तो आपोआपच चिंतन करू लागेल आणि सत्याचा मार्ग अनुसरू लागेल.

ईश्वराने ज्यांना निर्माण केले आहे त्यांच्या भौतिक गरजा तो पुरवतो हे जर मान्य केले तर मग तो त्यांना नैतिक मार्गदर्शनही करतो हे नाकारणे अशक्य आहे. आपल्या

* मूळ पुस्तकात १०, ३२ असा संदर्भ आहे तो चुकीचा असून संदर्भ १०, ३१ असा पाहिजे.

– भाषांतरकार

प्रेषितांना तो जे साक्षात्कार घडवतो त्यांच्याद्वारे हे मार्गदर्शन केले जात असते. मी. आजाद म्हणतात : 'तो जर या विश्वाचा निर्माता असेल, आणि प्रत्येक अणूला पर्याप्ती व मुंगीला तृप्ती लाभते एवढे त्याचे नियंतेपण जर परिपूर्ण असेल तर मग तो माणसाला नैतिक मार्गदर्शन करीत नाही या विधानावर कसा विश्वास बसेल ? '

( तर्जुमा १. ५९ )

त्यानंतर अमरत्वासंबंधीचा युक्तिवाद येतो. 'निर्मितीची परमोच्चकोटी असलेला मानव निर्माण करून त्याला निर्वाहाची साधने देऊन जर नैतिक मार्गदर्शन ( ईश्वराने ) केले असेल तर मग तो मानव पूर्णपणे मर्त्य असू शकेल काय ? त्याच्या मागे त्याचे काहीच राहणार नाही आणि आत्मा अमर नाही असे होऊ शकेल काय ? '

> ( लोकांनो ! ) कां तुम्हीं अशी कल्पना करितां कीं आम्ही तुम्हांस (असेंच) व्यर्थ निर्माण केलें आहे; आणि हें कीं आम्हांकडे तुम्हांला पुन्हां परतून यावयाचेच नाहीं ? तर परमेश्वर ( जो ) खरा बादशाह ( होय, तो व्यर्थ काम करण्यापासून निर्दोष व ) थोर होय. त्याच्यावाचून ( अन्य ) कोणी उपास्य नाहीं; ( तोच ) सन्माननीय सिंहासनाचा मालक ( होय ).

( २३, ११५-११६ )

साध्या प्राण्यांमधून क्रमशः अधिक गुंतागुंतीच्या प्राण्यांची ईश्वरेच्छेनुसार निर्मिती होण्याची व काही उद्दिष्टांपर्यंत पोचण्याची जी क्रमविकास-प्रक्रिया आहे ती पुढीलप्रमाणे कल्पिण्यात आली आहे :

> कां मनुष्य अशी कल्पना करितो कीं त्याला ( विचारपूस केल्याशिवाय ) एरव्हीच सोडून दिले जाईल ? कां ( प्रथमतः ) तो वीर्याचा एक थेंब नव्हता की जो (स्त्रीच्या गर्भाशयांत टाकिला) गेला होता ? तदनंतर तो रक्ताचा एक गोळा झाला; मग ( परमेश्वरानें त्याला दुसऱ्याच आकृतीचा ) बनविला व मग त्याचे जोडबंद बरोबर केले.

( ७५, ३६-३९ )

> कीं तुम्हीं लोक ( अशाच प्रकारें ) एका दर्जावरून दुसऱ्या दर्जावर चढत जाल.

( ८४, १९ )

याचा अर्थच असा की, जेव्हा माणूस त्याची मर्त्य अवस्था सोडून ईश्वरासमोर निवाड्यासाठी उभा राहील तेव्हा त्याला सर्व ईश्वरी संदेशांचे व वेळोवेळी मानवाला मार्गदर्शन करण्यासाठी ईश्वराने धाडलेल्या सर्व प्रेषितांच्या शिकवणुकीचे साक्षात् दर्शन घडेल.

येथवर आपण पहिल्या आयतीची ( महावाक्याची ) तपासणी पूर्ण केली. ( अ ) ईश्वराबद्दल पूज्यभाव आणि ( ब ) त्याचा पालकत्व हा गुणविशेष यांचा या आयतीत अंतर्भाव होतो. आता आपण 'दयाळूपणा' अथवा 'कृपाळूपणा' ही संकल्पना मौ. आजादांनी केलेल्या विवरणानुसार समजावून घेण्याचा प्रयत्न करू. दुसऱ्या आयतीत ईश्वराला उद्देशून दोन संज्ञा वापरल्या आहेत, रहमान आणि रहीम. या दोहोंचाही दया अथवा कृपा असा अर्थ होतो परंतु रूढार्थाने अरबी भाषेत रहमान हा शब्द तात्कालिक गुणाचा वाचक म्हणून वापरला जातो तर रहीम ही संज्ञा स्थायी गुणविशेष सुचविते. बहुतेक भाष्यकारांनी दिलेले हे स्पष्टीकरण, प्राचीन काळापासून रूढ असलेल्या अर्थाला प्रमाण मानून, मौ. आजादांनी स्वीकारले आहे [४] त्यांच्या मते रहीम या संज्ञेला व्यापक संदर्भ आहे, आणि म्हणूनच ईश्वर हा विशिष्ट प्रसंगापुरताच कनवाळू नसतो तर कनवाळूपणा हा त्याचा अंगभूत आणि चिरस्थायी गुणविशेषच आहे. ईश्वरानेच कुराणात असे म्हटले आहे की,

माझी जी दया आहे ती ( पात्रापात्र अशा ) सर्व वस्तूंस व्यापून आहे.

( ७, १५६ )

संपूर्ण विश्वाची निर्मिती सुव्यवस्था व सौंदर्य ह्या तत्त्वांवर झालेली असून अव्यवस्था व कुरूपता यांना त्यात स्थान नाही, आणि ह्याचे श्रेय निर्मात्याच्या या दयाबुद्धीस जाते. माणूस हा त्याच्या निर्मितीपैकी सर्वोत्तम व सर्वाधिक अनुगृहीत प्राणी असल्यामुळे ईश्वराने

आकाश व पृथ्वी ही निर्माण केली व आकाशातून पाणी वर्षविले; मग पाण्याच्या योगे ( वृक्षांस ) फळे निपजविली कीं तीं तुम्हां लोकांचा आहार होय. आणि त्यानें गलबतें तुमच्या ताब्यांत करून दिलीं; अशासाठीं की तीं त्याच्या हुकमानें समुद्रात वाहात जावीत, [ आणि (तशाच) नद्याही तुमच्या ताब्यात करून दिल्या ] आणि (अशाच तऱ्हेनें एका मार्गानें ) सूर्य व चंद्र हेहि तुमच्या ताब्यात करून दिले कीं दोन्हींही चक्कर खात राहतात, आणि (अशीच एकाप्रकारे) रात्र व दिवस हींहि तुमच्या ताब्यात

करून दिली. आणि तुम्ही जें जें काही मागितलें त्या प्रत्येकांतून कांहीं ( योग्य तें ) तुम्हांस दिले. आणि जर तुम्हीं परमेश्वराच्या देणग्या मोजू पाहाल तर त्या तुम्हांला पुन्या पुन्या मोजता येणार नाहींत.

( १४, ३२-३४ )

आणि तरीही माणसाच्या ठिकाणी कृतघ्नता किती काठोकाठ भरून आहे !

मौ. आजादांच्या सौदर्यसंकल्पनेचे आणखी थोडे विश्लेषण केले पाहिजे. विविध आकार, ध्वनी, रंग आणि गंध यांच्यातील सुसंवादी संयोगातच निसर्गातील सौंदर्य सामावलेले असते. बुलबुल पक्ष्याचे मधुर गाणे आणि कावळयाचे कर्कश ओरडणे परस्पर विरोधी असते, पण त्या दोहोंच्या संयोगातूनच विविधतेतील सुसंवाद निर्माण होत असतो ( तर्जुमा खंड १,७० ) या बहिर्गत सौंदर्याचे अंतर्गत सौंदर्याशी नाते असते. माणसाच्या चारित्र्याचे सौंदर्य विवेकबुद्धी, संयम व चांगुलपणा यांच्यावर अवलंबून असते. अशा प्रकारे निसर्गाचे बहिर्गत सौंदर्य माणसाच्या आत्म्याच्या व चारित्र्याच्या अंतर्गत सौंदर्याशी एकात्म झालेले असते. आणि जे जे अधिक उपयुक्त असेल त्याचेच रक्षण विकासक्रम-प्रक्रियेत निसर्ग करताना दिसतो. 'जो सर्वांत लायक आहे तोच टिकून राहील' यापेक्षा 'जे सर्वात जास्त "उपयुक्त" असेल तेच टिकून राहील' हीच कुराणाची शिकवण आहे.

मानवाची निर्मिती केल्यानंतर मूलभूत महत्त्वाचा प्रश्न होता तो ह्या जगात मानवाला योग्य मार्गदर्शन मिळण्याबाबतचा. आणि माणसाच्या मार्गदर्शनासाठी ईश्वराने आपले दूत आणि उपदेशक पाठवले हा त्याच्या दयेचाच भाग आहे. केवळ महंमदच नव्हे तर त्याच्याही आधी मूसा ( मोझेस् ) आणि येशू हे प्रेषितसुद्धा ईश्वरानेच धाडलेले होते. आणि ते त्याच्या दयाबुद्धीतूनच पाठविले गेले होते.

आणि ( हे पैगंबरा ! ) आम्हीं तर तुला सरळ जगांच्या लोकांसाठी ( केवळ अरबांसाठी नव्हे ! ) केवळ ( मूर्त ) दया ( बनवूनच ) पाठविले आहे.

( २१, १०७ )

आणि कुराणाच्यापूर्वी ( त्यांस मार्गदर्शक म्हणून ) मूसाचे पुस्तक असेल की तें (त्याची साक्ष पटविणारे व धर्म) मार्गदर्शक आणि ( परमेश्वराची ) दया होय.

( ११, १७ )

ज्याप्रमाणे निसर्गाच्या भौतिक क्षेत्रात जे अत्यंत उपयुक्त असेल तेच टिकते आणि कमी उपयुक्त असेल ते नष्ट होते, त्याचप्रमाणे आंतरिक क्षेत्रातसुद्धा सत्य ( हक्क ) आणि असत्य ( बातिल ) यांच्यात सतत द्वंद्व सुरू असते. अरबी भाषेत ( हक्क ) याचा शब्दश: अर्थ 'अविनाशी' असा होतो. म्हणजे सत्य हे ज्याचा क्षय होत नाही असे काहीतरी असून असत्य हे विनाशी असते.

> आणि ( हे पैगंबरा ! लोकांस ) सांगून दे की सत्य तें आलें आणि असत्य तें नाहींसे झालें. ( आणि ) अर्थात् असत्य तें नाहींसें व्हावयाचेंच होतें.
>
> ( १७, ८१ )

जरी ईश्वर असत्याचा विनाश करून सत्याला उचलून धरीत असला तरी ही प्रक्रिया एकाएकी घडून येणारी आहे असे समजता कामा नये. निसर्गातील इतर प्रत्येक गोष्टीप्रमाणे ही प्रक्रियासुद्धा हळूहळू घडणारी आणि क्रमविकासरूपच असते. स्वत:च सुधारण्याची संधी ती माणसाला देत असते. ईश्वर माणसावर कधीच गैरवाजवी संकट लादीत नाही. असत्याचे क्रमश: विलयन होणे आणि माणसाला स्वत:ला सुधारण्याची संधी देणे हे ईश्वराच्या कृपेचे एक महत्त्वाचे अंग आहे. कारण सुधारण्याची संधी जर मिळाली नाही तर माणसाला सतत चिरविनाशाला तोंड द्यावे लागेल.

> आणि जर परमेश्वर लोकांस त्यांच्या दुष्कर्माच्या शिक्षेत धरता, तर पृथ्वीच्या पाठीवर कोणाहि प्राण्यास ( बाकी ) न सोडता. परंतु तो एका नियमित काला ( म्हणजे पुनरुत्थाना– ) पर्यंत लोकांस अवकाश देतो. मग जेव्हां त्याचा ( तो ) काल येऊन पोहोंचेल तेव्हां परमेश्वर आपल्या सेवकां ( च्या स्थिती ) स निरीक्षित आहे. ( जसे ज्याचे कर्म असेल तसा त्याला मोबदला देईल. )
>
> ( ३५, ४५ )

अशा प्रकारे माणसाला जर या संधीचा लाभ घ्यायचा तर तो घेऊ शकतो; पण त्याने जर एका पाठोपाठ एक चालून आलेल्या संधी वाया दवडल्या तर तो मानवतेच्या खालच्या पायरीवर जातो, आणि त्याच्यावर ईश्वरी कोपाचा आघात होणे अनिवार्य होऊन बसते. सत्यअसत्याचा हा नियम केवळ माणसांनाच लागू आहे असे नाही, तर राष्ट्रांना व समूहांनासुद्धा तो लागू आहे. आणि ज्याप्रमाणे वैश्विक नियमानुसार माणसांचा व अन्य सृष्टीवस्तूंचा विनाश किंवा रक्षण होते त्याचप्रमाणे राष्ट्र व राज्ये यांचेही उदयास्त होत असतात.

आणि प्रत्येक जनते ( च्या मिटण्या )चा एक काळ ( नियमित ) होय. मग जेव्हां त्यांचा काळ येऊन पोहोचतो तेव्हां ( त्यापासून ) ते एक घटकाभर ना मागे राहू शकतात व ना ( एक घटकाभर ) पुढे जाऊ शकतात.

( ७, ३४ )

आणि आम्हीं ( कधीं ) कोणाही वस्तीला विध्वस्त केले नाही; परंतु तिच्या ( विध्वंसा –) साठी एक निश्चित काळ ( पहिल्यानेच ) लिहिला जाऊन ( चुकला ) होता. कोणतीही जनता आपल्या काळाच्या पुढें जाऊ शकत नाही व मागेंही राहूं शकत नाहीं.

( १५, ४–५ )

कुराणात सांगितलेल्या तत्त्वाचा अर्थ असा नाही की सुधारणेचे दार ईश्वराने बुद्धीपुरस्सर बंद करून टाकले आहे. कुराण सांगते की, अखेर सत्यांचा विजय होणारच. म्हणून माणसाने जर दुष्कृत्य केले तर ईश्वराची दयाबुद्धी अशी आहे की ती त्याला सुधारण्यासाठी संधी देईल, पण त्याने जर पश्चाताप करण्याच्या या दयापूर्ण संधीचा फायदा घेण्यात पुन: पुन्हा कसूर केली तर मात्र ईश्वरी कायद्याचा अंमल होऊन शिक्षा होणे अटळ ठरेल. काही भाष्यकारांची ह्या बाबतीत गैरसमजूत झालेली आहे. आणि त्यांनी कुराणाच्या काही आयतींचे वेगवेगळे अर्थ लावले आहेत. पण इस्लामचे खरे स्वरूप पुढीलसारख्या आयतींमधून व्यक्त झाले आहे :

( हे पैगंबरा ! या लोकांस ) सांगून दे कीं, ज्यांनी ( पापें करून ) आपणच आपल्यावर अत्याचार केला आहे त्या हे माझ्या सेवकांनों ! तुम्ही परमेश्वराच्या दयेकडून निराश होऊ नका. कारण परमेश्वर सर्व पापांची क्षमा करितों; तो नि:संशय ( फारच ) क्षमाकर्ता ( व ) दयाळू होय.

( ३९, ५३ )

परंतु ज्याने पश्चाताप केला व विश्वास धरिला आणि चांगली कृत्यें केलीं अशा लोकांचीं पापें परमेश्वर सुकृत्यांत बदलून टाकील.

( २५, ७० )

माणूस आणि त्याचा निर्माता यांच्यातील संबंध प्रेमाचे आहेत. केवळ उपासना पुरेशी नाही, आपण ईश्वरावर प्रेम केले पाहिजे, या गोष्टीवर कुराणाची शिकवण भर देते. आणि ईश्वरावर प्रेम करण्याचा सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे प्राणिमात्रावर प्रेम करणे. एका हदीस मध्ये ही गोष्ट फारच चांगल्या प्रकारे बिंबवली गेली आहे :

'न्यायदानाच्या दिवशी परमेश्वर एका माणसाला विचारील : हे आदमच्या पुत्रा ! मी आजारी होतो आणि तू मला भेटायला आला नाहीस. तो माणूस त्यावर म्हणेल: मी तुला भेटायला कसा येवू शकणार ? तू ( सर्व ) जगांचा स्वामी आहेस ( सूचित अर्थ असा की, ईश्वर रुग्णाईत होऊच शकत नाही. ) ईश्वर उत्तरेल : माझा एक सेवक आजारी होता, आणि तू त्याला भेटला नाहीस हे तुला स्मरत नाही काय ? तू जर त्याला भेटला असतास तर तिथेच त्याच्या शेजारी मी तुला आढळलो असतो.

तसेच परमेश्वर विचारील : हे आदमच्या पुत्रा ! एकदा मी थोडेसे अन्न मागत होतो, पण तू मला ते दिले नाहीस. तो माणूस त्यावर म्हणेल, हे स्वामी ! तू सर्व जगांचा स्वामी आहेस; मी तुला कसे अन्न देणार ? ईश्वर उत्तरेल : माझ्या एका भक्ताने तुझ्याकडे अन्नाची याचना केली होती, आणि तू त्याला ते देण्यास नकार दिलास हे तुला स्मरत नाही काय ? तू जर त्याला अन्न दिले असतेस तर मी तुला त्याच्या शेजारी दिसलो असतो.

त्याचप्रमाणे परमेश्वर दुसऱ्या एका माणसाला विचारील : हे आदमच्या पुत्रा ! मी तुला प्यायला पाणी मागितले, पण तू मला ते दिले नाहीस. तो माणूस म्हणेल : तू सर्व जगांचा स्वामी आहेस, मी तुला पाणी कसे देणार ? ईश्वर उत्तरेल : माझा एक सेवक तहानेने व्याकुळ झाला होता, त्याने तुला पाणी मागितले, पण तू त्याला दिले नाहीस. तू जर ते त्याला दिले असतेस तर नक्कीच तुला मी त्याच्या शेजारी दिसलो असतो. ( **तर्जुमा** खंड १, १०० )

मॅथ्यूकृत शुभवर्तमानातील पंचविसाव्या अध्यायात प्रेषित येशूने दिलेल्या शिकवणुकीसारखीच ही शिकवण आहे.

दयाळूपणाची शिकवण हा इस्लामचा एक मूलभूत घटक आहे. परमेश्वराच्या माणसाविषयीच्या कनवाळूपणावर कुराणात सतत भर देण्यात आला आहे. आणि अशा रीतीने माणसाला आपल्या बांधवांशी प्रेमाने आणि सहृदयतेने वागण्याची शिकवण दिली आहे .ईश्वरी दयाबुद्धीचा कुराणात तीनशेपेक्षाही अधिक वेळा उल्लेख झालेला आढळतो आणि परमेश्वराचे इतरही संबंधित गुण विचारात घेतले तर असे दिसून येईल की, हा ग्रंथ अथपासून इतिपर्यंत केवळ परमेश्वराच्या ठायी मानवाबद्दल असलेल्या दयाबुद्धीचाच संदेश देणारा ग्रंथ आहे

माणसा-माणसातील संबंधांचा विचार करीत असताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, इस्लाम हा माणसाला आपल्या शत्रूबरही प्रेम करण्याचे तत्त्व शिकवीत नाही. कारण ते मानवी स्वभावाशी विसंगत ठरेल. इस्लामचे धर्मतत्त्व समजण्याच्या दृष्टीने मौ. आजाद कुराणाच्या शिकवणुकीची तुलना बायबलच्या शिकवणुकीशी करतात. यहूदी लोकांमधली दांभिकता, कर्मकांडप्रियता व खऱ्या नीतिमत्तेचा अभाव यांची येशूला पुरेपूर तीव्र जाणीव होती. म्हणूनच त्याने आपल्या प्रेमाचा, आत्मसमर्पणाचा व विशुद्धतेचा संदेश देताना म्हटले की, ' जो कुणी तुमच्या उजव्या गालावर प्रहार करील त्याच्यासमोर आपला दुसराही गाल करा ', आणि ' मी तुम्हाला सांगतो, तुम्ही तुमच्या शत्रूवर प्रेम करा, जे तुम्हाला शाप देतील त्यांना आशीर्वाद द्या, जे तुमचा द्वेष करतील त्यांचे भले करा... ...' (मॅथ्यू-५, ३८-४४)

पण या विधानांचा अभिप्राय कोणता होता ? प्रेषिताला नवा कायदा रूढ करायचा होता, की तो आध्यात्मिक जागृतीचे आवाहन करीत होता ? ख्रिस्ती लोक आणि त्यांचे विरोधक या दोघांनीही येशूच्या वचनाचा खरा अर्थ नीट समजूनच घेतला नाही ही बाब अत्यंत खेदाची आहे असे मौ. आजादांना वाटते. दोघांनीही त्याच्या शिकवणुकीचा शब्दशः अर्थ घेतला आणि तिचे खरे महत्त्व त्यांच्या ध्यानातच आले नाही. परिणामी त्यांना ही शिकवण अव्यवहार्य आहे असे कबूल करणे भाग पडले. काही संतांचे अपवाद वगळता, ज्याने प्रेषित येशूचा संदेश कधी काळी आचरणात आणला आहे असा एकही माणूस ख्रिस्ती लोकांना दाखवता येणार नाही. आणि त्यांचे विरोधक हा तर ही शिकवण अव्यहार्य असल्याचा साक्षात् पुरावाच होय !

बायबलचे हे तत्त्व इस्लाम नाकारू शकणार नाही, कारण तसे करणे म्हणजे परमेश्वराच्या-येशू आणि महंमद या-दोन सच्च्या प्रेषितांमध्ये भेदभाव करण्यासारखे होईल. ज्या राष्ट्रांना उद्देशून येशूने संदेश दिला ती राष्ट्रे कमालीची भ्रष्ट, दांभिक आणि अनैतिक झालेली होती. प्रेषित येशूने आपल्या प्रभावी संदेशात लाक्षणिक अर्थाने शब्द वापरून सूडबुद्धीपेक्षा क्षमाशीलतेचा, द्वेषापेक्षा प्रेमाचा आणि कठोर कायद्यापेक्षा

आत्मसमर्पणाचा उपदेश केला. न्यायाच्या नावाखाली सूडवृत्तीचे व बदला घेण्याचे आचरण करणाऱ्या व द्वेष आणि आकस यांच्या प्रभावाखाली वावरणाऱ्या यहूदी लोकांच्या तत्कालीन पद्धतीबद्दल खरे पाहाता त्याच्या शिकवणुकीचा रोख होता. येशू एखादा वर्तनाचा नियम घालून देत नव्हता, तर काव्यात्म आणि आलंकारिक भाषेच्या द्वारे प्रेम, संयम आणि अनुकंपा या वृत्ती तो जनमानसात रुजवू पाहत होता. अशा रीतीने विचार केला तर बायबल आणि कुराण यांच्या शिकवणुकीत कोणताच विरोध दिसत नाही. विशिष्ट परिस्थितीत बदला घेण्यापासून इस्लाम माणसाला परावृत्त करीत नाही, पण दयाबुद्धी व क्षमाशीलता यांच्यावर तो सतत भर देतो. उदाहरणार्थ :

> – आणि ( मुसलमानांनो !— ) सक्तीहि कराल तर जशी सक्ती तुम्हांबरोबर केली गेली असेल तशीच सक्ती तुम्हींहि करा. आणि तुम्हीं ( लोकांचे छळ ) सहन कराल, तर कांहीं झालें तरी, सहनशील लोकांच्या ठायी सहन करणेच उत्तम होय.
>
> ( १६, १२६–१२७ )*
>
> आणि दुष्टपणाचा मोबदला तसलाच दुष्टपणा होय. यावरही जो कोणी माफी देऊन टाकील व संप करील (गोष्टींमध्ये सुधारणा घडवून आणील) तर त्याचे प्रतिफल परमेश्वराकडे होय.
>
> ( ४२, ४० )

खरी अडचण अशी आहे की, मनुष्य सामान्यतः पाप आणि पापी ह्याच्यातला भेद ओळखू शकत नाही. परंतु धर्म मात्र पापाचे गांभीर्य आणि पापी माणसाची द्वेष्यता ह्यात स्पष्ट फरक करीत असतो सर्व धर्मांनी माणसाच्या मनात पापाबद्दल घृणा निर्माण व्हावी असा प्रयत्न केला आहे; पण कोणताच धर्म आपल्या अनुयायांना पापी माणसाविरुद्ध द्वेषमूलक कृती करण्याची आज्ञा देत नाही ख्रिस्ती धर्म आणि इस्लाम हे दोन्ही पापाचा द्वेष करावा पण पापी माणसाबद्दल सहानुभूती बाळगावी हेच तत्व शिकवतात.

'अशा प्रकारे प्रेषित येशू आणि इस्लाम यांच्या शिकवणुकींमध्ये वस्तुतः काहीही भेद नाही. त्यांच्या आदेशांचा निकष एकच आहे. फरक उद्‌भवतो तो

---

* मुळात १२७ ह्या आयतीचा उल्लेख केला असला तरी १२७ ही आयत घेण्यात आली नाही.

– भाषांतरकार

केवळ प्रसंग आणि बोलण्याची धाटणी यांच्यामुळे. आध्यात्मिकतेच्या व अंत:करण-शुद्धीच्या आवश्यकतेवर येशूने भर दिला आहे; प्रेषित मूसाचे कायदे त्यावेळी अमलात होते आणि त्यात बदल करण्याची येशूची इच्छा नव्हती. परंतु त्यांचा भावाशय मात्र त्याला संपूर्णतया बदलून टाकायचा होता. पण कुराणात आज्ञात्मक कायद्या–( Positive laws )–प्रमाणेच नैतिक नियमही आहेत. त्यामुळे सर्व गोष्टी संशयातीत ठेवण्याच्या दृष्टीने नेमक्या भावंचा प्रयोग त्याने केलेला दिसून येतो. पहिली गोष्ट म्हणजे, क्षमाशीलता व संयम यांच्या महत्त्वावर आणि आध्यात्मिक सौंदर्यावर भर दिलेला असून त्यांना सद्‌गुण आणि धार्मिकवृत्ती यांचे अंगभूत घटक बनवून टाकले आहे.

दुसरी गोष्ट अशी की, तसाच प्रसंग असेल किंवा तशीच जर गरज असेल तर न्याय्य बदला घेण्याचा मार्ग कुराणाने मोकळा ठेवला आहे. परंतु त्याच वेळी ते तिसरी एक गोष्ट स्पष्ट आणि नि:संदिग्ध शब्दात अशी सांगते की, जो बदला घेतला जाईल किंवा जी शिक्षा दिली जाईल त्यात अतिरेक अथवा अन्याय घडता कामा नये. आणि ही तीन तत्त्वे नक्कीच जगातल्या सर्व प्रेषितांनी व सर्व धर्मांनी शिकवलेली आहेत.'

( **तर्जुमा खंड १०९-११०** )

> आणि जे असे ( दिलदार आहेत की जेव्हा त्यांच्यावर कोणाहिकडून ) गैरशिस्त अत्याचार होतो तेव्हा ते ( वाजवी ) बदला घेऊन सोडतात आणि दुष्टपणाचा मोबदला तसलाच दुष्टपणा होय. यावरही जो कुणी माफी देऊन टाकील व संप करील तर त्याचें प्रतिफल परमेश्वराकडे होय. नि संशय तो जुलूम करणाऱ्यास पसंत करीत नसतो.
>
> आणि अर्थात ज्या कोणावर जुलूम झाला असेल व त्यानंतर तो बदला घेईल तर हे लोक क्षमापात्र होत यांच्यावर ( दोष ठेवण्यास ) मार्ग नाही. अशा लोकांवरच काय तो ( दोष ठेवण्यास ) मार्ग होय, की जे लोकांवर जुलूम

करतात आणि मुलखांत हकनाक ( उगीच ) दांडगाई माजवितात. हेच लोक होत कीं ज्यांना दुःखकारक शिक्षा होणे आहे. आणि अलबत जो कोणी सहन करील व दुसऱ्याचा अपराध क्षमा करील तर निःसंशय हें मोठ्या हिमतीचें काम होय.

( ४२, ३९-४३ )

जगाच्या पाठीवर ठिकठिकाणी राहणारे मुसलमान आज प्रेषित महंमद आणि येशू यांची शिकवण विसरले आहेत, आणि ज्यांना उद्देशून येशूने अर्थपूर्ण शब्द उच्चारले होते त्या पातकी यहुद्यांनी प्रसृत केलेल्या सूडाच्या तत्वाकडे ते परत वळलेले आहेत ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. अनुकंपा, सेवाभाव, प्रेमळ सौहार्द यांच्या संदेशाचे स्थान ख्रिस्ती धर्माइतकेच इस्लाममध्येही अत्युच्च आहे. किती जरी कठीण व दुसाध्य-जागतिक वा राजकीय वा वैयक्तिक-व्यवहार करणे प्राप्त झाले तरीदेखील या गोष्टीकडे दुर्लक्ष होता कामा नये. कारण इस्लामच्या प्रेषिताने म्हटल्याप्रमाणे, ईश्वराप्रित्यर्थ गिळलेल्या आपल्याच रागाच्या घोटापेक्षा अधिक चांगला घोट कोणीही गिळलेला नाही.' प्रेषित पुढे म्हणतो, 'लोक जर आपल्याशी चांगले वागतील तर आपण त्यांच्याशी चांगले वागू आणि जर त्यांनी आपला छळ केला तर आपणही त्यांचा छळ करू असे म्हणू नका; तर असा ठाम निर्धार करा की, लोक चांगले वागतील तर तुम्ही चांगले वागालच, पण जरी त्यांनी तुमचा छळ केला तरी तुम्ही मात्र त्यांचा उलटून छळ करणार नाही.'

ईश्वराचा तिसरा आणि अखेरचा गुणविशेष आहे न्यायबुद्धी. उपरिनिर्दिष्ट प्रार्थनेच्या ज्या तिसऱ्या आयतीत त्याचे वर्णन 'निवाड्यांचा दिवसाचा धनी' असे केले आहे त्याच आयतीतून हा गुणविशेष प्रकट झाला आहे. मानवाने या जगात केलेल्या कर्मांचा जो अंतिम निर्णयकर्ता आहे तो सर्वार्थीनी न्यायबुद्धीचा असणे अत्यावश्यक आहे.

ईश्वर म्हणजे एक स्वयंमन्य दैवत आहे. तो संतापला म्हणजे शिक्षा करतो आणि संतोषविला गेला म्हणजे अनुग्रह करतो अशी त्याच्यासंबंधी अनेक धर्मांत कल्पना केली गेलेली होती. परमेश्वरी कृतीमध्ये निरंकुशत्व व स्वयंमन्यत्व ही गृहीतच धरली जात असत. त्याला खूष करण्यासाठी व माणसाशी दयाळूपणे वागण्याला प्रवृत्त करण्यासाठी बळी द्यावे लागत असत. यहूदी आणि ख्रिस्ती लोकांची या परमतत्त्वाबद्दलची संकल्पना यापेक्षा अधिक चांगली होती हे निःसंशय. तरी ते सुद्धा काही प्राचीन आणि परस्परविसंगत श्रद्धांना चिकटून होतेच. यहूदी लोकांनी इतर देवतांऐवजी इस्रायलच्या ईश्वरावरच विश्वास ठेवला. ते एक प्रकारे त्यांचे कुलदैवतच होते असे म्हणता येईल. पण तोसुद्धा निरंकुश व मत्सरी असाच देव होता. तो जर खूष असला तर इस्रायलवर

वरदानांचा वर्षाव करीत असे, जर तो क्रुद्ध झाला तर सूड घेऊन त्यांना उद्‌ध्वस्त करीत असे. खिस्ती श्रद्धासुद्धा अशीच काहीशी आदिम स्वरूपाची होती. त्या धर्मातील 'मूळ पापा'ची संकल्पना आदमच्या चुकीच्या कृत्यातून उद्‌भवलेली होती, आणि आदमच्या त्या पापामुळे समस्त मानवजात ही इतराजीचे लक्ष्य बनली होती. परिणामी येशू खिस्त हा मुक्तिदाता होऊन आला आणि त्याने मानवमात्राच्या पापाचे ओझे स्वतःच्या खांद्यावर घेतले.

कुराण मात्र शिक्षेच्या प्रश्नाचा विचार अगदी निराळ्या पातळीवरून करते. प्रत्येक कर्माचे फळ उचित अशा बक्षिसाच्या किंवा शिक्षेच्या रूपाने मिळते. सत्कृत्याचे बक्षीस परमेश्वरी अनुग्रह हे असते, तर दुष्कृत्याबद्दलची शिक्षा ही परमेश्वरी अवकृपेच्या रूपाने प्राप्त होते. शिक्षा आणि बक्षीस यांच्या बाबतीत काहीच विवेकरहित वा स्वयंमन्य असत नाही. कर्मफळ हे नेहमी तर्कसंगतच असते आणि ते ईश्वरी न्यायाचे परिणाम रूप असते. सत्कृत्यासाठी मिळणारे बक्षीस आणि दुष्कृत्यांसाठी मिळणारी शिक्षा या दोहोंसाठी कुराणात एकच शब्द वापरण्यात आला आहे ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे हा शब्द आहे **कस्ब** किंवा 'अर्जित'. बक्षीस किंवा शिक्षा हे मनुष्याचे अर्जित असते.

> परमेश्वर कोणाहि मनुष्यावर, (जितका बोजा उचलण्याची) त्याची ताकद असेल तितकाच मात्र बोजा टाकतो. त्यानें जीं (चांगलीं कामें) केलीं तीं त्याचीं त्यालाच, व त्यानें जीं (वाईट कामें) केलीं तींही त्याचीं त्याच्याच पुढें (येतील).
>
> (२, २८६)

> (हे पैगंबरा !) जो कोणी चांगले करितो तो खास आपल्या (बऱ्या-) साठीच करितो. आणि जो वाईट करितो तर त्याचा दुष्परिणाम त्याच्यापुढेच (येईल). आणि तुझा पालनकर्ता तर सेवकांवर मुळींच जुलूम करीत नसतो.
>
> (४१, ४६)

एका महत्त्वाच्या मुद्याचा येथे निर्देश करणे आवश्यक आहे. तो असा की, ईश्वराचे पालकत्व व दयाबुद्धी यांचा उल्लेख केल्यानंतर माणसाने ईश्वराची शक्ती व थोरवी स्वीकारावी असे आवाहन कुराणाने केलेले नाही. ईश्वराच्या थोरवीविषयी वा सामर्थ्या-विषयी बोलण्याऐवजी ते त्याच्या न्यायबुद्धीबद्दल बोलू लागते. **अद्‌ल** ('न्याय') हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ आहे 'समान असणे–कमी वा अधिक नसणे'. न्यायालयात दोन्ही पक्षांचे दावे समदृष्टीने विचारात घेतले जावेत. एका बाजूवर दुसरीपेक्षा

गैरवाजवी भर दिला जाऊ नये. न्यायकल्पनेद्वारे मानवी जीवनात ' समतोल ' या मूल्याचा प्रवेश झाला आहे. या समतोलाचे प्रतिक म्हणूनच संतुलित तराजू हे न्यायव्यवस्थेचे बोधचिन्ह म्हणून वापरले जाते. मौ. आजादांच्या मते समता आणि प्रमाणबद्धता यातूनच निसर्गातील तसेच दैनंदिन जीवनाच्या व्यवहारातील सौंदर्य निष्पन्न होत असते.

' न्याय म्हणजे अतिरेक टाळणे यापेक्षा दुसरे काय ? अत्याधिक्य असू नये तसेच अत्यल्पत्वही असू नये, म्हणूनच तराजू हे न्यायाचे बोधचिन्ह म्हणून वापरले जाते. अस्तित्व म्हणजे अगदी योग्य प्रमाणात काही घटकांनी एकत्र येणे यापरते दुसरे काय ? शरीर म्हणजे तरी योग्य प्रमाणातील भौतिक वस्तुमात्राखेरीज दुसरे काय आहे ? शरीराचे अस्तित्व ज्यांच्यावर अवलंबून आहे अशा कोणत्याही घटकाचे अत्याधिक्य तसेच अत्यल्पत्वही नसावे, या नेमस्तपणावरच उत्तम आरोग्य अवलंबून असते. या नेमस्तपणापासून कोणताही घटक जराही जरी ढळला तरी त्यातून आजार उद्भवणे अटळ असते. त्याचप्रमाणे सौंदर्य म्हणजे सुद्धा संयम आणि यथायोग्य प्रमाणबद्धताच होय. मानवी शरीराला सौंदर्य, फुलाला आकर्षकता, आणि इमारतीला ताजमहालाचे व ध्वनीला संगीताचे रूप यातूनच प्राप्त होत असते. '

( **तर्जुमा** खंड १, ११९ )

दयाळूपणा या गुणविशेषाची चर्चा केल्यानंतर, 'कुराण आणि त्याची ईश्वरी-गुणविशेषविषयक भूमिका ' या विषयावर अत्यंत विद्वत्ताप्रचुर चर्चा मौ. आजादांनी केली आहे. (तर्जुमा खंड १, १२३) आपल्या निष्कर्षांच्या पुष्टयर्थ त्यांनी इस्लामच्या अधिकारी भाष्यकारांबरोबरच युरोपीय, ग्रीक, हिंदू आणि बौद्ध साधनांचाही उपयोग केला आहे. इंग्रजी ग्रंथांतर्गत आधुनिक विचारांचे त्यांचे विस्तृत वाचन आणि सखोल ज्ञान हे त्यांच्या व्यासंगाचे व कुशाग्र बुद्धीचे लक्षणीय वैशिष्टय आहे. त्यांचे मुख्य मुद्दे संक्षेपाने देण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

पहिला मुद्दा ईश्वराच्या सर्वातीतत्वासंबंधीचा आहे. कुराणात ईश्वराच्या सर्वातीतत्वाचे संपूर्ण चित्र रेखाटण्यात आले आहे. इतर धर्मांनी कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या मानवसदृशतेचा ( अँथ्रोपोमॉर्फिझम् ) आधार घेतलेला दिसतो. सगुणत्व नाकारण्यात पर्यवसित होणारा आत्यंतिक ' अतीतत्वाद ' आणि ईश्वराला माणसासारखा करणारा ढोबळ ' मानवसदृशतावाद ' ह्या दोहोंच्या मधला मार्ग इस्लामने स्वीकारला आहे. कुराणात नेमस्त सर्वातीतत्वाची शिकवण दिलेली आहे.

दुसरा मुद्दा : ईश्वराच्या सगुणत्वाचाचा विचार करता यहुद्यांनी ईश्वराची शक्ती आणि क्रोध ह्यावर भर दिला आहे. तर ख्रिस्त्यांनी प्रीती आणि करुणा ह्यांवर गैरवाजवी भर दिला आहे. परन्तु न्याय आणि दया ह्यांचा समन्वय करून इस्लामने परत खरा समतोल साधला आहे.

तिसरा मुद्दा म्हणजे, इस्लामने निरपवाद एकेश्वरवादाचा पुरस्कार केला आहे. ईश्वराचे मूलस्वरूप किंवा त्याचे गुणविशेष ह्यांचे वर्णन करतानाही त्याने या एकेश्वर-वादाशी कोणतीही तडजोड होऊ दिलेली नाही.

चवथा मुद्दा असा आहे की, परमेश्वराविषयीचे आकलन वा परमेश्वराची उपासना ह्या बाबतीत प्रकार वा श्रेणी मानलेल्या नाहीत. उदाहरणार्थ, भारतात ह्याबाबतीत तीन पायऱ्या स्पष्टपणे मानल्या जातात.

अ) सामान्य व्यक्तींसाठी मूर्तींची किंवा पवित्र वस्तूंची पूजा;

ब) विशिष्ट लोकांसाठी ईश्वराची कोणाही मध्यस्थावाचून साक्षात् पूजा; आणि

क) जे अत्यंत आध्यात्मिक वृत्तीचे असतील त्यांच्यासाठी जीवात्म्याचे परमात्म्याशी जे संपूर्ण ऐक्य आहे त्याचे चिंतन. उपासनापद्धतींबाबत अशा कोणत्याच भेदास इस्लाम मान्यता देत नाही.

पाचवा मुद्दा असा की, माणसाला परमेश्वराचा साक्षात्कार अंतर्ज्ञानात्मक प्रक्रियेद्वारेच होऊ शकतो. हा एक गूढ अनुभव असतो. केवळ एखाद्या विचारप्रक्रियेद्वारेच मिळणारा तो नसतो.

सहावा मुद्दा, इस्लामच्या अनुयायांमध्ये श्रद्धांच्या तीन श्रेणी आहेत. त्यांना अनुक्रमे (अ) **इस्लाम** (ब) **ईमान** आणि (क) **इहसान** अशा संज्ञा दिलेल्या आहेत. **इस्लाम** या पहिल्या पायरीवर धर्मतत्त्वांचा अंगीकार आणि नमाज, रोजा, जियारत व जकात या चार मूलभूत मार्गांनी वाटचाल अभिप्रेत असते. **ईमान** या अवस्थेत आध्यात्मिक बाजूचा अधिक विकास होऊन माणसाच्या श्रद्धा अधिक दृढतर झालेल्या असतात. आणि शेवटची जी **इहसान** नावाची श्रेणी असते. ती सर्वोच्च असते. प्रेषिताच्या एका हदीसमध्ये 'परिपूर्ण श्रद्धे' चे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे :

'तू अशा वृत्तीने प्रार्थना करावी की जणू तू साक्षात् परमेश्वराच्या समोरच आहेस. आणि तुला जरी तो दिसत नसला तरी तुझ्यावर मात्र त्याचे खरोखरीच लक्ष असते.'

अशा प्रकारचे आध्यात्मिक श्रेणीमध्ये पहिला टप्पा हा सर्वसामान्य श्रद्धा व कर्म यांचा असून जो मनुष्य स्वतःला मुसलमान म्हणवतो आणि इस्लामच्या आज्ञा पाळतो त्याच्याशी तो संबंधित आहे. दुसऱ्या ( **ईमान** ) टप्प्याचा भर बाह्य कर्मकांडापेक्षा श्रद्धा आणि दृढ विश्वासाचे बळ यांच्यावर आहे. तिसऱ्या (**इहसान**) टप्प्यात श्रद्धा व कर्म यांपैकी कशावरच भर नाही. सत्य स्वरूपाच्या अंतिम आकलनाची व ईश्वराच्या गूढ साक्षात्काराची ही अवस्था आहे. सत्यशोधकाच्या तृष्णेची तृप्ती करण्याचे असे तीन मार्ग इस्लामने सांगितलेले आहेत. एकाच धर्मातर्गत श्रद्धेच्या गुणवत्तेच्या तीन पायऱ्या त्यात वर्णिलेल्या आहेत.

पालक ईश्वर, दयाळू ईश्वर आणि न्यायी ईश्वर असे संबोधून ईश्वराचे केलेले आवाहन प्रस्तुत अध्यायातील पहिल्या तीन आयतींतून आपल्याला दिसते. पुढच्या चार आयती ईश्वराची उपासना व भक्ती कशी करावी हे माणसाला शिकवतात. म्हणून असे म्हणता येईल की, इथून पुढे एक नम्र अनुयायी आणि सेवक म्हणून माणसाचा ईश्वराशी जो संबंध आहे त्याला आरंभ होतो.

या अध्यायाची चवथी आयत म्हणजे प्रार्थनेचा गाभा आहे. तिचे दोन भाग आहेत उपासना आणि साहाय्याची याचना. माणूस म्हणतो : उपासना आणि भक्ती केवळ तुझीच करणे योग्य आहे. आणि तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाकडूनही आम्ही मदत मागू शकत नाही. मूलभूत श्रद्धा फक्त ईश्वरावरच असल्यामुळे अन्य कोणीच उपास्य ठरू शकत नाही आणि जरी मुस्लिम जगताच्या अनेक भागात संतांची पूजा होताना दिसत असली तरी असे ठामपणे म्हणता येईल की, इस्लामची अशा उपासनेला मुळीच संमती नाही. उलटपक्षी इस्लामच्या आशयाच्या ते विरुद्धच आहे.

विविध धर्मांमध्ये ईश्वराच्या एकत्वासंबंधी ज्या संकल्पना आहेत त्यांचे वर्गीकरण तीन प्रकारात करता येईल :

१. **अस्तित्वाचे एकत्व** : म्हणजे परमेश्वर हा एकच असून अद्वितीय आहे.
२. **उपास्याचे एकत्व** : म्हणजे फक्त परमेश्वरच पूजनीय असून आपण सगळ्यांनी त्याच्याचसमोर विनम्र झाले पाहिजे. दुसऱ्या कोणाच्याही समोर होता कामा नये.
३. **गुणविशेषाचे एकत्व** : म्हणजे वरील दोहोंच्या जोडीला तिसरे असे की परमेश्वराचे जे काही गुणविशेष आहेत ते केवळ त्याचेच व्यवच्छेदक आहेत. इतर कोणालाही ते त्याच्याप्रमाणे लागू होऊ शकत नाहीत. एक आणि एकमेव परमेश्वर (अल्ला) सोडल्यास आणखी कोणीही देवता अस्तित्वात

आहेत असे मानणे यापरते दुसरे कोणतेच गंभीर पाप मुसलमानाच्या हातून घडू शकणार नाही.

वरीलपैकी पहिल्या दोन प्रकारचे एकत्व इतरही काही धर्मांमध्ये होते, पण शेवटचे एकत्व मात्र खास इस्लामप्रणित आहे आणि सदर आयतीमध्ये त्यावर विशेष भर दिला आहे. या परमेश्वरविषयक दृष्टिकोणात मध्यस्थीच्या (शफाअ) विचाराला अजिबात वाव नाही. खरे पाहता माणूस आणि परमेश्वर यांच्यात मध्यस्थ असणेच इस्लामला मान्य नाही.

'परमेश्वर हा पालकत्व, दयाभाव आणि न्यायबुद्धी यांचे एकमात्र उगमस्थान असल्यामुळे दुसऱ्या कोणाकडेही साहाय्याची याचना करणे गैर आहे. निरनिराळ्या प्रकारच्या देवता वा शक्ती वा देवदूत वा अवतार वा मानवश्रेष्ठ वा दैवते यांना उद्देशून प्रार्थना करण्यास वा त्यांना आळवण्यास इस्लामने मनाई केली आहे. माणसाने पूजा करावी, भक्ती करावी केवळ परमेश्वराचीच आणि प्रेम करायचे तेही फक्त परमेश्वरावरच. इतर धर्मांनी मान्य केलेल्या अन्य कोणत्याही देवादिकांना वा देवतांना वा भुताखेतांना या संदर्भात स्थान असता कामा नये.' ५

पाचवी आयत अत्यंत महत्त्वाची आहे, कारण तीत ( अ ) मार्गदर्शन आणि ( ब ) साध्य यांबद्दल सांगितलेले आहे. 'आम्हाला सरळ मार्ग दाखीव' अशी ती आयत आहे. पालकत्वातच मार्गदर्शनही बीजरूपाने आहे हे आपण मागेच पाहिले आहे. कुराणात मार्गदर्शनाचे जे प्रकार सांगितले व वर्णिले आहेत त्यासंबंधी जरा विस्ताराने आपण आता चिकित्सा करू. त्यासाठी आपल्याला निर्मितीच्या कुराणप्रणित संकल्पनेपर्यंत मागे जावे लागेल, कारण मार्गदर्शनाची कल्पना तिच्यातूनच निघालेली आहे.

निर्मितीची क्रिया चार टप्प्यात विभागलेली आहे : ( अ ) भौतिक निर्मिती करणे, ( ब ) सुव्यवस्था व प्रमाणबद्धता आणणे, ( क ) परिमाण ठरवून देणे, आणि शेवटी ( ड ) मार्गदर्शन करणे. कुराणाला अभिप्रेत असलेल्या मार्गदर्शनाच्या तीन पूर्वावस्था आहेत. पहिली, सहजप्रेरणेची. ही सर्व सजीव प्राण्यांमध्ये आढळते. दुसरी आहे ज्ञानेंद्रियांची. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांच्याद्वारे आपले सर्वमान्य जीवन यशस्वीपणे कसे जगावे हे आपल्याला कळते. तिसरा टप्पा विचारशक्तीचा आहे. हे केवळ मानव जातीचेच विशेष लक्षण आहे. प्राणिसृष्टीतील दुसऱ्या कोणत्याच जातीला या शक्तीचे वरदान लाभलेले नाही. या अद्वितीय गुणविशेषामुळेच माणूस हा इतर सर्व प्राण्यांहून निराळा ठरतो.

'मात्र या शक्तीला एक महत्त्वाची मर्यादा आहे. भौतिक वस्तु, शक्ती, कायदे आणि विचारांच्या पद्धती यांच्याशीच ती संबंधित असते. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास विज्ञानाच्या कक्षेत मोडणाऱ्या गोष्टींशीच तिचा संबंध असतो. श्रद्धा-विषयांबद्दल किंवा आध्यात्मिक जीवनाबद्दल ती काहीच शिकवू शकत नाही. उपरोल्लेखित तीन पायऱ्या आपल्याला काही प्रमाणात एकेक पाऊल पुढे घेऊन जात असतात. परंतु आपले लक्ष्य त्याहूनही पुढे असते, आणि तिथपर्यंत पोचायचे तर दैवी ( ईश्वरी ) मार्गदर्शनाखेरीज दुसरा उपाय नसतो. त्यालाच **हुदा** असे म्हणतात.'

( **तर्जुमा**, खंड १, १८० )

कुराणाच्या मते, ईश्वराने आपला संदेश सर्व लोकांसाठी धाडलेला आहे :

> आणि कोणतीच जनता अशी ( झाली ) नाहीं कीं तींत कोणी भय सुचविणारा होऊन गेला नसेल.

( ३५, २४ )

> आणि प्रत्येक जनतेचा एक पैगंबर प्रेषित झाला आहे. तर तेव्हा ( पुनरुत्थानाचे दिवशी ) त्यांचा प्रेषित ( आपल्या जनतेसह आमचे हुजूर ) हजर होईल; तेव्हां जनता व प्रेषित यांच्यामध्यें इन्साफानें निवाडा चुकविला जाईल. आणि लोकांवर ( मुळींच ) जुलूम केला जाणार नाही.

( १०, ४८ [४७] ) *

हे सर्व संदेश प्रत्यक्ष परमेश्वराकडूनच आलेले असल्यामुळे ते सर्व खरे होते. आणि त्यांनी जो धर्म शिकवला तो धर्म मूलतः एकच होता. यालाच प्रकटनाच्या एकत्वाचे तत्त्व असे नाव देता येईल.

---

* मुळात आणि पिक्थॉलच्या भाषांतरात १०, ४८ असा संदर्भ असला तरी इतरत्र तो १०, ४७ आहे.

– भाषांतरकार

सर्व प्रेषितांनी जरी ( दीन असे नाव असलेल्या ) एकाच धर्माची शिकवण दिलेली असली तरी त्यांच्या रूढी आणि त्यांची कर्मकांडे निरनिराळी होती; त्यांना शरअ असे नाव आहे. प्रस्तुत संदर्भात त्याचे भाषांतर 'कर्मकांड' किंवा 'कायदे' असे करता येईल. कर्मकांडातील ही भिन्नता सद्‌विचारी माणसांची परीक्षा घेण्यासाठी असून त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की परमेश्वर जरी त्यांना एकविध समाजात ठेवू शकला असता तरी त्याने तसे केले नाही, कारण त्याच्यावर श्रद्धा बाळगणारे लोक आपल्या स्वत:च्या श्रद्धांना कितपत चिकटून राहतात आणि इतर भिन्नपंथीय श्रद्धावंतांबद्दल किती सहिष्णु राहातात हे पाहता यावे हाच त्याचा हेतु; ही विविधता टिकवून ठेवण्यामागे होता अशा प्रकारे इस्लाम केवळ आपल्या स्वत:च्या धर्मावर दृढविश्वास ठेवावा असे प्रतिपादित नाही तर इतर धर्माबद्दलही योग्य ती सहिष्णुता दाखवावी असा उपदेश करतो.

> (आणि मुसलमानांनो ! ) जे लोक परमेश्वरा (अल्ला) शिवाय (इतरांस उपास्य म्हणून; गरजा सारण्यास ) बोलावितात ( म्हणजे त्यांची पूजाअर्चा करतात ) त्यांस अपशब्द बोलूं नका ( ज्यामुळे ) कीं हे लोकहि द्वेषाचे भरात नकळत परमेश्वरास (हकनाक) अपशब्द बोलूं लागतील. अशाच तऱ्हेनें आम्हीं प्रत्येक जनतेचीं कर्मे त्यांना सुशोभित करून दाखविली आहेत. नंतर ( सरशेवटी ) या सर्वांस आपल्या पालनकर्त्याकडे परत जाणें आहे; तर जसजशीं कर्मे ते (जगांत) करीत होते (त्यांचें बरेवाईट परमेश्वर त्यांना विदित करील.
>
> (१०, १०९) *

मौ. आजाद म्हणतात की, मुक्ती ही योगायोगाने विशिष्ट गटाचे असण्यावर अवलंबून नसते, तर श्रद्धा आणि कर्म यांच्यावर ती अवलंबून असते. परमेश्वराचा खरा धर्म एकच असून एका परमेश्वरावर विश्वास हाच श्रद्धेचा आधार आहे.

> यात शंका नाहीं कीं मुसलमान व यहुदी व खिस्ती व साबी या लोकांपैकीं ज्यांनीं कोणी परमेश्वरावर व शेवटल्या दिवसावर विश्वास ठेविला व चांगलीं कामें करीत राहिले, तर त्यांना त्यां- ( च्या कर्मा ) - चा मोबदला त्यांच्या पालनकर्त्यापाशीं ( प्राप्त ) होईल; आणि त्यांना ( कसलेंच )

* मूळ पुस्तकात दिलेला हा संदर्भ चुकीचा असून तो ( ६, १०९ )असा हवा.

भय राहणार नाहीं व ते ( कोणाप्रकारे ) दु:खी होणार नाहीत.

( २, ६२ )

खरे सत्य सर्व राष्ट्रांना व सर्व लोकांना लाभलेले आहे. पण ते आपल्या स्वत:च्या दुष्कृत्यांमुळे त्या सत्याला हरवून बसले आहेत. खरा धर्म हा ईश्वराच्या एकत्वावरील विश्वासावर आणि मानवमात्राबद्दलच्या भ्रातृभावावर आधारित असतो. आणि वेगवेगळे गट, पंथ जाती आणि धर्ममते याकडे नेणाऱ्या प्रवृत्ती गैर असून इस्लामशी विसंगत आहेत.

कुराणाने सर्व उपदेशकांना व प्रेषितांना सारखेच आदरणीय ठरवले आहे, ही महत्त्वाची बाब आवर्जून सांगितली पाहिजे.

> ( मुसलमानांनो ! तुम्हीं यहुदी व ख्रिस्ती यांस हें ) उत्तर दया कीं आम्ही तर परमेश्वरावर विश्वास ठेवला आहे; आणि कुर्आन् जें आम्हांस प्रकट झालें आहे त्यावर, व ( इतर ग्रंथ ) जे इब्राहीम व इस्माईल व इस्हाक व याकूब व ( याकूबची ) कुळें यांजला प्रकट झाले त्यांजवर, आणि मूसा ( मोझेस ) ईसा ( येशू ) यांस जीं पुस्तके दिलीं गेलीं आहेत त्यांजवर आणि जीं ( इतर ) प्रवक्त्यांस त्यांचे पालनकर्त्याकडून दिलीं गेलीं त्यांजवरही (विश्वास ठेविला आहे.) आम्ही ह्या (पैगंबरां–) (प्रेषितां–) पैकी कोणा एकामध्येंही ( कसलाच ) भेदभाव ठेवीत नाही. आणि आम्हीं त्या ( एका परमेश्वरा )चेच आज्ञाधारक आहों !

( २, १३६ )

हीच गोष्ट कुराणात अन्यत्रही–अध्याय तिसरा, आयता ८४– जवळपास याच शब्दात पुन्हा सांगितली गेली आहे.

याचा अर्थच असा की, हेच ईश्वराचे रास्त मार्गदर्शन आहे आणि माणसाने अनुसरावा असा हाच एक योग्य मार्ग आहे. आपल्या भाष्याच्या अखेरीस ( तर्जुमा खंड १, २१२ ) मौ. आजाद आपल्या शिकवणुकीचे सार थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडतात :

१. जेव्हा कुराण प्रकट झाले तेव्हा धर्म हे समूहसंघटनेचे एक तत्त्व मानले जात असे. वंश, वर्ग वा कुटुंबसंस्था हे जसे सामाजिक समूहसंघटनेचे

आधार, तसाच धर्म हाही एक आधार समजला जाई. प्रत्येक धर्माची अशी श्रद्धा होती की सत्य हे फक्त त्यालाच गवसले आहे. त्या धर्माच्या प्रत्येक अनुयायाला मुक्तीची हमी होती आणि प्रत्येक पाखंड्याला नरकवास अटळ होता.

२. अनेक उपासनाविधींचा व कर्मकांडांचा प्रपंच म्हणजे धर्म अशीच प्रत्येक समूहाची समजूत होत गेली. हे विधी व ही क्रियाकर्मे काटेकोरपणे करण्यावरच मुक्ती अवलंबून असे.

३. हे विधी आणि ही कर्मकांडे समूहासमूहात वेगवेगळी असल्यामुळे प्रत्येक समूहाची अशी धारणा झाली की दुसऱ्या समूहाचा धर्म हा सत्यविरहित आहे.

४. प्रत्येक समूहाला स्वतःचाच धर्म तेवढा खरा आणि इतरांचे विधी व उपासना पद्धती मात्र चूक असे वाटत होते. त्यामुळे अन्य समूहांकडे बघण्याच्या त्याच्या या दृष्टिकोणाचे पर्यवसान धर्मवेड, संघर्ष व रक्तपात यांच्यात झाले.

५. म्हणूनच कुराणाने धर्माचे विश्वव्यापी सत्य मानवासमोर मांडले.

इस्लामची तत्त्वे थोडक्यात अशी सांगता येतील :

अ) प्रत्येक धर्मात सत्याचा काही ना काही अंश असतो एव्हढेच केवळ नव्हे तर तत्त्वतः सगळे धर्म सत्यरूपच असतात. परमेश्वराने माणसाला दिलेले एक सामायिक वरदान म्हणजे धर्म होय. त्याचा मक्ता एका विशिष्ट धर्माकडे वा समूहाकडे आहे असे प्रतिपादन करता येणार नाही.

ब) निसर्गाच्या नियमाप्रमाणे आध्यात्मिक प्रबोधनाचा नियमही एकच असतो; मानवजातीने आपली विभागणी अनेक परस्परविरोधी समूहांमध्ये केली ही तिची सर्वात मोठी चूक झाली आहे.

क) धर्माचे प्रयोजन माणसांमध्ये एकी निर्माण करावी हे होते. दुही निर्माण करावी हे नव्हते ही इस्लामची घोषणा आहे.

ड) धर्माचे सार ( दीन ) आणि त्याचे कर्मकांड यात इस्लामने फरक केला

आहे. सर्व मानवासाठी खरा धर्म एकच आहे. रूढी व कर्मकांडे मात्र देशोदेशी व वेळोवेळी भिन्नभिन्न असतात. माणसाला धर्माच्या मूलभूत एकत्वाचा विसर पडतो आणि तो भिन्नभिन्न धार्मिक रूढींना आणि आचारांनाच प्राधान्य देऊ लागतो.

इ) बाह्य आचारविधी व सामाजिक गटांची निर्मिती यांचा माणसाच्या आध्यात्मिक मुक्तीवर खरा असा काही परिणाम होत नाही. खरी धर्मश्रद्धा ही योग्य विश्वास व सदाचार ह्यात समावलेली असते.

फ) सर्व धर्म खरे आहेत हे इस्लामने अत्यंत स्पष्ट व नि:संदिग्ध शद्वात सांगितले आहे. इस्लामचा संदेश असा आहे की, त्या सर्वांनी खऱ्या श्रद्धेकडे परत जावे. या श्रद्धेला **दीन** (धर्म) किंवा **इस्लाम** ( ईश्वरेच्छेला शरण जाणे ) असे म्हणता येईल. धर्म माणसाला माणसाचा द्वेष करायला शिकवीत नाही, हे इस्लामचे आग्रही प्रतिपादन आहे. आपण सारे एकच एक जो परमेश्वर त्याची लेकरे आहोत ही जाणीव ठेवून परस्परातील प्रेम आणि ऐक्य वाढवणे हेच धर्माचे उद्दिष्ट आहे.

परमेश्वराच्या पितृछत्राखाली सर्व मानवजातीने एकत्र यावे हा इस्लामचा संदेश आहे. वांशिक, राष्ट्रीय, पंथनिष्ठा वा अन्य कोणत्याही संकुचित गटबाजीला त्याचा विरोध आहे. तेव्हा खरा मार्ग हाच असून त्याचे अनुसरण करण्यासाठीच आपण ईश्वराची करुणा भाकतो.

कुराणाच्या पहिल्या अध्यायाचे विश्लेषण करीत असताना मौ. आजाद इस्लामची एक मूलत: सोपी अशी व्याख्या करतात. विश्वाचा निर्माता असा एकच ईश्वर आहे असे इस्लामचे ठाम मत आहे. हाच ईश्वर पालकत्वाचा, दयेचा आणि न्यायाचा ईश्वर आहे. त्याच्या पालकत्वाची एक महत्त्वाची बाजू ही की तो सर्व मानवजातीसाठी पाठवलेल्या आपल्या दूतांकरवी मानवाला मार्गदर्शन करतो; पापी व्यक्तींना देखील स्वत:च सुधारण्याची संधी तो देतो यातून त्याच्या दयाबुद्धीचा प्रत्यय येतो, आणि त्याचा न्याय हा प्रत्येक माणसापर्यंत जाऊन पोहचणारा असतो.

उपासना आणि भक्ती करायची ती केवळ त्याचीच, अन्य कुणाचीच करायची नाही. सर्व धर्म सारखेच सत्य आहेत. पण रूढी आणि आचारविधी ह्याबाबत लोकांमध्ये

भिन्नता आहे. परमेश्वराचे सगळे प्रेषित आणि दूत सारखेच आदरणीय आहत. मानवमात्राची सेवा करणे आणि सहिष्णुता आचरणात आणणे हा श्रद्धेचा सर्वोतम भाग आहे. जगात चहूकडे आज भीती, मत्सर, लोभ आणि द्वेष यांसारख्या शक्तिप्रवाहांशी मानव झगडत आहे; अशावेळी इस्लामच्या भूमिकेची ही साधी तर्कसंगत संकल्पना विशेषच औचित्यपूर्ण ठरते.

चिरंतन सौंदर्य, सत्य आणि न्याय यांचा हा संदेश आहे. *

* पहा, टोरॉन्टो विद्यापीठाचे त्रैमासिक, १९६० खंड २९, १८१–१९७

## संदर्भ टीपा

१. **तर्जुमानुल कुर्आन** खंड पहिला या ग्रंथाच्या दोन आवृत्या दिल्ली येथे प्रकाशित झाल्या. त्यावर प्रकाशन वर्ष नाही. पण ते बहुधा १९३१ असावे. दुसरी आवृत्ती लाहोर येथे १९४७ साली प्रकाशित झाली. ती सुधारित असल्यामुळे मी संदर्भासाठी ती वापरली असून तिचा निर्देश तर्जुमा - १ असा केला आहे.

२. मी साधारणतः पिक्थॉलचे भाषांतर काही किरकोळ फेरबदलांसह '**द मीनिंग ऑफ द ग्लोरियस कुरान**' ( लंडन, १९३० पुनर्मुद्रित ) या ग्रंथातून घेतले आहे. ( मराठी भाषांतरकाराने इथे आणि अन्यत्रही डॉ. मौलवी हकीम सूफी मीर मोहंमद याकूब खान यांनी कुराणाच्या केलेल्या मराठी भाषांतरातून— **पवित्र कुराण सुरस व सटीक मराठी भाषांतर** ( मुंबई, १९७३ )-अवतरणे घेतली आहेत. )

३. ए. हुसैन, '**स्पिरिट ऑफ इस्लाम**' (मुंबई, १९५८) २५, अमीर अलींच्या याच शीर्षकाच्या अभिजात ग्रंथापासून प्रस्तुत ग्रंथाचे वेगळेपण दर्शविण्यासाठी त्याचे पुनर्मुद्रण '**क्विन्टिस्सेंस ऑफ इस्लाम**' या शीर्षकाखाली करण्यात आले.

४. आधुनिक भाषाशास्त्रीय चर्चेसाठी पाहा : ऑर्थर जेफरी, '**फॉरिन व्होकॅब्युलरी ऑफ द कुरान**' ( बडोदा, १९३८), १४०.

५. ए. हुसैन, पूर्वोक्त, ५८-६०.

प्रकरण दुसरे

# इस्लाममध्ये कायदा आणि धर्म

अल्लाच्या प्रेषिताच्या नावाचे स्पेलिंग कसे कराल ? हा प्रश्न फावलरने एका मध्यमवयीन स्त्रीला विचारला आणि ती ठामपणे म्हणाली, एम्–ए–एच्–ओ–एम्–ई–टी [1] आणि मला वाटते या अतिहुशार व्यक्तीला रस्त्याच्या मध्येच अडवीत कोणी जर विचारले की, 'कायद्याचा तुला ठाऊक असलेला अर्थ काय ?' तर ती उत्तर देईल : 'मला वाटतं, पाळलेच पाहिजेत अशा नियमांचा समुच्चय;' त्याला ती धूर्तपणे अशी पुस्तीही जोडील की करार हा करार असतो, प्रेमपत्रांमधल्या बेफाम आणि भावनात्मक गोष्टींपेक्षा तो काहीसा निराळा असतो; तुम्ही एखादे जेवणाचे निमंत्रण स्वीकारले, आणि उशिरा आलात किंवा येऊच शकला नाहीत, तर त्यामुळे संभवणारे परिणाम, भाडे देण्यात किंवा प्राप्तीकर भरण्यात किंवा विमा पॉलिसीचा हप्ता चुकता करण्यात दिरंगाई झाल्यास संभवणाऱ्या परिणामांइतके भयंकर असणार नाहीत. 'पण खरंच मला उशीर होतोय, आणि स्वार्थी हेतूंनी वकील लोक जी गुंतागुंत निर्माण करीत असतात तिचा विचार करीत बसायला मला वेळ नाही.'

तिची ही दोन्हीही उत्तरे बरोबर आहेत आणि चूकही आहेत. 'महोमेट (Mahomet)' हे इंग्रजी उत्तम आहे किमानपक्षी होते. आता आपली समज वाढल्यामुळे आपण मुहम्मद (Muhammad) असे लिहिले पाहिजे, आणि 'पाळलेच पाहिजेत अशा नियमांचा समुच्चय' ही (कायद्याची) व्याख्या आरंभ म्हणून जरी वाईट नसली, तरी अधिक विचार केल्यावर ती चूक ठरते. मी विद्यार्थिदशेत असताना सालमंडची व्याख्या लोकप्रिय होती : 'न्यायाची अंमलबजावणी करताना राज्यसंस्थेने मान्य व लागू केलेल्या तत्वांचा समुच्चय म्हणजे कायदा होय.' दुसऱ्या प्रकरणाच्या शिरोभागी त्याने आपल्या विशिष्ट धिटाईपूर्वक ही व्याख्या ठेवली होती. [2] आणि जवळपास २५ वर्षेपर्यंत प्रत्येकाच्या विचारांवर तिची छाप पडलेली होती आणि प्रत्येकाच्या विधिविषयक जाणिवेमध्ये ती खोल रुतून बसली होती. परंतु विषयाच्या चिकित्सेनंतर आज स्पष्टपणे असे दिसते की सभ्य जीवन इतके गुंतागुंतीचे झाले आहे आणि कायद्याच्या निर्मितीत प्रविष्ट होणाऱ्या विविध घटकांबद्दल मानवी मन इतके

संवेदनक्षम झाले आहे की कोणतीही व्याख्या पूर्णपणे समाधानकारक ठरणेच शक्य नाही. [२]

एका प्राचीन भारतीय आख्यायिकेत एकाच स्त्रीचे माता, पत्नी, भगिनी आणि कन्या असे भिन्नभिन्नप्रकारे वर्णन केले गेले आणि तिच्या व्यक्तित्वाच्या रेखाटनात इतकी प्रचंड तफावत पडली की त्या स्त्रीची ओळख पटण्यास बराच वेळ आणि चातुर्य खर्ची पडले. कायद्याबद्दलही असेच होते.

वर्तनासंबंधींच्या ज्या नियमांना मानवप्राण्याने कायदे म्हणून मान्य केले आहे ते तीन ठळक अवस्थांमधून गेलेले आढळतात : (अ) **प्राचीन**, जिथे रूढी अस्तित्वात होत्या पण न्यायमंडळे नव्हती : (ब) **आर्ष**, जिथे न्यायालये होती पण वकील नव्हते; आणि (क) **परिपक्व**, जिथे आपल्याजवळ न्यायालये आणि वकील हे दोन्ही आहेत. [३]अ पॅटनने दिलेले वर्गीकरणही तिहेरीच आहे : (अ) प्राचीन काळ, (ब) मध्यकाळ, आणि (क) अभिजात काळ. [४] हे तिहेरी वर्गीकरण आणि त्याचे अन्वयार्थ स्वीकारण्यात कोणतीच अडचण नाही.

आपण जेव्हा व्याख्यांकडे वळतो तेव्हा असे दिसते की, मतभेद कायम राखण्यावरच विधिवेत्त्यांचे एकमत आहे. पॅटन आणि स्टोन यांच्यासारख्या आधुनिक अधिकारी व्यक्तींनी हे मतभेद होण्याची आणि कोणतीच व्याख्या संपूर्णतया मान्य न होण्याची कारणेही स्पष्ट केली आहेत. नियमांचा एक अमूर्त समुच्चय म्हणून कायद्याकडे पाहिले जाऊ शकते; पण त्याच बरोबर कायदा हा जनसमुदायात सुव्यवस्था प्रस्थापित करणाऱ्या सामाजिक यंत्रणेचा भागही असतो. आज्ञार्थक ( किंवा विश्लेषणात्मक ) विचारपंथाचा संस्थापक ऑस्टिन याच्या मते, कायदा ही सार्वभौमसत्तेची आज्ञा असते, विधिशास्त्राचे मुख्य साधन विश्लेषण हे असते. ऑस्टिनच्या मते, विधिशास्त्र–कायद्याचे शास्त्र–हे विधिसिद्धान्तापासून वेगळे केले पाहिजे. पहिल्याचा कायद्याच्या चांगलेपणाशी वा वाईटपणाशी काहीच संबंध नाही; तर दुसऱ्याचा संबंध उपयोगितेच्या तत्त्वाशी आहे– भूयिष्ठ सुख त्यातून साधले पाहिजे. [५]

केल्सनने कायद्याच्या भव्य वास्तूकडे निराळ्याच अंगाने पाहिले आहे. कांटच्या सिद्धांतावर त्याचे कायद्याचे विशुद्ध शास्त्र उभे राहिले आहे. विधिशास्त्राला नैसर्गिक शास्त्रांपासून वेगळे केले पाहिजे. नैसर्गिक शास्त्रे कार्य–कारणाचा विचार करतात; तर विधिशास्त्र हे कायद्याने प्रस्थापित केलेल्या मानकांचा वा प्रमाणांचा अभ्यास प्रस्तुत करते, आणि त्याचा मुख्य निकष, मानक कसे निर्माण केले हा असतो. विधिशास्त्राचा अभ्यास म्हणजे मानकांच्या या उतरंडीच्या स्वरूपाचा अभ्यास असतो, आणि केल्सन समाजशास्त्राला व नीतिशास्त्रालाही बाजूला ठेवतो.

साविन्यी ( Savigny ) च्या 'ऐतिहासिक संप्रदायाच्या' मते कायद्याचे उगमस्थान सार्वभौमसत्तेची आज्ञा हे नसते, तर प्रत्येक मानववंशाच्या ठिकाणी औचित्याची जी सहजप्रेरणा असते तिच्यात ते उगमस्थान असते. रूढीचे मूळ माणसांच्या मनात दडलेले असते, आणि निश्चित मानकांमध्ये रूढीचे स्फटिकीभवन होण्याचा ऐतिहासिक क्रमविकास हे एक अत्यंत हृद्य आणि उद्बोधक नाट्य असते.

विधिशास्त्रावरची दुसरी अधिकारी व्यक्ती म्हणजे 'कार्यात्मक ( functional ) विचारसंप्रदाया'चा संस्थापक पाउंड ( Pound ). त्याच्या मनात समाजाचे चित्र सतत असावे लागते. मानवमात्राच्या गरजांशी ज्याचा संबंध नाही अशा कायद्याबद्दल विचारही केला जाऊ शकत नाही. या विचारसंप्रदायाच्या परिश्रमांमधूनच कायद्याचे समाजशास्त्र हा विषय विकास पावला आहे. [६]

यावरून असे दिसते की, व्याख्यांमध्ये तफावत असण्याचे कारण विषयासंबंधी असलेल्या भिन्न धारणांमध्ये आहे. काही आधुनिक लेखकांनी, उदाहरणार्थ, स्टोन याने आपल्या प्रॉव्हिन्स अॅन्ड फन्क्शन ऑफ लॉ या ग्रंथात, पॅटनने आपल्या ज्युरिस्प्रूडन्स या ग्रंथात आणि हार्टने द कॉन्सेप्ट ऑफ लॉ या ग्रंथात हे वादातीतपणे स्पष्ट केले आहे. कायद्याविषयीच्या कल्पनेच्या विश्लेषणातूनच कायद्यातून उद्भवणाऱ्या इतर अनेक संबंधित अध्ययनांची वाढ झाली आहे. इस्लाममध्ये कायद्याच्या शास्त्राचे जे रेखीव वर्गीकरण करण्यात आले आहे त्याचे कोणालाही स्मरण व्हावे. मुस्लिम विद्वानांच्या मते कायदा ( फिक्ह् ) दोन भागात वाटला जातो : मूळ ( उसूल ) आणि शाखा ( फुरू ).

मुळांच्या (किंवा उसूलच्या) शास्त्राची तुलना पाश्चात्य विधिशास्त्राशी करता येईल. कुराणातील आयतींचा खरा अन्वयार्थ, प्रेषिताच्या नावाशी संलग्न असलेल्या हदीसची अधिकृतता, सामर्थ्य व प्रामाण्य, न्यायाधीशांमधील मतैक्य हेच जेव्हा प्रमाण मानले जावे असे प्रसंग, जिथे सादृश्यअनुमान (anological deduction) हाच न्याय्य मार्ग ठरू शकेल असे एखाद्या देशातील बदललेले समाज-चित्र-यांच्याशी हे शास्त्र संबंधित आहे. पहिले 'मूळ'– कुराणातील एखाद्या क्लिष्ट अशा महावाक्याचे (आयतीचे) नवे स्पष्टीकरण देणे हे या पहिल्या 'मुळा' चे उदाहरण- कुराणाचे अर्थबोधन होईल. सादृश्यअनुमान हे चौथे 'मूळ', व्याजीने कर्ज देण्याविषयीचा जरी कायदा असला तरी धनको म्हणून राज्यसंस्थेने आणि ऋणको म्हणून प्रजेने, राष्ट्रीय कर्ज देणे घेणे कायदेशीर घोषित केले जाणे हे चौथ्या 'मुळा' चे 'सादृशमूलक अनुमाना' चे उदाहरण आहे. गेल्या शतकात ईजिप्तमध्ये शेख मुहंमद अब्दुह यांच्या फतव्या द्वारे प्रत्यक्षात असे केले गेले होते.

'शाखां' चे शास्त्र हे पाश्चात्यांच्या आज्ञापक कायद्यासारखे ( positive law ) आहे. आधुनिक राज्यात एकतर संहिताबध्द कायदा असतो किंवा निर्णय–विधी ( Case law ) असतो, पण इस्लाममध्यें, मद्यपानासंबंधीचे संपूर्ण मनाई करणारे, किंवा तंबाखू ओढण्यासंबंधीचे (ज्यास परवानगी नाही, पण मनाईही नाही) असे काही विशिष्ट नियम विधिज्ञांनी लिहिलेल्या ग्रंथांमध्ये दिलेले आहेत. 'मुळा–' (उसूल)–मध्ये ठरवून दिलेली तत्त्वे प्रत्यक्षात लागू करण्यामधून तार्किकरीत्या उद्‌भवलेले असे हे नियम आहेत. आधुनिक इस्लामी विधिशास्त्राच्या विविध शाखांमुळे कायद्याचा विद्यार्थी आकर्षित होतो व बुचकळ्यातही पडतो. या ठिकाणी होम्स जे. या लेखकाच्या दूरदृष्टीचे स्मरण आपल्याला होते : 'कायदा हा जर तुमचा अभ्यासविषय असेल तर मानवशास्त्र, अर्थशास्त्र, विधिकरणशास्त्र, नीतिशास्त्र या विषयांच्या वाटांनी तुम्हास जावेच लागेल आणि नंतर अनेक वाटांनी, तुमचा जो जीवनाविषयीचा अंतिम दृष्टिकोण असेल त्याच्याकडे तुम्हाला जावे लागेल.' [७]

आपल्या विवेचनासाठी आपण कायद्याची पॅटनकृत व्याख्या स्वीकारू आणि ती इस्लामी विधिज्ञांनी केलेल्या व्याख्येपेक्षा कशी निराळी आहे ते पाहू : 'एखाद्या समाजाने मूकसंमतीने वा प्रकटपणे मान्य केलेल्या वैधानिक व्यवस्थेच्या परिभाषेत कायद्याचे थोडक्यात वर्णन करता येईल. समाजाला स्वत:च्या कल्याणासाठी जे आवश्यक वाटतात आणि त्यांच्या पालनार्थ विशिष्ट यंत्रणा निर्माण करून तिच्याकरवी ते राबविण्यास त्यांची तयारी असते अशा नियमांचा समुच्चय म्हणजे कायदा. कायद्याची परिपक्व व्यवस्था राज्यसंस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वैधानिक पद्धतीची सामान्यत: उभारणी करीत असते, परंतु राज्यसंस्थेखेरीज कायदा अस्तित्वात असूच शकत नाही असे अनुभवपूर्व ( a priori ) विधान आपल्याला करता येणार नाही. [८]

एक महत्त्वाची गोष्ट इथे नोंदवायला हवी, ती अशी की, हिंदुधर्माप्रमाणेच इस्लाममध्येसुद्धा विधिसिद्धान्तानुसार कायदा हा ईश्वर–निर्मित आहे. त्याच्यापुढे मानवी गरजा, राजकीय उपयुक्तता, नागरी जीवनातील क्रमविकासात्मक वाटचाल, मानवशास्त्राचे धडे आणि थेट मानवी न्यायाची कल्पनासुद्धा दुय्यम होत. सर्वप्रथम देवतेकडून आलेल्या आज्ञांचा समुच्चय म्हणजे कायदा अशी कायद्याची अभिजात कल्पना आहे. ईश्वराच्या शब्दाच्या आधारावर मानवी बुद्धीने निर्माण केलेला (कायद्याचा) इमला उभारला गेला आहे. त्यामुळे मन्कूल (जे प्रकट झाले आहे असे) म्हणजे कुराण आणि सुन्ना आणि मअकूल (जे मानवी बुद्धीने रचले आहे असे) म्हणजे इज्मा आणि कियास– या दोहोंवर फिकह् आधारित आहे. अशाप्रकारे कायद्याचे उगमस्थान आहे आणि त्याचे अंतिम प्रयोजन या दोन भिन्न गोष्टी आहेत. आधुनिक युरोपीय कायद्यात लोकांची सार्वभौम ईहा हे कायद्याचे उगमस्थान आहे आणि जीवनव्यापारातील सुव्यवस्थेच्या

आधारे समाजान्तर्गत न्याय हे त्याचे उद्दिष्ट आहे; याउलट इस्लाममध्ये (कायद्याचे) एकमेव उद्दिष्ट आहे ते असे की, ईश्वरी आदेशानुसार आचरण करून परमेश्वराचे 'सामीप्य' (कुर्बा) मिळवणे. स्नाउक हुरग्रॉंजच्या (Snouck Hurgronje) शब्दात हा 'कर्तव्यांचा सिद्धान्त' आहे, कर्तव्याचा आदेश आहे. काटेकोरपणे बोलायचे तर ईश्वराविरुद्ध वापरता येतील असे हक्क यात नाहीत. सत्कर्मांविना अल्लाची मान्यता मिळणे जरी शक्य नसले तरी मुक्तीसाठी ईश्वरी कृपा आवश्यक आहे. या सिद्धांतामुळे वरील भूमिकेला अधिकच पुष्टी मिळाली आहे.

इस्लाममधील कायद्याच्या व्याख्यांची तपासणी केल्यास हा मूलभूत फरक स्पष्ट होऊ शकेल. 'आत्म्याला असलेली त्याच्या हक्कांची व कर्तव्यांची जाणीव म्हणजे कायदा' या अबू हनीफा यांनी दिलेल्या व्याख्येचा भर फिकाह्च्या इस्लामी संकल्पनेतील व्यक्तिनिष्ठ घटकावर आणि सद्सद्विवेकबुद्धीच्या प्राथम्यावर आहे. माझी सद्सद्विवेकबुद्धी ही अंतिम निर्णयकारिणी आहे. अशारीतीने प्रत्येक कृतीच्या वेळी मी मलाच विचारावे: हे 'सुंदर' आहे की 'कुरूप'? हे 'बरोबर' आहे की 'चूक'? असे विचारू नये. इस्लामी परिभाषा अर्थपूर्ण असून ग्रीक संकल्पनांशी संबंधित असल्याचा तिला इतिहास आहे. या प्रश्नाचे उत्तर द्यायचे तर आपल्याला शरीअ किंवा फिकाह्च्या आज्ञा तपासाव्या लागतील. शरीअ आणि फिकाहा ही नावे मुस्लिम विधिज्ञांनी आपल्या विधिपद्धतीस दिलेली आहेत. तपासणीअंती आपल्या असे लक्षात येईल की, कुराणातून किंवा सुन्नामधून मिळालेले या अनुमानित केलेले, वा ज्यांच्याबद्दल विद्वज्जनांत एकवाक्यता आहे असे एखाद्याचे हक्क वा कर्तव्ये ह्यासंबंधीचे ज्ञान म्हणजे फिकाह किंवा इस्लामप्रणित विधिशास्त्र अशी व्याख्या जवळपास सर्वत्र केली जाते.

स्नाउक हुरग्रॉंजच्या, फिकह हा 'कर्तव्यांचा सिद्धांत आहे' या उपरिनिर्दिष्ट विधानाच्या स्पष्टीकरणार्थ, इस्लाममधील 'हक्क' आणि 'कर्तव्ये' यासंबंधी इथे एक गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे. (इस्लाममध्ये) सर्वसामान्यत: दिवाणी किंवा फौजदारी हक्क नाहीत असा याचा अर्थ होतो काय? तर याचे उत्तर असे की इस्लामी विधिशास्त्रात 'हक्कां'चे वर्गीकरण दोन प्रकारात केलेले आहे: ईश्वराचे हक्क (हुकूकुल-लाह) आणि माणसांचे हक्क (हुकूकुल-इबाद). इस्लामी संकल्पनेप्रमाणे ईश्वराला हक्क आहेत पण कोणतीच बंधने वा कर्तव्ये नाहीत. तो जे कायदे घालून देतो ते माणसाने सद्सद्विवेकपूर्वक पाळलेच पाहिजे; पण माणसाच्या कृत्यांमुळे वा त्याने केलेल्या उपासनेमुळे प्रसन्न झालेच पाहिजे असे बंधन ईश्वरावर नाही. मुक्तीसाठी परमेश्वरी कृपा आवश्यक आहे आणि ती परमेश्वरी ईहेची स्वतंत्र कृती आहे, माणसाच्या सद्वर्तनामुळे ईश्वराला झालेल्या संतोषाशी तिचा संबंध नाही. ईश्वराचे हक्क हे माणसाच्या हक्कांपेक्षा अगदी वेगळे आहेत. माणूस जर ईश्वराच्या इच्छेनुसार वागत

असेल, तर त्याने आपल्या बांधवांशी चांगुलपणाचे, सौहार्दाचे आणि न्यायाचे वर्तन केले पाहिजे. 'जो लोकांची सर्वाधिक सेवा करतो तो' 'माणसांमध्ये सर्वोत्तम' आणि प्रेषित आहे. माणसामाणसांना आपापसात हक्क आणि कर्तव्ये आहेत, पण ईश्वराच्या संदर्भात मात्र माणसाला फक्त कर्तव्येच आहेत, हक्क नाहीत.

आपण वर पाहिल्याप्रमाणे कायदा दोन ठळक प्रकारात विभागलेला आहे – 'मुळे' (उसूल) आणि 'शाखा' (फुरू)[10] 'मुळे' ही आपल्या विधिशास्त्रासारखी आहेत, कायद्याच्या कुराण, सुन्ना (प्रेषिताचे आचरण), इज्मा (अभिजात विधिपंडितांमधील एकवाक्यता) आणि कियास (सादृश्य–अनुमान) या चार अभिजात उगमस्थानांचे ते शास्त्र आहे. पण इथे आपला अभ्यास थांबत नाही. कारण या ठराविक उगमस्थानांच्याच जोडीला (अ) सादृश्य–अनुमानाला फुटलेले फाटे (उदाहरणार्थ, इस्तिस्लाह, इस्तिद्लाल इस्तिस्हाब आणि इस्तिहसान); आणि (ब) कायद्याचे भौतिक आधार, उदाहरणार्थ, रूढी, इतर विधिपद्धतींचा प्रभाव, लोकमताचा रेटा, बदलती समाजस्थिती आणि 'काळाच्या अवस्था व गरजा.'[11] 'शाखां–' मध्ये दैनंदिन जीवनात–तद्वतच न्यायालयात लागू होणारे विशिष्ट नियम निर्धारित केलेले आहेत.

'मुळे' आणि 'शाखा' यात होणारे हे कायद्याचे वर्गीकरण समजून घेतल्यानंतर आता आपण विशिष्ट शाखेकडे, म्हणजे आपल्या (विषयाच्या) संदर्भात प्रस्तुत ठरणाऱ्या विशिष्ट नियमाकडे वा आज्ञेकडे (हुक्म) जाऊ. आणि इथे असे दिसते की नीती व धर्म यांची कायद्याच्या विधिरूप आदेशांमध्ये (Positive dictates) इतकी सरमिसळ झाली आहे की त्यांना वेगळे काढणे दुरापास्त आहे. मुस्लिम कायदा 'सर्वंकष' आहे. या पृथ्वीतलावरची माणसाची प्रत्येक कृती तो नियंत्रित करतो; मुस्लिम विधिज्ञांनी केलेल्या काटेकोर व तर्कदृष्ट्या अचूक वर्गीकरणातून कोणतीही मानवी कृती– मग ती कितीही क्षुद्र व क्षुल्लक का असेना–– सुटलेली नाही.

मानवी कृतींचे वर्गीकरण पाच प्रकारात केले आहे : (१) अनिवार्य (absolute) (फर्ज) कृती– ज्या करण्याची आज्ञा निरपवाद आहे. उदा. दिवसातून पाच वेळा नमाज पढणे; (२) शिफारसवजा (मंदूब), पण सक्तीच्या नसलेल्या कृती. उदा. खैरात (परोपकार बुद्धीने पैसा देणे); (३) क्षम्य (मुबाह) कृती– इथे कायदा तटस्थ आहे. एखादी गोष्ट करायची तर करा किंवा करू नका, उदा. विमानाने प्रवास करणे; (४) निषिद्ध (मकूह) कृती– उदा. विशिष्ट प्रकारचे मासे खाणे; आणि शेवटी (५) पूर्णतया निषिद्ध (हराम) कृती, उदा. डुकराचे मास खाणे.[12]

एखादा संघटित समाज जी अनुसरील अशी आज्ञापालनाची मानके प्रस्थापित करणे आणि ती पाळली जातील याची दक्षता घेणे या गोष्टींशी आधुनिक कायद्यांचा

संबंध असतो, तो साल्मंडच्या विश्लेषणात म्हटल्याप्रमाणे, राज्यसत्तेने अंमलात आणलेल्या आणि जनतेने मान्य केलेल्या तत्त्वांचा समुच्चय असतो. इस्लाममध्ये तसे नाही: आज्ञापालन हे फक्त ईश्वराचेच करायचे असतें; राजा हा केवळ त्याची पडछाया आहे; खलिफा हा केवळ ईश्वराचा सेवक आहे. कायद्याचा पहिला मूळ आधार सद्सद्विवेकबुद्धी हा आहे. ' बरोबर काय आणि चूक काय याची एकप्रकारची जाणीव किंवा संवेदना ( मारिफा ) म्हणजे कायदा ' अशी इब्न खाल्दून आणि अबू हनीफा या दोघांनी व्याख्या केली आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणून कायद्याचे पालन व्हावे या हेतूने इस्लामी विधिशास्त्राने दोन आधार निर्माण केले आहेत–प्राथमिक आधार आणि दुय्यम आधार. ईश्वराची कृपादृष्टी आपल्याकडे वळवण्याची मानवी सद्सद्विवेकबुद्धीची इच्छा हा प्राथमिक आधार; तर दुय्यम आधार समाजनिर्मित असतात. उदा० राजाच्या नावाने राज्यसंस्थेने वैधानिक आज्ञांची केलेली अंमलबजावणी.

आधुनिक कायद्याच्या परिभाषेत बोलायचे झाल्यास, इस्लामी कायद्याच्या रचनेत अंतिम आधार म्हणून ईश्वराचा प्रवेश मानवी सद्सद्विवेकबुद्धीच्या द्वारा झाला आहे. त्यामुळेच धर्म, नीती व कायदा इस्लामध्ये इतके परस्परात मिसळले आहेत की प्राचीन ग्रंथकर्त्यांनी त्यांच्या मुख्य घटक-तत्वांमध्ये कधी फरक केलाच नाही. न्या. महमूद या महान मुस्लिम विधिज्ञाच्या पुढील शब्दांचा अर्थ आता आपल्या लक्षात येऊ शकेल : ' हे लक्षात ठेवले पाहिले की हिंदु कायदा व मुस्लिम कायदा हे धर्माशी इतके निगडित झाले आहेत की सहजासहजी ते त्याच्यापासून तोडता येणे शक्य नाही. '[११] हिंदुधर्म व इस्लाम अशांसारख्या काही धर्मांमध्ये असा सिद्धांत आहे की, अंतिमत: कायदा हा ईश्वराचा शब्द आहे. कायदा ईश्वरनिर्मित आहे हा सिद्धांत कायद्याच्या भाषेत सांगायचे तर एक वैधानिक ' कल्पना ' आहे. अखेर जे केवळ एक वैधानिक मानक आहे त्याच्यासाठी एक अत्यंत परिणामकारक नैतिक आधार निर्माण करणे एवढाच तिचा मुख्य हेतु आहे. जुन्या राष्ट्रांच्या ठिकाणी जेव्हा पुरेशी शिस्त, आणि कायद्याला केवळ कायदा म्हणून पाळण्याची सामाजिक जाणीव बाणलेली नव्हती तेव्हा, कायदा निमूटपणे पाळला जावा यासाठी, ईश्वरी कोपाच्या रूपाने भीतीचे आणि ईश्वरी कृपेच्या रूपाने आनंदाचे तत्व त्यांनी अंमलात आणले. मेन ( Maine ) यानेही हेच सांगितले आहे. तो काहीसे भरमसाट विधान करतो. ' चीनपासून पेरूपर्यंत इतिहासाला ज्ञात असलेली अशी एकही विधिपद्धती नाही की जी प्रथम निदर्शनास आली त्यावेळी धार्मिक विधींच्या आणि कर्मकांडाच्या जंजाळात अडकलेली नव्हती. '[१४] अशीरियन लोकांच्या कायद्याविषयी व हम्मुराबीच्या आज्ञांविषयी जी संशोधने अलीकडे झाली आहेत त्यावरून या विधानातील खोटेपणा उघड होत असला तरी मनुस्मृति, हिब्रू पेंटॅटयूक ( Pentateuch ), रोमनांची ' टेल्व टेबल्स ' आणि इस्लामी कायदा यांच्या संदर्भात मात्र ते बऱ्याच अंशी खरे आहे.[१५]

## ॥ २ ॥

व्यापक अर्थाने धर्म म्हणजे मानव आणि अदृश्य अ–मानवी 'तत्त्व' यांच्यातील संबंध असे म्हणता येईल."[1] आधुनिक जगात काही अंतिम प्रश्नांसंबंधी सामान्यतः तीन प्रकारचे दृष्टिकोण दिसून येतात : (अ) एक देव किंवा अनेक देव आहेत (आस्तिक्य); (ब) देव नाही किंवा नाहीत (नास्तिक्य); (क) देव आहे / आहेत की नाही / नाहीत हे आम्हाला ठाऊक नाही (अज्ञेयवाद). जगातील महान धर्म हे शिकवतात की ईश्वर आहे, किंवा अनेक दुय्यम देवतांमध्ये एक परमेश्वर आहे; तत्त्वज्ञानविषयक स्वतंत्र चिंतन करणारे प्रसंगी अशा निर्णयाप्रत येतात की ईश्वर आहे की नाही या प्रश्नाचा निर्णय लावणे महत्त्वाचे नाही – ते अज्ञेयवादी होत; आणि जे जडवादी आहेत त्यांचे असे ठाम मत आहे की ईश्वर अस्तित्वात नाही आणि विश्व हे ईश्वररहित आहे असा ठाम विश्वास बाळगूनच आपण वागले पाहिजे. या टोकांच्या दरम्यान श्रद्धा, अश्रद्धा व न–श्रद्धा यांचे असंख्य प्रकार आहेत; पण एकेश्वरवादाच्या विशुद्ध प्रकाराची शिकवणूक देणाऱ्या इस्लामचा विचार आपण करीत असल्यामुळे देकार्तने केलेली धर्माची व्याख्या उपयुक्त ठरते. तो असे म्हणतो की, धर्माची शास्त्रीय व्याख्या पुढील पाच विधानांमध्ये संक्षेपाने मांडता येऊ शकेल :

१. एक सर्वश्रेष्ठ न्यूमेन आहे. त्याचे पुढील अकरा गुणविशेष आहेत : तो पवित्र, स्वयंसिद्ध, आदिकारण, सर्व वस्तूंमधील ऊर्जा व हेतू, चिरंतन, सत्, न्यायी, शुभ, अनंत, सर्वशक्तिमान् आणि स्वतंत्र आहे;

२. या परमेश्वराची उपासना करणे हे माणसाचे कर्तव्य आहे;

३. सदाचार आणि भक्तिभाव हे या उपासनेचे घटक होत;

४. या न्यूमेनविरुद्ध केलेल्या पापाचा पश्चात्ताप व परिहार झालाच पाहिजे;

५. हे जग नैतिक तत्त्वांनी नियंत्रित झाले आहे; म्हणजे असे की माणसाला त्याच्या कृत्यांचे बक्षीस भावी आयुष्यात मिळते; [17]

इस्लामच्या सारतत्त्वांची याहून अधिक चांगली व्याख्या दिली जाऊ शकत नाही; फक्त काही उपासनाविधी, वैधानिक तत्त्वे आणि श्रद्धेच्या काही बाजूंबाबत इस्लामी श्रद्धा आपला वेगळा मार्ग अनुसरते.[१८] सर्व सेमिटिक एकेश्वरी धर्माप्रमाणेच इस्लामनेही सर्वशक्तिमान्, सर्वज्ञ, न्यायी, एका आणि एकमात्र ईश्वरावर विलक्षण भर दिला आहे. डॉ बायक (Baeck) – ने जे यहुदी धर्माबद्दल म्हटले आहे ते इस्लामबद्दलही खरे आहे :

'अतिसंक्षिप्त स्वरूपात ( यहुदी धर्म म्हणजे ) **एकम्**ची कल्पना व आव्हान आहे. ही आव्हान देणारी कल्पना प्रथम **एक** वस्तू आहे, अशी एक वस्तू जी आवश्यक आहे, जिच्यासंबधी आज्ञा दिली गेली आहे, जी योग्य ( Right ) आणि सत् ( Good ) आहे. दुसरे आणि मुख्य असे की ज्या **एकमात्राने** या **एकमेव** गोष्टीला घोषित केले आहे आणि माणसाकडून तिची अपेक्षा बाळगली आहे अशा त्या **एकमात्र** ईश्वराशिवाय अन्य कोणीही नाही. आणि शेवटी मानवमात्राचे ऐक्य व साकल्य हाच त्याचा अर्थ आहे. म्हणजे असे की याच **एकमेव** गोष्टीद्वारे मानवाने **एका** आणि **त्याच एका** ईश्वराची अंत:करणपूर्वक व आत्मसमर्पण भावाने सेवा करावी. मोझेस–( मुसा )– पासूनच्या सगळ्या प्रेषितांनी जे आजपर्यंत शिकवले, ज्या ज्या मार्गांनी धर्माचे नवनवे अवतार झाले आणि ज्या मार्गांनी तो आविष्कृत झाला ते कितीही भिन्न असले तरी सत्य एकच आहे आणि ते म्हणजे एक परमेश्वर '[१९]

यहुदी धर्माचा भर न्याय आणि योग्य ( Right ) वर; ख्रिस्ती धर्माचा प्रेम आणि परोपकार ह्यावर; इस्लामचा भ्रातृभाव आणि शांतता यांच्यावर. परंतु तपशीलाची काटेकोरपणे चिकित्सा करण्याच्या भरात या तीन धर्मश्रद्धांमधील ठळक व मूलभूत साधर्म्यस्थलांकडे दुर्लक्ष होता कामा नये. उदा० आत्म्याचे हे उदात्त तळमळीचे बोल ऐका :

> ( हे पैगंबरा ! ) तूं ( तर ही ) प्रार्थना कर की, हे परमेश्वरा, ( साऱ्या) राज्याचे मालका ! तूच ज्याला इच्छितोस त्याला राज्य देतोस; आणि तूंच ज्याच्यापासून इच्छितोस त्याच्यापासून राज्य काढून घेतोस आणि तूच ज्याला इच्छितोस त्याला इज्जत–अब्रू देतोस, व तूच ज्याला इच्छितोस त्याला नमवतोस. ( हरतऱ्हेचें हित व ) कल्याण तुझ्याच हातीं आहे. नि:संशय तू सर्वशक्तिमान आहेस.

तूच ( उन्हाळयांत ) रात्रीस ( घटवून ) दिवसात सामील करतोस व तूंच ( हिवाळयांत ) दिवसास घटवून रात्रीत सामील करतोस; आणि तूंच निर्जिवांतून सजीव व तूंच सजीवांतून निर्जीव काढतोस, व तूंच ज्याला इच्छितोस त्याला बेसुमार देतोस.

( कुराण ३, २६–२७ )

( लोकांनो ! तो दिवस दृष्टीपुढें ठेवा कीं ) ज्या दिवशी दरेकजण, जें कांहीं बरेंपण ( जगांत ) तो करून गेला असेल तें परमेश्वरासमीप हजर पावेल; व ( ह्याचप्रमाणे ) जें कांहीं वाईटपण करून गेला तेंही ( तो हजर पावेल. ) तो अशी हांव घालील कीं त्या दिवसाच्या व आपल्या दरम्यान लांबलचक अवधि असता तर ( बरें होतें ! ) आणि परमेश्वर तुम्हांस आपल्या ( जाज्वल्यत्वा )–कडून भिववितो. ...

( हे पैगंबरा ! या लोकांस ) सांगून दे कीं जर तुम्हीं परमेश्वरांशीं प्रीति ठेविता तर तुम्ही माझें अनुकरण करा; म्हणजे परमेश्वरही तुम्हांशीं प्रीति ठेवील व तुम्हांस तुमचे अपराध क्षमा करील आणि परमेश्वर क्षमाशील व दयाळू होय.

( कुराण ३, ३०–३१ )

परमेश्वर कोणाहि मनुष्यावर, ( जितका बोजा उचलण्याची ) त्याची ताकद असेल तितकाच मात्र बोजा टाकतो. त्यानें जीं ( चांगलीं कामें ) केलीं तीं त्याचीं त्यालाच; व त्यानें जीं ( वाईट कामें ) केलीं तींही त्याचीं त्याच्याच पुढें ( येतील ).

हे आमच्या पालनकर्त्या ! जर आम्ही भुलून जाऊं अगर चुकून जाऊं, तर ( त्याबद्दल ) तूं आम्हाला धरूं नकोस ... ... आणि हे आमच्या पालनकर्त्या ! ज्या ( ज्या उचलण्या )– ची आम्हाला ताकद नाहीं असें ओझें आम्हांपाशी उचलवूं नकोस आणि तूं आमचीं पापें पुसून टाक व आम ( –च्या अपराधा )– ची क्षमा कर व आमच्यावर दयादृष्टी असू

दे. तूंच आमचा ( पुरस्कर्ता व ) मददगार आहेस. तर जे लोक नास्तिक आहेत त्यांच्याविरुद्ध तू आम्हांस साह्य कर.

( कुराण २, २८६ )

मुस्लिमांच्या धर्मश्रद्धेचे सार ह्या सूत्रवचनात व्यक्त झाले आहे :

(अ) ईश्वर एकच आहे, आणि (ब) मुहम्मद त्याचा प्रेषित आहे. कुराण हा ईश्वराचा शब्द आहे, आणि त्यामुळे ते प्रत्यक्ष प्रकटीकरण आहे; प्रेषितांचे आचरण ( सुन्ना ) हे अप्रत्यक्ष प्रकटीकरण आहे, आणि म्हणून ते अभ्यासपात्र व अनुसरणीय आहे परमेश्वरी अनुग्रहावाचून जी अज्ञातच राहिली असती अशा या दोन उगमस्थानां(मंकूल)–मधूनच मानवी बुद्धीने कायदा आणि धर्मशास्त्रे ( मअकूल ) यांचा डोलारा उभा आहे; जेव्हा नवी परिस्थिती निर्माण होते तेव्हा जुनी तत्वे नव्या परिस्थितीला लागू होत नाहीत की काय ? असा प्रश्न माणूस विचारतो. या प्रक्रियेत प्रसंगी विधिज्ञांमध्ये एकवाक्यता होते, कधी ती होत नाही ( इज्मा ,कियास ) पण काहीही झाले तरी सतत विकास होतच असतो, आणि नव्या मागण्यांना नवी उत्तरे हवीच असतात. ' बदलत्या काळानुसार कायद्याचा अर्थ बदलला जातो, हे सर्वसामान्य झालेले सत्य आहे.' ( मेजेल्ले, कलम– ३९ ) कायदा आणि धर्म यांचे उगमस्थान एकच असल्यामुळे त्यांचे मीलनही संपूर्ण असते; परंतु इतिहासाचे धडे, समाजाच्या बदलत्या स्थिती, सभ्यतेचा नित्य परिवर्तनशील आकृतिबंध आणि आधुनिक जगातील आर्थिक संरचनेची क्रमविकासात्मक प्रक्रिया– या गोष्टी शरीआने पुरेशा प्रमाणात लक्षात घेतल्या नाहीत त्यामुळे परिणाम असा झाला आहे की, एकंदरीत इस्लामी कायदा जगाच्या बऱ्याच भागांमध्ये मागासलेला आणि अविकसित राहिला आहे. [२०]

॥ ३ ॥

## अ) प्रेषिताचा धर्मोपदेश

इस्लाममध्ये कायदा आणि धर्म ही एकरूप झाली आहेत हे इस्लामचे काही प्राचीन साहित्य तपासून दाखवता येईल. त्यासाठी काही साधनलेखांचे विश्लेषण करण्याचे इथे योजिले आहे : (१) प्रेषिताचा अंतिम धर्मोपदेश (२) उमरने काजीला केलेल्या सूचना, आणि (३) अलीचा वसियतनामा म्हणून काजी नूमानच्या ' व आईमुल् इस्लाम '

मध्ये समाविष्ट असलेले, सापेक्षतः अज्ञात असे, इस्लामचे शियापंथीय सूत्रीकरण. ( नूमान मृ. कायरो, ३६३/९७४ )

अंतिम धर्मोपदेश ( Last Surmon )–पासून प्रारंभ करणे सोयीचे ठरेल; त्याची बरीच भाषांतरे झाली आहेत आणि त्यात इस्लामच्या प्रारंभिक अवस्थेतील तत्त्वांचे थोडक्यात निरूपण आलेले आहे.[११] या प्रसंगाचे प्रशंसनीय वर्णन अमीर अलीने केले आहे : अरबस्तानातल्या झुंडीच्या झुंडी जेव्हा त्याच्या धर्मात प्रवेश घेण्यासाठी येऊ लागल्या तेव्हा प्रेषिताला वाटले की, आपले कार्य संपले आहे, आणि आपला अंत आता जवळ आला आहे असे वाटून मक्केची एक अखेरची ( निरोपाची ) यात्रा करण्याचा त्याने निश्चय केला. ख्रिस्तोत्तर इ. स. ६३२ च्या २३ फेब्रुवारी रोजी ( २५ जुलकर्जा हिजरी शके १० ) मदिना सोडून मुसलमानांच्या प्रचंड समुदायाबरोबर प्रेषित निघाला. मक्केला पोचल्यावर हजचे सर्व विधी पूर्ण करण्यापूर्वी जमलेल्या गर्दीसमोर जबल अल्–अरफातच्या शिखरावरून त्याने अशा शद्वात वक्तव्य केले ( ८ जुल–हिज्जा / ७ मार्च ) की सर्व मुसलमानांच्या अंतःकरणात ते कायम निनादत राहील.[१२]

म्यूर आणि अमीर अली यांनी दिलेली भाषांतरे स्वैर असून त्यात बाहेरचे अंश समाविष्ट झालेले असल्यामुळे इब्न हिशामच्या संहितेचे माझे स्वतःचे भाषांतर देण्याचा माझा इरादा आहे. संदर्भाच्या सोयीसाठी मी तिच्या परिच्छेदांना क्रमांकही देत आहे :

१. हे लोकांनो, माझे शद्व लक्ष देऊन ऐका; कारण या वर्षानंतर मी तुम्हाला पुन्हा या जागी कधी भेटेन की नाही मला ठाऊक नाही.

२. हे लोकांनो, तुमची जीविते व वित्त ( कयामतच्या दिवशी ) तुम्ही आपल्या पालनकर्त्यासमोर उभे राहाल तोपर्यंत पवित्र आणि अबाध्य आहे. आजचा हा दिवस आणि हे वर्षसुद्धा पवित्र आणि अबाध्य आहे. आणि, निःसंशय, तुम्ही आपल्या पालककर्त्यासमोर उभे राहाल. तो तुम्हाला तुमच्या कृत्यांबद्दल जाब विचारील.

३. आणि निःसंशय मी तुम्हाला हा संदेश दिलेला आहे. म्हणून ज्या कुणाजवळ एखादी गोष्ट सुरक्षित ठेवण्यासाठी सोपवलेली असेल त्याने ती त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्याला परत करावी.

४. व्याजाने कर्ज देणे सर्वतोपरी बेकायदेशीर ( शद्वशः– रद्द ) घोषित करण्यात येत आहे; तरीही मुद्दल मिळवण्याचा तुम्हाला हक्क आहे. कोणावरही

अन्याय करू नका; आणि तुमच्यावर कोणताच अन्याय केला जाणार नाही. ईश्वराने अशी आज्ञा केली आहे की, व्याजी कर्जे असणार नाहीत आणि निःसंशय अब्बास बिन अब्द-अल्-मुत्तलिब याला देण्यात यायचे व्याज संपूर्णपणे रद्द करण्यात येत आहे.

५. आणि, निःसंशय, रक्ताचा बदला घेण्याची इस्लामपूर्वकाळातील [२३] प्रथा यापुढे मना केली आहे आणि इब्न रबीय बिन अल् हारिस बिन अब्द अल् मुत्तलिब याचे रक्तवैर [२४] हे मी बेकायदेशीर ठरवलेले पहिले असे युद्ध आहे. त्यांच्यापासूनच मी इस्लामपूर्वकाळातील रक्त-वैर ( रद्द करण्यास ) प्रारंभ करतो.

६. या तुमच्या भूमीत इःतपर आपली पूजा होणे अशक्य दिसल्यामुळे सैतान निराश झाला आहे. तुमच्या हातून क्षुल्लक चुका झाल्या तरी, तुम्ही त्याच्या आज्ञा इतर सर्व बाबतीत जरी पाळल्या तरी, तो अतिसंतुष्ट होईल म्हणून आपल्या श्रद्धेची नीट काळजी घ्या.

यानंतर प्रेषिताने कालनिर्णयाबद्दल आणि अधिक मासाच्या वर्षाबद्दल झालेल्या चुकांसंबंधी वक्तव्य केले (पाहा, कुराण, ईजिप्तची सरकारी आवृत्ती, ९, ३६- ७). तो पुढे म्हणाला :

७. हे लोकांनो, तुम्हाला तुमच्या स्त्रियांवर म्हणजे बायकांवर हक्क आहेत; आणि त्यांनाही तुमच्यावर अन्योन्याश्रयी हक्क आहेत. तुम्हाला त्यांच्याविरुद्ध असा हक्क आहे की, तुम्हाला न आवडणाऱ्या ( पुरुषा )-शी संबंध ठेवून त्यांना तुमच्याशी अप्रामाणिक होता येणार नाही किंवा राजरोस दुराचार करता येणार नाहीत. [२५] पण त्या जर पापाचरण करू लागल्या तर त्यांना शयनागारात बंदिस्त ठेवण्याची आणि त्यांना माफक प्रमाणात चोप देण्याची परवानगी तुम्हाला ईश्वराने दिली आहे. [२६] आणि जर त्यांना पश्चाताप झाला तर त्यांना दयाळूपणे अन्न आणि वस्त्र-प्रावरणे द्या.

८. स्त्रियांशी सभ्यपणे वागा, कारण निःसंशय त्या तुमच्या ताब्यात आहेत; त्यांच्याजवळ स्वतःचे असे काहीच नसते. ईश्वराला दिलेल्या हमीवरच

तुम्ही त्यांना स्वीकारलेले असते, आणि ईश्वराच्या स्पष्ट आज्ञेबरहुकूम त्यांच्या शरीरांना तुम्ही स्वतःपुरते कायदेशीर केले आहे.

९. म्हणून माझे शब्द समजून घ्या. हे लोकांनो, कारण निःसंशय, मी (हा संदेश) दिलेला आहे आणि अशी एक स्पष्ट गोष्ट [२७] उदा० ईश्वराचा ग्रंथ आणि प्रेषिताचे आचरण,– मी तुमच्या हवाली करून जात आहे. तुम्ही जर त्यांना दृढ धरून राहिलात तर तुम्ही कधीच पथभ्रष्ट होणार नाही.

१०. हे लोकांनो, माझे शब्द लक्ष देऊन ऐका व ते समजून घ्या. निःसंशय, हे समजा की, प्रत्येक मुसलमान हा दुसऱ्या प्रत्येक मुसलमानाचा भाऊ आहे आणि मुस्लिम (समाज) हा एक भ्रातृसंघ आहे. [२८] आपल्या भावाच्या मालकीची असलेली कोणतीही गोष्ट जोपर्यंत मोकळ्या मनाने व सद्भावनेने दिली जात नाही तोपर्यंत माणसासाठी ती कायदेशीर ठरत नाही. म्हणून आपल्या स्वतःशीच तुम्ही गैरवर्तन करू नका.

११. आणि प्रेषित म्हणाला : हे परमेश्वरा, मी ( तुझा संदेश ) दिला आहे काय ? आणि मला ( इब्न हिशामिला ) असे सांगण्यात आले की, लोक ( तेव्हा ) म्हणाले, होय रे परमेश्वरा. आणि प्रेषित म्हणाला : हे परमेश्वरा, तू साक्षी आहेस. धर्मोपदेशाच्या संहितेनंतर प्रेषिताची अन्य काही वचने इब्न हिशामने निर्देशिली आहेत. त्यापैकी दोहोंचा अंतर्भाव कायद्याच्या समुच्चयात करण्यात आला आहे. (१) मृत्यूपत्रान्वये वारसासाठी काही ठेवणे बेकायदेशीर आहे; [२९] आणि (२) शय्येला मूल आणि व्यभिचारी पुरुषाला दगड, म्हणजे असे की व्यभिचारी पुरुष आपल्या अनैतिकेच्या फळावर ( म्हणजे अनैतिक संबंधापासून जन्मलेल्या अपत्यावर ) हक्क सांगू शकणार नाही, किंवा अनौरस पुत्र आपल्या मानीव ( Putative ) बापाचा कायदेशीर मुलगा म्हणून हक्क सांगू शकणार नाही.

आता आपण या दस्तऐवजाची छाननी करून त्यात समाविष्ट असलेल्या भागांची चिकित्सा करू या. यातील दुसरा परिच्छेद वैधानिक आणि धार्मिकही आहे. त्यात जीवित आणि वित्त यांना पवित्र ठरवले गेले आहे, आणि यहुदी व ख्रिस्ती धर्माप्रमाणेच निर्णयाच्या दिवसाचा सिद्धांत पुरस्कारिला आहे. तिसरा परिच्छेद हा वैधानिकपेक्षा नैतिक आहे. पण तो न्यासांच्या पवित्र स्वरूपावर भर देतो. चौथा परिच्छेद व्याजाने

कर्ज देण्यास बंदी घालण्याविषयीचा सर्वपरिचित असा आहे. व्याजी कर्जाला तो मनाई करतो, त्या हद्दीपर्यंत तो वैधानिक आहे, पण हा नियम लगेच अंमलात आणून खुद्द आपले काका अब्बास यांना प्राप्त झालेले हक्क रद्द ठरवण्याचे प्रेषिताचे कृत्य धाडसाचे आणि न्यायाचे ठरते. पाचवा परिच्छेद हा नैतिकतेची छटा असलेला कायदा आहे. त्यान्वये सूडभावना ( -वृत्ती ) नष्ट करण्यात आली होती. सहाव्या परिच्छेदात निखळ धर्मशास्त्रीय कल्पना असून सर्व दुष्प्रवृत्तींचा जनक जो सैतान त्याच्या अपायकारक प्रभावावर त्यात भर दिलेला आहे. सातवा आणि आठवा परिच्छेद नैतिक व सामाजिक क्षेत्रांना एकजीव करणारे महत्त्वाचे वैधानिक नियम आहेत. पहिल्यानुसार स्त्रियांना शिक्षा करण्याचा अधिकार पुरुषांना मिळतो तर दुसरा त्यांना कृपावंत होण्याचा सल्ला देतो. विसाव्या शतकातील कोणतेहीं न्यायालय अशी शारीरिक दंडाद्वारे सुधारणा घडवून आणण्याच्या उपायाचे समर्थन करणार नाही.

पालनकर्त्याचा आदेश लोकांपर्यंत पोचवण्याचे कर्तव्य प्रेषिताने पूर्ण केल्याचे नववा परिच्छेद जाहीर करतो. परमेश्वराचा शद्ब आणि प्रेषिताचे उदाहरण ( आचरण ) हे जे कायद्याचे दोन उगम आहेत त्यांच्या पाठीशी बंधनकारतेचे ( सामर्थ्य ) अधिष्ठान उभे करणारे प्राचीनतम व सर्वात अधिकृत नियम त्यात आहेत. मुसलमानांमधील मातृभाव या इस्लामच्या लोकप्रिय सिद्धांताचे निरूपण दहाव्या परिच्छेदात आहे. या लोकोत्तर दस्तऐवजाचे ज्याला 'शाबिती कलम' (Verification Clause ) असे म्हणता येईल ते अकराव्या परिच्छेदात आहे. आपण केलेल्या गोष्टींसाठी प्रेषित पालनकर्त्याला साक्षी राहण्यास सांगतो. त्याच्या कार्याची ही सांगता आहे. उरलेले दोन नियम हे स्पष्टपणे विधिनियम आहेत.

एक कुराण वगळता अखेरच्या धर्मोपदेशाइतका दुसरा कोणताच ग्रंथ मुसलमानांच्या दृष्टीने पूज्य नाही. गिरिशिखरावरील धर्मोपदेशाशी ( Sermon on the Mount ) त्याची तुलना केली जाते. आणि इस्लामी शिकवणुकीचा प्राण असलेल्या या धर्मोपदेशात कायदा आणि धर्म परस्परात पूर्णपणे मिसळले आहेत.

## ब) उमरन काजीला दिलेल्या सूचना

ज्याच्याकडे लक्ष वेधले जाते असा दुसरा दस्तऐवज म्हणजे थोर उमर बिन अल् रक्ताब, इस्लामचा दुसरा खलिफा, याने अबू मुसा अल् अशरी जेव्हा काजी ( न्यायाधीश ) म्हणून नियुक्त झाला तेव्हा त्याला लिहिले असल्याचे ज्याच्याबद्दल सांगितले जाते ते पत्र. त्या पत्राची जी संहिता आपल्यापर्यंत आली आहे तिच्या अवस्थेवरून ते पत्र निर्दोष हदीस इतकेच अधिकृत असावे असे दिसते. १९१० सालाइतक्या

पूर्वी मार्गोलिऑथने ( Margoliouth ) या दस्तऐवजाचे, त्याला भाषांतर व टीपा जोडून संपादन केले हे विधि-अभ्यासकांचे नशिबच म्हणावे लागेल. त्यामुळे मी इथे मार्गोलिऑथचेच इंग्रजी भाषांतर आधी देईन आणि पुढे भाष्यवजा टिपणे करीन. मार्गोलिऑथच्या मूळ भाषांतरात नसलेली अशी परिच्छेदात्मक मांडणी संदर्भाच्या सोयीसाठी केलेली आहे. [१०]

## उमरच्या सूचना :

१. कुराणाच्या निःसंदिग्ध आज्ञा वा अनुसरणीय सुन्ना ( अंमलात आणणे हे ) न्यायाधीशपदाचे कार्य आहे. जेव्हा तुमच्यासमोर मुद्दे ( पक्ष-प्रतिपक्ष ) मांडले जातील तेव्हा तुम्ही हे लक्षात असू द्या, कारण आधारांवाचून केलेले प्रविधान ( Plea ) निरर्थक आहे.

२. तुमच्या न्यायालयात आणि तुमच्या नजरेत सर्व मुसलमानांना समान लेखा; म्हणजे मग तुम्ही ( त्यांच्या बाजूने ) पक्षपाती व्हावे अशी अपेक्षा वरिष्ठ स्थानावरील व्यक्ती करणार नाहीत किंवा गरीब लोक तुमच्याकडून न्याय मिळण्याबाबत निराश होणार नाहीत.

३. हक्क सांगणाऱ्याने ( वादीने किंवा दावेदाराने ) पुरावा सादर केलाच पाहिजे; बचाव पक्षाकडून ( प्रतिवादी ) शपथ घेववावी.

४. कोणत्याही कायद्याचा भंग होत नसल्यास मुसलमानांमध्ये तडजोड करू दिली जावी.

५. तुम्ही जर एखादा निर्णय दिला असला आणि फेरविचारान्ती तुमते मत बदलले, तर माघार घेण्याच्या आड तुमचा आधीचा निर्णय येऊ देऊ नका; कारण न्याय रद्द केला जाऊ नये, आणि अन्याय जारी ठेवण्यापेक्षा माघार घेणे चांगले हे तुम्ही लक्षात घ्या.

६. ज्या बाबी तुम्हाला बुचकळ्यात पाडीत असतील व ज्यांना कायदा वा सुन्ना ( यापैकी एकही ) लागू पडत नसेल त्यांच्यासंबंधात तुम्ही तुमची बुद्धी वापरा; साधर्म्यसिद्धांताचा अभ्यास करा. नंतर ( सर्व ) गोष्टींची तुलना करा आणि ईश्वराला जो सर्वाधिक संतोषकारक वाटेल आणि तुमच्या न्यायदृष्टीशी जो सर्वांत जुळणारा असेल असा निर्णय द्या.

७. जर एखाद्याने प्रतिवादीच्या अनुउपस्थितीत दावा आणला असेल तर प्रतिवादीला उपस्थित राहण्यासाठी मुदत ठरवून द्या, आणि त्यानंतर जर वादी पुरावा सादर करू शकला तर त्याचा दावा मान्य करा. अन्यथा त्याच्याविरुद्ध निर्णय देण्याचा तुम्हाला अधिकार राहील.

८. ज्यांना ठराविक शिक्षा असलेले गुन्हे केल्याबद्दल फटक्यांची सजा झालेली आहे, ज्यांनी खोटया साक्षी दिल्या असल्याचे सिद्ध झालेले आहे आणि रक्ताच्या वा मेहरबानीच्या नात्यामुळे पक्षपाती होतील असा ज्यांच्याबद्दल संशय आहे असे लोक वगळून इतर सर्व मुसलमान साक्षीदार म्हणून विश्वसनीय असतात.

९. तुमच्या चारित्र्याच्या गुप्त ( आंतरिक ) भागावर ईश्वराची नजर असते. आणि बाह्य आचरण त्याने तुमच्यावर सोपवलेले असते. थकवा टाळा, ज्या ठिकाणी ईश्वराने तुम्हाला ( केल्या कार्याचे ) बक्षीस मिळण्याची व उत्तम संचित करण्याची संधी दिलेली आहे अशा न्यायालयातील पक्षकाराबद्दल कंटाळा वा राग दिसू देऊ नका. कारण माणसाची ईश्वराबद्दलची सद्सद्विवेकबुद्धी जेव्हा साफ असते तेव्हा ईश्वर माणसाशी आलेले त्याचे संबंध समाधानकारक ठेवतो; आणि त्याच्याजवळ जे नाही हे ईश्वराला ठाऊक असताना ते असल्याचे ढोंग जर माणूस जगासमोर करू लागला तर ईश्वर त्याला लज्जास्पद करून टाकतो.

इस्लामवरील लेखकांनी इस्लामच्या दुसऱ्या खलिफाच्या चारित्र्यासंबंधी बऱ्याचदा लिहिले आहे. तो सर्वात बलाढ्य माणूस होता; दृढनिश्चयी, स्वतंत्रवृत्तीचा व धैर्यशाली, मनस्वी व भावनाशील आणि तरीही पहाडासारखा निश्चल आणि अंतर्बाह्य निष्ठावंत होता. आंद्रेला तो सर्वोत्कृष्ट मुसलमान[११] वाटतो. आणि मुसलमान लेखकांनी तर स्तुतीचा त्याच्यावर नुसता वर्षावच केला आहे. [१२] त्यामुळे अल् मुबरंज, इब्न कुतयबा आणि इब्न खाल्दून अशा अधिकारी व्यक्तींच्या मार्फत चालत आलेल्या या सूचनापत्राला अनन्य महत्त्व प्राप्त होणे अगदीच स्वाभाविक होते.

१. पहिल्या कलमाचे व्हॉन हॅमर ( Von Hammer ) याने चुकीचे भाषांतर दिले होते, आणि मार्गोलिऑथने ती चूक दुरुस्त केली. ह्या कलमात हे नि:संदिग्धपणे नमूद केले आहे की, कुराण आणि सुन्ना हे कायद्याचे दोन

आद्य उगम आहेत. कुराणात दोन प्रकारची वचने आहेत: एक 'मुहकम्' म्हणजे ज्यांचा नि:संदिग्ध अर्थ लागतो अशी. आणि दुसरी 'मुतशाबिह' म्हणजे ज्यांचा वेगवेगळ्या प्रकारे अर्थ लागू शकतो अशी (कुराण ३.७) प्रश्न तसा शंकातीत नाही, पण कुराणात काही महावाक्ये (आयती) अधिकृत आहेत आणि काही शंकास्पद आहेत असा जो याचा अर्थ मार्गोलिऑथ काढतो तो मात्र चूक आहे. या महावाक्याचा संदर्भ प्रत्यक्ष अंमलबजावणी व दृष्टांतात्मक अर्थबोधन यांच्याशी आहे. पिक्थॉलने केलेल्या भाषांतरानुसार "पुस्तकाची मूलतत्त्वे" असलेली काही महावाक्ये, तर ज्यातून अनेक अर्थ निघतात अशी काही 'दृष्टांतरूप मोघम' महावाक्ये कुराणात आहेत. याचा योग्य अर्थ असा की, काही महावाक्ये साक्षात् आणि शब्दश: लागू केली जाऊ शकणारी आहेत. तर अन्य काही महावाक्ये उचित असा अन्वयार्थ लावून लागू करता येण्यासारखी आहेत."

मार्गोलिऑथच्या काळानंतर हदीस आणि त्याची अधिकृतता यासंबंधी बरेच संशोधन झाले आहे. विशेषत: जोसेफ शारप्ट याचा **ऑरिजिन्स ऑफ मुहामेडन ज्यूरिस्प्रूडन्स** (ऑक्सफर्ड, १९५०) हा अलीकडचा ग्रंथ विद्वत्तापूर्ण व खात्रीलायक स्वरूपाच्या पुराव्यानिशी सांगतो की, कायद्याचा दुसरा उगम असलेला सुन्ना प्रेषिताच्या शब्दांचे वा आचरणाचे प्रतिनिधित्व करण्यापेक्षा दामास्कसमधील विद्वानांच्या मतांचे प्रतिनिधित्व करतो. शारप्टच्या मताची चर्चा प्रस्तुत निबंधाच्या कक्षेबाहेरची आहे. पण एवढे म्हणजे पुरेसे आहे की, त्याने केलेले संशोधन लक्षात घेण्याच्या सर्वश्रेष्ठ योग्यतेचे आहे. एम्. झेड. सिद्दिकी यांच्या **हदीस लिटरेचर** (कलकत्ता विद्यापीठ, १९६१) या विद्वत्तापूर्ण ग्रंथाचाही या संदर्भात उल्लेख करता येईल.

जेव्हा न्यायालयासमोर बाजू मांडली जाते वा युक्तिवाद केला जातो तेव्हा लिखित वा पारंपरिक कायद्यानुसार निवाडा करणे हे न्यायालयाचे कर्तव्य ठरते. या वैधानिक सिद्धांताशी उपरोल्लेखित 'मुद्दे' या शब्दाचा संबंध आहे. जिथे कायद्याचा स्पष्ट नियम अस्तित्वात असतो तिथे अमूर्त तर्कशास्त्राचा वा नैसर्गिक न्यायाचा विचार करणे उचित ठरणार नाही.

उदाहरणार्थ, स्त्री आणि पुरुष समान आहेत असा युक्तिवाद केलाच जाऊ शकत नाही; कारण, (स्त्रियांबद्दल) दयाळूपणा व प्रेमभाव यांची शिफारस केली गेली असली तरी खुद्द कुराणातच स्पष्ट शब्दात, सर्वसाधारण नियम म्हणून, पुरुषाला स्त्रीपेक्षा श्रेष्ठ दर्जा दिला गेला आहे. [१४] आधुनिक कायद्याची परिभाषा वापरून आपण असे म्हणू की, 'न्याय्यपणाच्या स्वतःच्या वैयक्तिक कल्पनांच्या अनुसारे नव्हे तर कायद्यानुसार न्यायदान करणे हे न्यायाधीशाचे कर्तव्य आहे.'

२. जन्म श्रेष्ठत्व, खानदानीपणा व श्रीमंती या कल्पनांचे जेव्हा कमालीचे वर्चस्व होते अशा काळात समानपणे वागण्याची ही ताकीद अत्यंत आवश्यक होती. न्यायाधीशाने पक्षकारांच्या पातळीवर स्वतःला आणावे. आपल्या सत्तेचा व विद्वत्तेचा वडेजाव मिरवू नये असाही सल्ला न्यायाधीशाला यात दिलेला आहे.

३. या विधानावर काही उद्बोधक भाष्ये मार्गोलिओंथने केली आहेत. [१५] यहुदी कायद्यातून हा नियम आलेला आहे, आणि १) स्पष्ट व खात्रीलायक पुराव्यावाचून फिर्यादी यशस्वी होऊ शकत नाही; आणि २) काही प्रकरणांमध्ये आरोपी शपथेच्या आधारावर स्वतःचा बचाव करू शकतो, या नियमाचे हे एक प्राचीनतम सूत्रीकरण आहे. उदाहरणार्थ, लिआन (परस्परांवर आरोप) मध्ये जेंव्हा पती आपल्या पत्नीवर दुराचाराचा आरोप करतो आणि त्यासाठी प्रत्यक्ष पुरावा देऊ शकत नाही तेव्हा पत्नी आपल्या निरपराधित्वाची शपथ घेऊ शकेल आणि तिने अशी शपथ घेतल्यानंतर न्यायाधीश तलाक घोषित करतो. [१६]

४. हा सिद्धांत आधुनिक कायदेपंडितांना सुपरिचित आहे; यानुसार, त्यांच्यामुळे कायद्याच्या स्पष्ट नियमाचा भंग होत नसेल त्या तडजोडी वा समेटच फक्त कायदेशीर ठरतात. मालमत्ताविषयक कायद्यांतील याचे उदाहरण म्हणून कौटुंबिक समेटाच्या कायद्याचे देता येईल. (ओ. एम्. एल्. २२२, आणि वैवाहिक हक्कांविषयीच्या करारासंबंधी, कलम १०४-१०९)

५. हे सर्वांत महत्त्वाचे कलम आहे. कायदेशीर दृष्ट्या न्यायालयाला आपल्या

स्वतःच्या निर्णयाचा आपणहून ( suo moto ) फेरविचार करण्याचा अधिकार असतो. नैतिकदृष्ट्या, चूक कबूल करण्यातील नम्रता प्रशंसनीय असून अन्याय चालू ठेवणे केव्हाही निषेधार्हच आहे. धर्म आणि कायदा यांच्याकडे पाहाण्याच्या उमरच्या दृष्टिकोणाचे हे नमुनेदार उदाहरण म्हणता येईल.

६. प्रकटीकरणाच्या बळकट पायावर विधिशास्त्राचा डोलारा उभा करण्याची अनुज्ञा मानवी बुद्धीला देणाऱ्या प्रेषिताच्या सुप्रसिद्ध हदीसला [३७] यातून पुष्टी मिळाली आहे.

७. एकतर्फी लागू होणाऱ्या कायद्याचा हा प्रारंभ आहे.

८. साक्षीदाराची पात्रता ( capacity ) ही इस्लामी कायद्याची महत्त्वाची शाखा आहे. सयुक्तिकता व पात्रता या दोहोंचा इथे विचार केलेला आहे.

९. हा समारोप आहे आणि न्यायाधीशाच्या न्यायालयातील वर्तनाशी हा भाग संबंधित आहे हे अगदी योग्य आहे. यात चारित्र्याच्या विशुद्धतेवर भर दिलेला आहे. त्यासंबंधित स्वातंत्र्य व निःपक्षपातीपणा अंगी बाणवण्याचे महत्त्व यात प्रतिपादले आहे. आणि सदाचाराचा ढोंगी देखावा करण्याचा स्पष्ट शब्दात निषेध केला आहे.

हा दस्तऐवज जवळजवळ संपूर्णतया कायद्याशी व त्याच्या योग्य अंमलबजावणीशी संबंधित आहे. कायद्यासंबंधीच्या मुस्लिम ग्रंथांमध्ये याचा हमखास हवाला दिलेला आढळतो. शरीआकडे पाहाण्याच्या उमरच्या दृष्टिकोणाचे हे नमुनेदार उदाहरण असून समन्यायबुद्धी व निःपक्षपातीपणा याबद्दल असलेल्या त्याच्या कीर्तीला यामुळे बळकटी येते.

## क) अलीचा वसीयतनामा

ज्याच्याविषयी येथे चर्चा करावयाचे योजिले आहे तो तिसरा दस्तऐवज आहे अलीचा वसीयतनामा ( वसिय्य ) दआइमुल्-इस्लाम ( इस्लामचे आधारस्तंभ ) या काजी नुमान ( मृत्यू, कायरो, ३६३/९७४ ) यांनी लिहिलेल्या सुप्रसिध्द फातिमी पाठ्यपुस्तकात तो आढळतो. [३८]

अजूनही पाश्चात्य अभ्यासकांना सापेक्षतः अज्ञात असलेल्या अलीच्या या वसीयतनाम्यात श्रद्धेचे निवेदन आहे आणि सुन्नींच्या खलीफापदाविषयीच्या सिद्धांताहून वेगळा असा इमामपदाविषयींचा जो फातिमी सिद्धांत आहे त्याचे यात समर्थन आहे.[३९] शियाई इस्लामच्या घटनात्मक कायद्याचा भाग जो इमामपदासंबंधीचा सिद्धांत तेवढा वगळल्यास हा दस्तऐवज मुख्यत्वे धार्मिक व नैतिक स्वरूपाचा आहे.

इमामपद : अलीच्या या मृत्युपत्राच्या अधिकृततेची खातरजमा त्याचा नातू, अली झयनुल–आबिदीन बिन हुसैन, आणि पणतू मुहम्मद अल्–बाकिर बिन अली यांनी दिली आहे. ( आय्. एल्. डब्ल्यू, ६७, परि.१ ) हे मृत्युपत्र प्रामुख्याने अली बिन अबी तालिब यांचा मुलगा हसन याच्या बाजूने आहे. मृत्युपत्रकर्ता आपली पुस्तके व शस्त्रे हसनला देतो आणि म्हणतो की, हे प्रेषिताच्या आज्ञेवरून करण्यात आले आहे. हसनने हे क्रमशः आपला भाऊ ( हुतात्मा ) हुसैन याच्याबाबत, त्याने त्याच्या मुलाबाबत आणि असेच पुढे हे करावयाचे आहे, म्हणजे त्यायोगे आनुवंशिक इमामपद योग्यरीत्या प्रस्थापित व्हावे. ‘ परमेश्वरी आज्ञांचा रक्षणकर्ता ’ ( इंग्रजीतल्या ‘ डिफेंडर ऑफ फेथ ’ प्रमाणे ) आणि ‘ रक्ताचा रक्षणकर्ता ’ म्हणजे ज्याला, अलीचा खुनी इब्न मुल्जम याला योग्य ती शिक्षा ठरवण्याचा, अधिकार आहे असा–असे हसनचे वर्णन केले गेले आहे. ( ६९ ) मृत्युपत्राच्या अखेरीस अली पुन्हा हे असे म्हणून हसनच्या अधिकाराला दुजोरा देतो : ‘ हे हसन, तू माझ्या रक्ताचा रक्षणकर्ता आहेस आणि तो (इब्न मुल्जम) तुझ्याबरोबर आहे, आणि मी त्याला तुझ्या स्वाधीन केले आहे. . . . दुसऱ्या कोणालाही याबाबत अधिकार दिलेला नाही. जर त्याला ठार करावेसे तुला वाटत असेल, तर तसे कर आणि त्याला क्षमा करावीशी तुला वाटत असेल, तर तसे कर. माझ्यानंतर तू **इमाम** आहेस, आणि माझ्या ज्ञानाचा वारसा आहेस, आणि ज्यांना मी मागे ठेवून जात आहे त्यांच्यात तू सर्वोत्तम आहेस. . . . ” (७७) आणि त्यानंतर तो हुसैन संबंधीही बोलतो. (७८)

**इमामपद** ही विश्वस्तवस्तु ( ट्रस्ट ) आहे. (७०) इमामावर व त्यांच्या घराण्यातील लोकांवर प्रेम करणे एवढीच परतफेड आपल्या लोकांनी करावी असे प्रेषिताने सांगितले आहे. (७०) हे कोणत्याही मुसलमानाने नाकारल्यास त्याचा परिणाम कयामतच्या दिवशी प्रेषित ( त्याच्या बाजूने ) करणार असलेली रदबदली गमावून बसण्यात होईल ( ७२ ) इमामासंबंधी ( **वलाय** ) भक्तिभाव हा धर्मश्रद्धेचाच एक आवश्यक भाग आहे.[४०] कारण ईश्वराच्या आज्ञापालनातच प्रेषिताच्या आज्ञापालनाचाही अंतर्भाव होतो, आणि प्रेषिताचे आज्ञापालन करायचे तर त्याच्या घराण्यातील इमामांचे आज्ञापालन करणे आवश्यकच ठरते ( ७४ ). कुराणात १६, ४३ (फल्यूएगेल, १६, ४५) ज्यांचा उल्लेख अहल अज जिक्र ( या शब्दाचा अर्थ स्पष्ट नाही ) असा आलेला आहे ते हे इमाम होत. इमामांनी ईश्वराशी व त्याच्या प्रेषिताशी त्याच्या आज्ञा पाळण्याविषयी व त्याची सेवा करण्याविषयी कायम स्वरूपाचा करार केला आहे (७६).

'हे माझ्या ईश्वरा, निःसंशय तू साक्षी आहेस, निःसंशय मी आणि माझ्या घरातील इतर ( हसन, हुसैन आणि फातिमा ) तिघांनी तुझा प्रेषित, आणि तुझ्या पृथ्वीवरचे तुझे प्रतीक ( प्रमाण ), मुहम्मद याच्याशी असा करार केला आहे की आम्ही, ईश्वराखातर, त्याच्या मुहम्मदाच्या प्रत्येक आज्ञेचे पालन करू आणि त्याने सांगितलेले प्रत्येक निषिद्ध ( कृत्य ) टाळू' ( ७५-७६ ) ईश्वर आणि त्याचा प्रेषित यांच्यासाठी लढताना ठार झालेल्या आपल्या नातेवाईकांविषयी तो पुढे बोलतो ( ७६-७७ ) आणि स्वतःविषयी सांगताना सुंदर उपसंहार करतो : "प्रेषिताच्या सहित, ईश्वराच्या व प्रेषिताच्या आज्ञेवरून, मी धर्मयुद्ध ( जेहाद ) केले. आणि ईश्वराने जेव्हा आपल्या प्रेषिताला बाजूस नेले ( प्रेषिताचे निधन झाले ) तेव्हा मी प्रेषिताने ज्यांच्याशी लढा देण्याची मला आज्ञा केली होती त्या दुर्वर्तनी लोकांविरुद्ध धर्मयुद्ध केले.' ज्या मुसलमानांनी अलीचे हक्क नाकारले त्यांच्याविरुद्ध केलेल्या लढयांचा हा संदर्भ आहे.

**धर्मश्रद्धा** : ईश्वर एक असून मुहम्मद हा त्याचा प्रेषित आहे आणि इमामपद प्रेषिताच्या घराण्यात चालू आहे असा विश्वास बाळगणे ही धर्मश्रद्धा होय (६९-७०). दृष्टी साफ ठेवून पाप टाळावे; आसक्तीमुळे अंधत्व येते आणि अंधत्वामुळे चिरंतन नाश ( ७० ); उपासना प्रामाणिक असावी......' म्हणून तुमच्या स्वतःच्या मुक्त इच्छेनुसार, आणि भीतीमधूनसुद्धा त्याची उपासना करा ( ७० ). प्रेषिताबद्दल व त्याच्या कुटुंबाबद्दल प्रेम बाळगणे ही विश्वस्त वस्तु ( अमाना ) आहे; ईश्वराला ती परत दिलीच पाहिजे, कारण जो इमामावर अशा प्रकारे प्रेम करीत नाही तो प्रेषिताचा शत्रू ठरतो आणि प्रेषिताचा शत्रू तो ईश्वराचा शत्रू होय ( ७०-७१ ).

श्रद्धेची ( ईमानची ) व्याख्या **बआईम**च्या पहिल्या खंडात पुढीलप्रमाणे दिलेली आहे : वाचेने उच्चारण, सद्सदविवेकबुद्धिपूर्वक विश्वास आणि (इस्लामचा आधार-) स्तंभांच्या अनुसार कृती." हाच सिद्धांत येथेही मांडलेला आहे; उपासनाविधीची विशुद्धता, नमाज, दानधर्म, रोजा, आणि जेहाद हे सक्तीचे असल्याचे सांगण्यात आले आहे (७१). खोलवरच्या अर्थाने श्रद्धा म्हणजे मनोविकारांविरुद्ध लढा आणि ऐहिक वासनांचे विध्वंसन होय (७४).

**कायदा** : बेकायदेशीर मार्गांनी मालमत्ता घेणे, मादक पेये पिणे आणि व्यभिचार करणे यांना मनाई आहे (७२). कृती, उक्ती आणि श्रद्धा यांमधून सदाचाराला घट्ट धरून राहिले पाहिजे. निःसंशयपणे प्रेषिताने माझ्यावर ( काम ) सोपवले आणि म्हटले : 'हे अली... तुझ्या हाताने; जर तुला ( हाताने ) करता आले नाही तर तुझ्या वाचेने; आणि तेही जर तुला जमले नाही तर तुझ्या अंतःकरणाने (७२-७३) (लोकांस) चांगल्या कामां ( च्या करण्या )- चा उपदेश करीत राहा आणि वाईट कामाची मनाई करीत जा.[४२]

आपल्या भाषणाच्या अखेरीस अली लोकांना विचारतो, 'तुमच्यापैकी कोणाला माझ्याविरुद्ध तक्रार ( आहे काय ? ) किंवा एखाद्याच्या व्यक्तित्वाचा, वा मालमत्तेचा अपराध केल्याबद्दल एखाद्याला दावा करायचा आहे काय ? )' कोणीच कोणताही दावा केला नाही आणि कोणीतरी त्याची स्तुती करण्यास प्रारंभ केला तेव्हा तो म्हणाला, 'निरर्थक शब्द उच्चारण्याची वा स्तुतिपाठ करण्याची ही वेळ नव्हे, माझ्या काही कृती मान्य नसणाऱ्यांनी गप्प बसणे आणि माझ्या 'आत्म्याची खरडपट्टी' काढण्याची व पश्चातापदग्ध मरण पत्करण्याची संधी मला नाकारणे हे बरोबर नाही; आणि त्यानंतरही कोणीच जेव्हा काहीच दावा केला नाही तेव्हा ईश्वराशी व प्रेषिताशी झालेल्या आपल्या कराराबद्दल अली बोलला (७५–७६).

**सामाजिक नियम** : जवळच्या नातेवाईकांच्या समजुतदारपणे वागवले जाण्याच्या अधिकाराची प्रभावी तरफदारी येथे करण्यात आली आहे : 'आपल्या आप्तेष्टांबद्दल व रक्तसंबंधीयांबद्दल आपलेपणाची भावना बाळगा.' (७३) आपल्या वंशजांबद्दल विशेष प्रेम आणि भक्तिभाव बाळगण्याच्या प्रेषिताने केलेल्या आज्ञेशी (बलायाच्या सिद्धांताशी) हे सुसंगतच आहे. द्वेष आणि चहाडी करण्याचे टाळावे, शिष्टाचार पाळावा. मुलांची सुन्ता तातडीने करावी. असत्य, अश्लीलता व गर्व या गोष्टी निंद्य ठरवलेल्या आहेत. अर्भकांचे पोषण करावे व त्यांना प्रेमपूर्वक वागवावे; अतिथींची विशेष काळजी घ्यावी...' तुमच्याबद्दल कृतज्ञता वाटल्यावाचून त्याला (अतिथीला) निरोप घेऊ देऊ नका.' (७३–७४).

**स्त्रिया** : नूमानचे स्त्रियांविषयीचे मत फारच प्रतिकूल होते असे दिसते. अलीच्या तोंडी तो पुढील वाक्य घालतो : 'विश्वास टाकणाऱ्या स्त्रियांपासून सावध राहा, कारण त्यांनीच तुझ्या बापाला ( आदमला ) स्वर्गातून बाहेर काढले, आणि या जगाच्या पीडेत आणून सोडले' ( ७४ ).

मृत्युपत्राच्या अखेरीस अली धर्मश्रद्धेच्या निवेदनाचा सतत पुनरुच्चार करतो, ईश्वराची व प्रेषिताची स्तुती करतो, क्षमा मागतो आणि स्वतःच्या मुलांना तसेच घराण्यातील इमामांना आशीर्वाद देतो. आणि अशा रीतीने २१ रमझान ४० / २८ जानेवारी, ६६१ रोजी तो दिवंगत झाला.

अलीचे मृत्युपत्र हा शिया पंथाच्या धर्मश्रद्धेतील मुख्य तत्त्वांचे वर्णन करणारा विविधरंगी असा दस्तऐवज आहे. त्याची अधिकृतता, ऐतिहासिकता आणि त्यातील मतप्रतिपादन यांची काळजीपूर्वक छाननी करावी लागेल. पण आपल्या दृष्टीने असे म्हणता येईल की काही किरकोळ स्वरूपाचे नियम वगळता, बाकीच्या सर्व आज्ञांचा हेतू

इमामपदाच्या सिद्धांताला बळकटी आणणे एवढाच आहे. या मृत्युपत्रात काही नैतिक आणि सैद्धांतिक बाबींवरही भर दिलेला आहे. त्यातील सर्वांत मनोहारी आज्ञा पुढील–प्रमाणे आहेत : पहिली आहे शांतताप्रस्थापक या नात्याने अलीची तारीफ करणारी. " प्रेषिताने असे म्हणताना मी ऐकले आहे की, मतभेद मिटवणे आणि माणसांमधील मैत्रीचे बंध बळकट करणे हे सर्व रोझ्यांपेक्षा व नमाजांपेक्षा अधिक हितकर आहे." (६९) आणि दुसरी आहे अतिथींच्या अगत्याबद्दलची नाजूक सूचना. ' ...तो तुमचा पाहुणा असताना त्याला एकटेपणा जाणवू देऊ नका आणि आपल्या कुटुंबियांची त्याला तळमळ लागू देऊ नका...तुमच्याबद्दल कृतज्ञतेची भावना वाटेपर्यंत त्याला निरोप घेऊ देऊ नका ' ( ७३-७४ ).

## ॥ ४ ॥

प्रेषिताच्या अखेरच्या धर्मोपदेशात कायदा आणि धर्म यांची संपूर्ण एकरूपता झालेली दिसते; उमरच्या सूचना मुख्यत्वे वैधानिक आहेत आणि अलीचा वसीयतनामा प्रामुख्याने धार्मिक असून त्यात प्रबळ पक्षपाती पूर्वग्रह दिसून येतो. यापैकी प्रत्येकाची सखोल तपासणी केली असता किमान आरंभीच्या शतकांमध्येतरी कायदा हा बव्हंशी ईश्वराचा आवाजच मानला जात होता, अशी इस्लामच्या कोणत्याही गंभीर अभ्यासकाची खात्री पटल्यावाचून राहाणार नाही. ईश्वराला अशी इच्छा झाली की माणसाने सुव्यवस्थित जीवन जगावे आणि ईश्वराचे अनुग्रह मिळवावेत; अशा रीतीने माणूस कायदा पाळू लागला, आणि कायदा हा मुख्यत्वे धार्मिक होता. खरे तर सेमिटिक धर्मात न्यायाचा मूलस्त्रोत व कायद्याचा प्रतिपालक अशीच ईश्वराची कल्पना सतत चालत आलेली आहे. पुढे समाजातील गुंतागुंत जसजशी वाढत गेली तसतसे निधार्मिक कायद्याचे ( कानूनचे ) स्वतंत्र अस्तित्व विकसत गेले आणि पवित्र कायद्याच्या ( शरीआच्या ) संदर्भात त्याचा विचार करणे भाग ठरले. अनेक नव्या संस्था अस्तित्वात आल्या. काही उदाहरणे सहज द्यायची झाल्यास राष्ट्रीय कर्जे, विमा, प्राप्तिकर, भाडे–खरेदी करार, अवकाशविषयक कायदा, औद्योगिक विधिकरण, घटनात्मक गुन्हे या सर्वांशी समाजाचा नव्याने संबंध आला आणि या सर्व बाबींचे व्यवहार सांभाळणे शरीआला अशक्य होत गेले. केवळ मुसलमानांसाठीच नव्हे तर राज्यात राहणाऱ्या सर्व व्यक्तींना लागू ठरतील अशा सर्वसाधारण दिवाणी कायद्याचा ( जनरल सिव्हल लॉ चा ) विकास होणे स्वाभाविकच क्रमप्राप्त झाले. कानून आणि शरीआ यांच्यातील संबंधाचा शोध घेणे हे त्यामुळेच लाभदायक व उद्बोधक ठरू शकेल. [४२]

मुस्लिम राज्यातील धार्मिक व निधार्मिक कायद्याच्या अभ्यासाच्या जोडीलाच आणखी एका बाबीकडे इथे लक्ष वेधणे आवश्यक आहे. अनेक विद्यानिकेतनांमध्ये तुलनात्मक कायद्याचे अभ्यासक्रम आहेत. सध्या जगात पाच अतिविकसित विधिपद्धती आहेत. ( चिनी कायदा त्यात अंतर्भूत नाही, त्याच्याविषयी काहीही माहिती देणे दुर्दैवाने शक्य नाही. ) स्थूल कालक्रमानुसार त्यांची पुढीलप्रमाणे मांडणी करता येईल :

१. **हिंदु कायदा** : भारतातल्या व पाकिस्तानातल्या चाळीस कोटी लोकांवर याचा प्रभाव आहे.

२. **रोमन कायदा व त्याच्या शाखा** : पश्चिम युरोप, लॅटिन दक्षिण अमेरिका आणि दक्षिण आफ्रिका या देशांत हा अमलात आहे;

३. **इस्लामी कायदा** : उत्तर आफ्रिका, मध्यपूर्व, भारत, पाकिस्तान, इंडोनेशिया येथे आणि अन्यत्रही काही जागी राहणाऱ्या चाळीस कोटी जनतेला म्हणजे जागतिक लोकसंख्येच्या १/७ भागाला हा कायदा लागू होतो; [४४]

४. **इंग्रजी सामान्य कायदा ( इंग्लिश कॉमन लॉ )**: भारत व पाकिस्तान यांच्यासह राष्ट्रकुलातील सुमारे साठ कोटी लोकांना आणि अमेरिकन संयुक्त संस्थानातील सुमारे पंधरा कोटी लोकांना हा कायदा लागू ठरतो;

५. **सोविएत कायदा** : सोविएत संघराज्यात एकोणिस कोटी तीस लक्ष लोकांना हा लागू होतो. [४५]

या सर्व विधिपद्धतींचा योग्य प्रकारच्या अभ्यासाच्या पायावर आधारित नसलेला तुलनात्मक कायद्याचा कोणताही अभ्यासक्रम खऱ्या अर्थाने समावेशक म्हटलाच जाऊ शकत नाही. जगातील कायद्याची समावेशक व समुचित पाहाणी उपलब्ध नसावी ही विशेष उल्लेखनीय – मला तसे म्हणण्याची जर परवानगी असेल तर – दुर्दैवी बाब आहे. जेव्हा तुलनात्मक कायद्याविषयी बोलले जाते तेव्हा सामान्यत: इंग्रजी सामान्य कायद्याची रोमन कायद्याशी; किंवा कॉंटिनेंटल कायद्याच्या काही बाजूंची रोमन अथवा इंग्रजी कायद्याशी किंवा या विधिपद्धतींपैकी एखादीची हम्मुराबी किंवा इश्तार यांच्या ( संहितांशी ), किंवा इजिप्शियन प्राचीन कायद्याशीच तुलना आपल्याला अभिप्रेत असते. कायद्याचा इतिहास या विषयाच्या नेहमीच्या पाठ्यपुस्तकांपैकी एकामध्येही हिंदु व इस्लाम या धर्मांनी विकसित केलेल्या विधिपद्धतींचा ओझरतादेखील संदर्भ आढळत नाही. दोन परिचित उदाहरणे द्यायची झाल्यास डब्ल्यू सीगल ( W. Seagle ) याचे,

कायद्याच्या इतिहासाची उत्तम प्रकारे लिहिलेली प्रस्तावना असे ज्याला म्हणता येईल असे क्वेस्ट फॉर लॉ ; आणि ए. एस. डायमंड लिखित अलीकडे प्रकाशित झालेला प्रेरक ग्रंथ एव्हल्यूशन ऑफ लॉ अँन्ड ऑर्डर ( लंडन, १९५१ ) या पुस्तकांची देता येतील. माझ्या मते मेन ( Maine ) याने लिहिलेल्या हिंदु लॉ आणि अब्दुर् रहीम लिखित मुहामडन ज्यूरिस्प्रूडन्स या ग्रंथांचे योग्य परिशीलन वरील दोन लेखकांच्या विचारांना नक्कीच नवी दिशा देऊ शकले असते. किंवा, किमानपक्षी युगानुयुगे फोफावत गेलेल्या कायदा, रूढी व लोकाचार यांच्या घनदाट जंगलातील अनेक पायवाटांवर नवा प्रकाश ते निश्चितच टाकू शकले असते. पण त्या दोन लेखकांना या दोन विधिशास्त्राच्या पद्धती लक्ष देण्यास वा अध्ययनास पात्र असल्याचे कधी वाटलेच नाही. हिंदु जातिव्यवस्थेची गुंतागुंतीची संरचना, आणि ऑस्ट्रॉरॉग ( Ostrorog )[४६] आणि सर विल्यम जोन्स[४७] यांनी ज्याबद्दल ठळक गौरवोद्गार काढले आहेत ती तर्कशास्त्रीय परिपूर्णता क्षणभर बाजूला ठेवली तरी मुस्लिम कायद्याचे नैतिक अधिष्ठानसुद्धा, त्यांनी अशा तऱ्हेने दृष्टिआड केले की जणू ते त्यांच्या अध्ययनाच्या कक्षेत मोडतच नव्हते.

इस्लामी कायद्याच्या भारतीय अभ्यासकाला व पाश्चात्य विधिपद्धतींविषयी आदर बाळगणाऱ्याला ह्या वृत्तीबद्दल तीव्र नापसंती वाटेल. अधिक व्यापक, उदारमनस्क व तत्त्वज्ञानात्मक प्रवृत्ती तुलनात्मक कायद्याच्या अध्ययनाच्या क्षेत्रात निर्माण होतील, आणि केवळ काही पद्धतींनीच नव्हे तर पाचही महान विधिपद्धतींनी देशविशिष्ट सामाजिक समस्यांना दिलेली उत्तरे समजून घेण्याचा व त्यांचे मर्म ओळखण्याचा प्रयत्न प्रशिक्षित पाश्चात्य विद्वज्जनांच्या हातून होईल आणि जुन्या जगातल्या पवित्र कायद्याच्या सजीव परंपरेची उपेक्षा घडणार नाही अशी अपेक्षाच फक्त व्यक्त करता येईल आधुनिक संशोधक हम्मुराबी व इश्तार यांच्यापर्यंत जातात, पण मुस्लिम विधिशास्त्रज्ञांचा मुकुटमणी असलेला इमाम शाफिई[४८] किंवा हिंदु विधिशास्त्राचा जनक असलेला स्मृतिकर्ता मनु यांच्याठी मात्र त्यांच्याजवळ वेळ नसतो. कोणत्याही एका विषयाचा येथे सुचवलेल्या पद्धतीने पुरेसा अभ्यास झाला तर केवळ सैद्धांतिक अध्ययनांच्या क्षेत्रातच नाही तर सुसभ्य जीवनांतल्या नव्या अरिष्टांवर योग्य ते उपाय शोधण्याचे जे प्रयत्न सुरू आहेत त्या संदर्भातही अत्यंत लाभदायक ठरू शकणारे परिणाम हाती येतील.

भारतीय कला व भारतीय तत्त्वज्ञान हे पश्चिमेत अध्ययनाचे व प्रशंसेचे विषय ठरले आहेत; पण सभ्यतेच्या निर्मितीत कला, तत्त्वज्ञान, काव्य, गीते व दंतकथा यांच्यापेक्षा कायदा आणि इतिहास यांचे स्थान कमी महत्त्वाचे नसते; नद्या, पर्वत, अरण्ये, वाळवंटे आणि समुद्र यांचीसुद्धा राष्ट्रीय संस्कृतीवर न मिटणारी छाप पडलेली असते; तेव्हा कायदा हा जर 'लोकांच्या सभ्यतेचा गाळीव अर्क' असेल[४९] आणि जर

'राष्ट्रीय कवितेप्रमाणेच लोकांच्या अंतःकरणातून उसळून तो बाहेर पडत असेल, राष्ट्रीय धर्माइतकाच तो पवित्र असेल, भाषेप्रमाणे तो वाढत व पसरत असेल; धार्मिक, नैतिक आणि काव्यत्म अशा सर्व घटकांचे त्याच्या प्रभावी सामर्थ्यात योगदान असेल'[५०] तर इस्लामी आणि हिंदुधर्माच्या विधिशास्त्रज्ञांनी केलेले श्रम खचितच तुलनात्मक कायद्याच्या आधुनिक अभ्यासकांनी बारकाईने लक्ष देण्याच्या पात्रतेचे ठरतात.

१९४७ साली जगाची लोकसंख्या २ अब्ज २३ कोटी २० लक्ष असावी असा एक अंदाज आहे. त्यापैकी इस्लामी व हिंदुधर्मीय यांची संख्या ६६ कोटी ५० लक्ष, म्हणजे जगातील रहिवाशांच्या एकतृतीयांशाइतकी होती;[५१] त्यांच्या विधिपद्धतींकडे अधिक लक्ष देण्याची निकड स्पष्ट करेणारे हे आणखी एक सबळ कारण आहे.

कायदा आणि धर्म या विषयावरचे हे प्रकरण असल्यामुळे समारोप करण्यापूर्वी इस्लामच्या अभ्यासकांच्या विचारार्थ, ऐतिहासिक समीक्षेची एक समुचित पद्धती शरीआचा अभ्यास करण्यासाठी सुचवू इच्छितो.

मुस्लिम विधिशास्त्राची पद्धती अप्रागतिक, गतिशून्य व ताठर झालेली असल्याची टीका अनेक लेखकांनी केली आहे. ही टीका काही मर्यादेपर्यंत रास्तही आहे, आणि तिचे सामर्थ्य पूर्णतया नाकारले जाऊ शकणार नाही. प्रा. एच. ए. आर. गिब यांनी आपल्या **मॉडर्न ट्रेंड्स् इन् इस्लाम** या विषयावरील उद्बोधक व्याख्यानांमध्ये हे दाखवून दिले आहे की, अनेक चांगली वैशिष्टचे व आशादायक लक्षणे असूनही सर्वसाधारणतः मुसलमानांच्या बोकांडीस एक बौद्धिक पाप सर्वत्र बसलेले दिसते, ते म्हणजे अतीताच्या कल्पनारम्य गौरवीकरणात रममाण होण्याची त्यांची वृत्ती आणि विचारांच्या क्षेत्रात पक्षघात घडवून आणणाऱ्या गोंधळाचे अस्तित्व. गिबला असलेले मध्यपूर्वेचे ज्ञान आणि इस्लामी सभ्यता व अरबी वाङ्मय यांचा त्याने केलेला प्रदीर्घ व निरंतर व्यासंग यांच्या बळावर त्याने आधुनिक इस्लामला जडलेल्या व्याधीचे अचूक निदान केले आहे. एक मुसलमान या नात्याने या टीकेचे सामर्थ्य मी मान्य करतो, हे आव्हान स्वीकारतो आणि नवे उत्तर, किंवा जुनेच उत्तर पण नव्या वस्तुस्थितींच्या अनुषंगाने, मी देतो.

मुस्लिम विधिशास्त्राचे (उसूल) नियम आणि मुस्लिम कायदा (**फ़ुरू**) यांचा अभ्यास तत्कालीन सामाजिक परिस्थितींच्या संदर्भात झाला पाहिजे. अशा अभ्यासात ऐतिहासिक, राजकीय व सांस्कृतिक घटक दुर्लक्षिले जाता कामा नयेत, आणि अभ्यासावयाचे साहित्य परिपूर्ण (exhaustive) असायला पाहिजे; केवळ अरबी साधनांपुरतेच ते मर्यादित असू नये, तर लॅटिन आणि ग्रीक, अरबी, हिब्रू, सिरियाक, इथिओपिक या चारही सेमिटिक भाषा आणि उर्दू, फारसी व तुर्की या भाषांमधील साधनेही गोळा केली जावीत. आणि एवढी सगळी सिद्धता झाल्यानंतर पुढील पाच टप्प्यांनी अध्ययनाचा प्रयत्न केला जावा.

अ) एखाद्या विशिष्ट वैधानिक सिद्धांताबाबत समाजाची इस्लामपूर्व अवस्था कशी होती ? प्रेषिताने व त्याच्या सहकाऱ्यांनी आणि प्राचीन लेखकांनी, केली असल्यास, कोणती टीका केली होती ? गद्य आणि पद्य या दोहोंचा बारकाईने अभ्यास करून अनुमाने काढली जावीत. अनपेक्षित जागी पुरावा असल्यास तोही शोधून काढावा.

ब) प्रेषिताने कोणता विधिनियम घालून दिला होता ? कुराण किंवा हदीस, शब्द किंवा कृती किंवा मूक संमती, प्रेषिताने हे कृत्य तत्त्वाखातर वा व्यवहाराखातर वा लोकाचार वा रूढी याखातर केले,– अन्य कोणत्याही कृत्याशीं सुतराम संबंध नसलेले केवळ एक फुटकळ कृत्य म्हणून केलेले नाही – अशा दाव्याला पुष्टीं मिळेल इतपत पुरावा आहे काय ? नंतरच्या विद्वानांनी स्पष्ट केल्याप्रमाणे ज्यांचे महत्त्व शास्त्रीय व तार्किक नाही अशा काही शब्दांचा व वाक्प्रयोगांचा खरा अर्थ काय ?

क) अशा विधिकरणाचा कोणता परिणाम झाला होता ? समाजाने तो नियम पाळला काय ? ( लोकांना ) तो फायदेशीर ठरला काय ? ( प्रेषिताच्या ) सहकाऱ्यांनी व अभिजात विधिज्ञांनी त्या नियमांचे अर्थबोधन ( Interpretation ) व अनुसरण कसे केले ? की त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले ? आज्ञेचा भावाशय त्यांना समजला होता काय ? की त्यांनी तिच्या आशयाचा खून करून केवळ शब्दांचे पालन केले होते ? राजांनी व सरकारांनी आपल्या हेतूंच्या सोईनुसार नियमांना मुरड घातली काय ?

ड) आज चौदा शतकानंतर ज्या अनेक देशात इस्लाम अस्तित्वात आहे तिथे नियमांचे अर्थबोधन कसे केले जाते ? परिस्थिती बदलल्यामुळे, अंशतः का होईना, त्यांचा त्याग केला गेला आहे काय ? जगातील विभिन्न देशांमध्ये लागू होत असलेल्या मुस्लिम कायद्याच्या नियमांमध्ये कोणते दोष आणि त्रुटी आहेत ?

इ) निकोप सुधारणा घडवून आणता याव्यात म्हणून इस्लामचा भावाशय सदैव समोर ठेवून विधिनियमांना आपण नवे वळण देऊ शकत नाही काय ? 'मौलिक तत्त्वां'चे वर्तुळ संकोचित नेऊन आनुषंगिक ( मौलिक नसलेल्या :

unessential ) संकेतांची / पायंडयांची क्षितिजे आपल्याला विस्तारता येणार नाहीत काय ? कुराणातील मुहकम आणि मुतशाबिह् आज्ञांच्या संकल्पना नव्याने तपासून काळाच्या मूल्यांशी व शास्त्रीय शोधांशी अधिक जुळणाऱ्या नव्या निष्कर्षाप्रत आपण येऊ शकत नाही काय ? तर्कशास्त्र आणि चिकित्सक शोधपद्धती, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि आधुनिक कायदा यांचा कठोर पाठपुरावा करून जे इस्लामी समाजाला अधिक स्वास्थ्यपूर्ण स्वरूपात चैतन्यमय करील असे शरीआचे नवे भाष्य आपण करू शकत नाही काय ? *

* रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेचे नियतकालिक ( १९५३ ) खंड २८ पृष्ठे २९-४८ वरून रूपांतरित

## संदर्भ टीपा

१. एच्. डब्ल्यू. फावलर, मॉडर्न इंग्लिश युसेज, ' Mahomet ' या शब्दाखाली दिलेली टीप.

२. सालमंड, ऑन ज्यूरिस्प्रूडन्स ( ५ वी आवृत्ती, १९१६ ) ९

३. या विषयावरचे सर्वांत अलीकडचे पुस्तक, एच्. एल्. ए. हार्ट, द कन्सेप्ट ऑफ लॉ ( ऑक्स्फर्ड, १९६१ ).

३. अ डब्लू सीगल, क्वेस्ट फॉर लॉ (१९४१), १४–१५.

४. पॅटन, ऑन ज्यूरिस्प्रूडन्स ( ऑक्स्फर्ड, १९४६ ), ३६.

५. पॅटन, २–९.

६. कित्ता, प्रकरण– १.

७. न्या. होम्स, उधृत : स्टोन, प्रॉव्हिन्स ॲन्ड फन्क्शन ऑफ लॉ, ( सिडने, १९४६ ) १२.

८. पॅटन, ८३.

९. या विषयावर अफाट साहित्य आहे. संदर्भासाठीं माझे पुढील पुस्तक पाहणे पुरेसे ठरू शकेल : आउटलाइन्स ऑफ मुहामडन लॉ ( दुसरी आवृत्ती, ऑक्स्फर्ड ), १३–२१. विशेषतः १७ व्या पृष्ठावर प्रमुख आधुनिक साधनांची माहिती आढळेल. यापुढे या ग्रंथाचा संदर्भ ओ. एम्. एल्. असा दिला जाईल.

१०. उसूलसाठी पहा, अब्दुर रहीम, मॉहम्मेडन ज्यूरिस्प्रूडन्स (मद्रास, १९११), एस्. पी. ॲग्निडेस ( Aghnides ) मॉहम्मेडन थिअरीज् ऑफ फायनान्स

( कोलंबिया. १९१६ ), प्रास्ताविक– विशेषत: २४–९; आणि एस्. महमसानी, इन्ट्रॉडक्शन टु फिलॉसफी ऑफ ज्यूरिस्प्रूडन्स इन इस्लाम ( ब्रिल, १९६१ ).

११. ओ. एम्. एल् २१ मेजेल्ले, कलम – ३९.

१२. हे अहकाम अल्–खम्स आहेत, एन्सायक्लोपीडिया ऑफ इस्लाम, खंड ४, ३२२; ओ. एम्. एल्. १५–१६.

१३. गोविंद दयाळ वि. इनायतुल्ला ( १८८५ ) ७, अलाहाबाद ७७५ व ७८१.

१४. अर्ली लॉ अॅन्ड कस्टम, ५.

१५. पॅटन, ४३–४४.

१६. ए. सी. बॉक्वेट ( Bouquet ), कंपॅरिटिव रिलिजन ( पेलिकन सिरीज; तिसरी आवृत्ती ), १५–१७. या ग्रंथातील इस्लामवरचे प्रकरण मजेदार आहे, पण मला त्या लेखकाची मते मात्र मान्य नाहीत. खिस्ती पाद्र्याला इस्लाम कळणे किंवा अझहरच्या शेखला सेंट जॉनच्या संदेशाचा अन्वयार्थ सांगता येणे सोपे नाही.

१७. बॉक्वेट ( Bouquet ), २१–२. वेस्टरमार्क ( Westernmarck )ने पुढील व्याख्या दिली आहे ( मॉरल आयडियाज् – खंड दुसरा, ५८४ ) : ' माणूस स्वत:ला ज्याच्यावर अवलंबिलेला मानतो व ज्याच्या इच्छेला तो उपासनापूर्वक आवाहन करतो त्या अलौकिक शक्तीवर श्रद्धा आणि तिच्याबद्दल पूज्यभाव. ' ही व्याख्या डायमंडने मान्यतापूर्वक उद्धृत केली आहे. इव्हॉल्यूशन ऑफ लॉ अॅन्ड ऑर्डर, ८१.

१८. धर्मावरील साहित्य इतके प्रचंड आहे की त्याचा संदर्भ देण्याचा येथे प्रयत्नच केलेला नाही. तरीपण प्रस्तुत लेखक रॅफेल कर्स्टन ( Rafael Karsten ) लिखित द ऑरिजिन्स ऑफ रिलिजन ( लंडन, १९३५ ) या पुस्तकाचा संदर्भ देऊ इच्छितो. त्यात टेलरकृत धर्माच्या, ' आध्यात्मिक शक्तींवरील विश्वास ' या व्याख्येची चर्चा केली आहे आणि जडप्राणवादाशी व विश्वासाच्या अन्य प्रकारांशी धर्माचे असलेले संबंध दाखवून दिले आहेत. आदिम धर्म व श्रद्धा यांचा परिपूर्ण उहापोह कर्स्टन करतो. डायमंडच्या

**इव्हॉल्यूशन ऑफ लॉ अँन्ड ऑर्डर** ( लंडन, १९५१ ) या अलीकडच्या ग्रंथात 'धर्म' या विषयावर एक प्रकरण आहे. ८१-७.

१९. बॉक्वेट, पूर्वोक्त, २१२.

२०. या प्रश्नावर पुढील संदर्भ पाहता येतील : जोसेफ शाख्ट ( Schacht ) 'इस्लामिक लॉ, 'एन्सायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेस, खंड ८, ३४४-४९; जी. ई. व्हॉन ग्रूनेबाउम ( Grunebaum ). मिडिएव्हल इस्लाम, ( शिकागो, १९४७ ), एच्. ए आर. गिब, मॉडर्न ट्रेंड्स् इन् इस्लाम ( शिकागो, १९४७ ); आणि ओ. एम्. एल्. ( २ री आवृत्ती, पुनर्मुद्रित : ऑक्सफर्ड, १९६० ) या माझ्या ग्रंथाची प्रस्तावना.

२१. आज उपलब्ध असलेली सर्वात अधिकृत संहिता, इब्न हिशामकृत सीरा, संपा. वुएस्टेनफेल्ड ( Wuestefeld ), ( गॉटिंगेन [ Goettingen ] १८५८-५९ ). ९६८-६९ ही आहे; त्याशिवाय कैरो आवृत्तीही पहा. संपा. मूहयिद्दीन अब्दुलहमीद, भाग पाचवा, २५५-६. अनेक हदीसांच्या संहितामध्ये नंतरच्या मुख्य संहितेत झालेले प्रक्षेप आढळतात. आणि त्यांची प्रतिबिंबे भाषांतरांमध्येही पडलेली आहेत. उदा० म्यूर ( Muir ) लाइफ ऑफ मोहम्मद ( चौथी आवृत्ती, १९२३ ). ४७२-७४; आणि अमीर अली, स्पिरिट ऑफ इस्लाम, ११३-१४. पुढील संदर्भही देता येतील : हयकल पाशा, हयात मुहम्मद ( चौथी आवृत्ती, कैरो ). ४८९-९१; सुलेमान नद्वी, सीरतुन्-नबी ( आजमगढ, १९२४ ) खंड दुसरा, ११८-३२; काजी मुहम्मद सुलेमान, रहमतुन लिल-आलमीन (लाहोर, अदिनांकित ), ३१९- तदनंतरची पृष्ठे; आणि लेवी ( Levy ) सोशिऑलॉजी ऑफ इस्लाम, खंड पहिला, ८७.

'अखेरच्या यात्रेतील धर्मोपदेश' (हिज्जतुल-वदा किंवा हिज्जतुल-बलाग) या ग्रंथाचा संदर्भ इतका नेहमी देण्यात येतो की त्याबद्दलचे सगळे संदर्भ देणे अनावश्यक, आणि खरे तर अशक्यच आहे. इब्न हिशामच्या संहितेचे अरबी भाषेच्या वैशिष्ट्यपूर्ण लकबींच्या चौकटी सांभाळून जेवढे शक्य होईल तेवढे प्रामाणिक आणि शब्दशः भाषांतर देण्याचा प्रयत्न मी यापुढील काही पृष्ठांमधून करणार आहे.

२२. अमीर अली, स्पिरिट ऑफ इस्लाम ( लंडन, १९२२ ), ११३.

२३. शब्दश: 'जाहिलियचे दिवस 'चा अर्थ वन्यावस्थेचा कालखंड असा होतो. बहुतेक वेळा अज्ञानाचे दिवस असे त्याचे चुकीचे भाषांतर केले जाते. आर. ए. निकील्सन, लिटररी हिस्ट्री ऑफ अरब्ज, ३०, उद्धृत : इग्नाज गोल्डझिहर ( Ignaz Goldziher ).

२४. इथे इब्न हिशामने प्रेषिताच्या वक्तव्याचा भाग नसलेली एक स्पष्टीकरणात्मक नोंद जोडली आहे 'बनू लैसच्या टोळीत त्याचे पालनपोषण झाले होते पण हुजैलने त्याचा खून केला होता.'

२५. कुराण ६५, १.

२६. कुराण ४, ३४.

२७. किंवा 'विशिष्ट आज्ञा.' इंग्रजीत ( Clear thing ) हा अर्थ नेमक्या शब्दात व्यक्त करणे अवघड आहे.

२८. कुराण ४९, १० या ठिकाणी मुमिन असा शब्द आहे. मुस्लिम असा नाही.

२९. ओ. एम्. एल्. ३१०; इस्माइली लॉ ऑफ विल्स, २६, परिच्छेद तिसरा.

३०. डी. एस्. मार्गोलिऑथ, 'उमर 'स् इंस्ट्रक्शन्स टु द काजी ' जे. आर. ए. एस्. फॉर १९१०, ३०७, ३११–१२. या सूचना कायदेविषयक व अन्यही साहित्यात वारंवार उद्धृत केल्या जातात. उदाहरणार्थ पहा : तयबजी, मुहाम्मडन लॉ ( तिसरी आवृत्ती ), ८३–४; हयकल पाशा, अल-फारूक उमर ( कैरो, हिजरी शके १३६४ ) खंड दुसरा, २२५–२७; शिब्ली नूमानी, अल्-फारूक ( दिल्ली, १९१३ ) खंड दुसरा, ४१; प्रस्तुत लेखकाचे ' लॉ ॲन्ड कल्चर इन् इस्लाम ' ( १९४३ ) इस्लामिक कल्चर, ४२२, ४२६–७; ओ. एम्. एल्. २७८–७९.

३१. तोर आंद्रे ( Tor Andrae ), मोहम्मद ( लंडन, १९३६ ), १८०.

३२. हयकल पाशा, शिब्ली व तयबजी यांचे उपरिनिर्दिष्ट ग्रंथ.

३३. बैजवी, संपा. फ्लायशर, खंड १ पृ. १४५ ( ओळी १६–२५ ); अबुल कलाम आजाद, तर्जुमानुल कुरआन (दिल्ली, पहिली आवृत्ती, अदिनांकित)

खंड– १, २८१; अशरफ अली थानवी, **बयानुल कुरआन**, कुराणावरचे सुन्नी तत्वानुसार करण्यात आलेले उर्दू भाषेतील प्रमाणित भाष्य, भाग दुसरा ( दिल्ली, १९४९–१९३१ ) ३–४; आणि डी. रहबर, **गॉड ऑफ जस्टिस** ( ब्रिल, लंडन १९६० ) १९४– तदनंतरची संबंधित पृष्ठे.

३४. या संदर्भात कुराण ४, ३४ ही मूलभूत संहिता आहे. याशिवाय पाहा. आर. लेवी, **सोशिऑलॉजी ऑफ इस्लाम**, भाग १, १३१ – तदनंतरची संबंधित पृष्ठे; १४० –४. अन्य उदाहरणे, घटस्फोटाचे कायदे, ओ. एम्. एल., १२६ – तदनंतरची संबंधित पृष्ठे; पुरुषांना ज्यान्वये दुप्पट वाटा मिळतो असे वारसाविषयक कायदे, कित्ता, ३३१.

३५. कित्ता, ३१८.

३६. कित्ता, १२७, १४२ – ४४.

३७. ही **हदीस** अनेक स्वरूपांत आपल्यापर्यंत आली आहे, ओ. एम्. एल., १७.

३८. अरबी संहिता, सटीक संपादित, आसफ ए. ए. फैजी, खंड – १, १९५१; खंड २, १९६१; मारेफ प्रेस, कैरो. मृत्युपत्रावरील प्रकरण मी **द इस्माईल लॉ ऑफ विल्स** ( ऑक्स्फर्ड, १९३३ ) या ग्रंथात संपादित व भाषांतरित केले होते. या ग्रंथाचा संक्षिप्त संदर्भ आय. एल्. डब्ल्यू. असा यापुढे दिला जाईल. अलीचे मृत्युपत्र अरबी संहितेत पृष्ठे ३४ – ४६ आणि इंग्रजी भाषांतरात पृष्ठे ६७ – ७८ यावर आढळेल. यापुढील विवेचनात कंसात दिलेले आकडे याच ग्रंथातील पृष्ठक्रमांक आहेत.

३९. **खलिफा** आणि **इमाम** यांच्यात फरक असा की, सुन्नीचा **खलिफा** हा जरी स्वतंत्र ऐहिक राज्यकर्ता असला तरी प्रेषिताचा वारसदार आणि **शरिआचा** सेवक आहे. तर शियांचा **इमाम** हा, त्याला जरी ऐहिक सत्ता नसली तरी तो कायद्याचा पृथ्वीवरील अंतिम भाष्यकार आहे आणि जमातीचा ' नेता ' आहे. ओ. एम्. एल., ३१ – तदनंतरची संबंधित पृष्ठे. इब्न बाबवयूही यांनी इसना अशरी धर्ममत या विषयावर केलेल्या सर्वात प्राचीन अभ्यासासाठी माझ्या, **शियाईट क्रीड** ( आय. आर. ए सिरीज क्रमांक –९ ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९४२ ) या पुस्तकाची सूची पाहा.

४०. **बलाया** ही शियांमधील मूलभूत संकल्पना आहे; **शियाईट क्रीड**च्या पृ. ९६ वरील तळटीपेत (६) तिची सविस्तर चर्चा केलेली आहे.

४१. दआइमूल, इस्लाम खंड – १, ३, वेनसिंक ( Wensinck ), मुस्लिम क्रीड (केंब्रिज–इंग्लंड, १९३२ ), २२ – तदनंतरची संबंधित पृष्ठे आणि वसियत अबी हनीफाचे पहिले प्रकरण, १२५.

४२. कुराण ३१, १७.

४३. पाहा, जोसेफ शाख्ट, ' Saria and Qunun in Modernen Aegypten ' Der Islam खंड २०, १९३२, २०९ – ३६.

४४. हझार्ड ॲटलास ऑफ इस्लामिक हिस्ट्री, ( प्रिन्स्टन, १९५१ ), ५.

४५. ( ४ ) आणि ( ५ ) मधील आकडे ऑक्स्फर्ड ॲटलास, १९५१ मधून घेतलेले आहेत.

४६. द अंगोरा रिफॉर्म ( लंडन, १९२७ ) ३० – १.

४७. उद्धृत, तयब्जी, मुहामडन लॉ ( तिसरी आवृत्ती, मुंबई, १९४० ) ८२०.

४८. जे शाख्ट, ऑरिजिन्स ऑफ मुहामडन ज्यूरिस्प्रूडन्स, २८७, ३२४.

४९. डायमंड, एव्होल्यूशन ऑफ लॉ अँड ऑर्डर, ३०३.

५०. ॲलन, लॉ इन द मेकिंग ( ऑक्स्फर्ड, १९२७ ), ५४.

५१. ऑक्स्फर्ड ॲटलास, २५. गेल्या दहा वर्षांत लोकसंख्या बरीच वाढली आहे आणि वरील आकड्यांऐवजी अनुक्रमे ३ अब्ज व ८० कोटी हे आकडे वस्तुस्थितीच्या अधिक जवळ जाणारे ठरतील.

प्रकरण तिसरे

# भारतात इस्लामी कायदा आणि ईश्वरशास्त्र

इस्लामनुसार ईश्वरच कायद्याचे व धर्माचे उगमस्थान आहे. **शरीआ** आणि **फिकह्** म्हणजेच नैतिक कायदा आणि नागरी कायदा, या कायद्याच्या दोन संकल्पनांमध्ये जवळचा संबंध असण्याचा आधार हे मूलभूत तत्त्वच आहे. कायदा आणि धर्म यांच्यात स्पष्ट अंतर करणे त्यामुळेच शक्य होत नाही. जरी स्नाऊक हुरग्रॉंज[१] पासून सगळ्या विद्वानांनी इस्लामी कायद्याचे हे दुहेरी स्वरूप नोंदवलेले असले, तरी या दुहेरीपणातील एकत्वाच्या ध्वन्यर्थाचे सटीक व परिपूर्ण परीक्षण अजूनही आपल्याला उपलब्ध नाही. आधुनिक दृष्टिकोणाचा केवळ प्राथमिक आढावा घेण्याचा प्रयत्न या आधीच्या प्रकरणात करण्यात आला आहे.

ईश्वर हा कायद्याचा कर्ता आहे, या धर्मशास्त्रीय तत्त्वाची व वैधानिक कल्पिताची, त्याच्या ऐतिहासिक व तत्त्वज्ञानात्मक बाजूंनी तपासणी करण्यापासूनच आधुनिक विश्लेषणाचा आरंभ झाला पाहिजे. त्यातून हे स्पष्ट झाले पाहिजे की सेमाइटांमध्येच ( विशेषतः यहुदी व मुसलमान यांच्यामध्येच ) कायद्याला खास करून दैवी निर्मिती का मानण्यात आले ? आणि त्याचे पुढे कोणते परिणाम झाले ? तुलनात्मक विधिशास्त्र, कायद्याचे आधुनिक सिद्धांत, राजकीय बदल, सांस्कृतिक विकास आणि आंतरराष्ट्रीय संबंध यांच्या प्रभावाखाली इस्लामी समाजाला पवित्र कायदा ( **शरीआ** ) आणि निधर्मी कायदा ( **कानून** ) यांच्यात आवश्यकतः स्पष्ट क्रमशः फरक करण्याचा आरंभ कुठून व कसा करता येईल आणि त्या दृष्टीने **फिकह्**चे समुचित परीक्षण करण्याची गरज कशी निर्माण झाली आहे हेही सांगितले गेले पाहिजे.

हा काही परिपूर्ण असा ऐतिहासिक आढावा नाही; एका दीर्घकालीन प्रश्नासंबंधी भारतीय दृष्टिकोण मांडण्याचा हा केवळ एक प्रयत्न आहे. विसाव्या शतकाची वैधानिक व ऐतिहासिक तत्त्वे इस्लामच्या मूलभूत प्रश्नाला लागू करण्याचा आणि **शरीआ**च्या आधुनिक समालोचनाची तात्पुरती ( tentative ) पद्धती मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

एम्. बी. अहमद यांनी आपल्या अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ जस्टिस इन् मेडिईव्हल इंडिया ( अलिगढ विद्यापीठ, १९४१ ) नामक ग्रंथात तशी सुरुवात केली असली तरी मध्ययुगीन कालखंडात जेव्हा उत्तर हिंदुस्थान मुसलमानी अमलाखाली होता तेव्हा येथे रूढ असलेल्या कायद्याचा व वैधानिक कार्यपद्धतींचा परिपूर्ण इतिहास अजून लिहिलाच जायचा आहे. मुसलमान राज्यकर्त्यांनी शरीआच्या नियमानुसार न्यायाचे प्रशासन करण्यासाठी आपापल्या धार्मिक उपपंथांचे विधिनियम प्रस्थापित केले होते, आणि तरीही मुस्लिम कायदा मुस्लिमेतरांवर बळजबरीने लादता येणार नाही हे फार पूर्वीपासून मान्य करण्यात आले होते. मध्य आशियायी तुर्क असलेले हनाफी पंथाचे मोंगल राज्यकर्ते धर्माबद्दल कट्टर नव्हते हे सर्वज्ञातच आहे. त्यांनी, आणि खरे तर हिंदुस्थानातील बऱ्याच मुस्लिम राजांनी व नेत्यांनी, धर्माला राजकीय उद्दिष्टांची बटीक बनवले होते. मोंगल सम्राट सर्वसामान्यत: हिंदुप्रजाजनांसाठी हिंदु कायदा व मुसलमानांसाठी मुस्लिम कायदा लागू करीत असत. मुस्लिम सम्राटांनी नेमलेले काजी ( न्यायाधीश ) धर्माच्या व शरीआच्या नियमांमधून उद्भवलेल्या गुंतागुंतीच्या प्रश्नांवर विद्वान पंडितांचा व प्रशिक्षित मुफ्तीचा सल्ला घेत असत.

१७ व्या व १८ व्या शतकांत आधी ईस्ट इंडिया कंपनीने आणि नंतर ब्रिटिश सरकारने मोंगल सम्राटांना पदच्युत केले. हिंदुस्थानच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनी लोकांमध्ये प्रचलित असलेले धार्मिक कायदे, रूढी व लोकाचार यांना शक्यतो बदलण्याचे टाळले. त्यांच्या दृष्टीने पाहिल्यास हा सुज्ञपणाच ठरला. प्रसिद्ध न्यायाधीश व प्राच्यविद्याविशारद सर विल्यम जोन्स म्हणतो, 'ज्या कायद्यांना ते सदैव आपल्या नागरी जीवनातील वर्तनाचे व व्यवहाराचे नियम मानतात त्याच कायद्यांचा, त्यांचे आपापसातील खाजगी तंटे निकालात काढताना, हवाला घेणे यापरते उघडउघड न्याय्य असे काही असूच शकत नाही; तसेच ग्रेट ब्रिटनच्या हिंदु आणि मुसलमान प्रजाजनांना जे वेगवेगळे खाजगी कायदे पवित्र वाटतात, आणि ज्यांचा भंग झाल्यास तो त्यांना सर्वात दुख:दायक जुलूम वाटेल असे कायदे, त्यांना अज्ञात असलेल्या आणि सक्ती व असहिष्णुतापूर्वक आपल्यावर लादली जात आहे असे जिच्याबद्दल वाटेल अशा नव्या विधिपद्धतीद्वारे डावलले जाणार नाहीत अशी कायदेशीर हमी हिंदु-मुसलमानांना देणे यापरते सुज्ञपणाचे दुसरे कृत्य असू शकणार नाही '[२] मोर्ले त्याला अशी पुस्ती जोडतो की, 'हिंदु वा मुस्लिम कायदे बदलण्याच्या वा रद्द करण्याच्या औचित्यासंबंधी विचार करीत असताना आंग्ल आणि नेटिव विधिशास्त्रपद्धतींच्या सापेक्ष उजवेपणाबद्दलच्या पूर्वसंकल्पित कल्पनांना दुय्यम निकषाचे स्थान दिले गेले पाहिजे; अशा पद्धती मूलत: चांगल्या आहेत की वाईट असाही प्रश्न उपस्थित केला जावू नये; कारण हिंदुस्थानातील समाजाच्या सद्य:स्थितीत देशातील लोकसंख्येत ज्यांचा मोठा भाग आहे अशा लोकांच्या गरजांशी व पूर्वग्रहांशी त्या नि:संशय अत्युत्तमपणे जुळलेल्या आहेत; लोकांच्या श्रद्धेच्या त्या अविभाज्य घटक ठरल्या आहेत.

आणि आम्ही जरी निरुपाधिक तहाने बांधले गेलेलो नसलो तरी वेळोवेळी काढलेल्या जाहीरनाम्यांच्या व कायद्यांच्याद्वारे आम्ही त्यांचे जतन करण्यास स्वतःला वस्तुतः वचनबद्ध केले आहे, याचा विसर कधीच पडू देता कामा नये.'[3] या देशाच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनीही मोंगल सम्राटांच्या पावलांवरच पावले टाकली असल्याचे दिसून येईल; सामान्य कायद्याच्या ( कॉमन लॉ ) पद्धती आयात करून, समन्यायाच्या ( इक्विटीच्या ) तत्त्वाची अंमलबजावणी करून आणि आधुनिक धर्तीचे कायदे करून त्यांनी या देशातील आधीच्या न्यायप्रशासनाच्या पुढे फार मोठी मजल मारली.

## ॥ २ ॥

ब्रिटिश काळातच पुढील तत्त्वे कालगतीने उदयास आली :

१. प्रत्येक माणसाला त्याचा स्वतःचा व्यक्तिगत धार्मिक कायदा लागू केला गेला पाहिजे – 'मुसलमानांच्या बाबतीत कुराणाचे कायदे आणि जेंटूंच्या ( Gentoos च्या ) बाबतीत शास्त्रांचे कायदे नेहमी लागू केले जातील.'[४]

२. व्यक्तिगत दर्जाशी संबंधित असलेल्या बाबींमध्ये प्रत्येक हिंदु व मुसलमान माणसाशी त्याच्या स्वतःच्या विशिष्ट पंथा–( मजहब )–नुसार ( दीन म्हणजे धर्म, मजहब त्याहून निराळा ) व्यवहार केला जात असे. शिया किंवा सुन्नी या दोन ठळक जमातींना आपापल्या विशिष्ट पंथाचा कायदा लागू केला जावा या विधिनियमामागची हीच भूमिका आहे. उदाहरणार्थ, जर एखादा हनफी मरण पावला, तर वारसा हक्काविषयीचा हनफी कायदा लागू केला जावा; पण फातिमी कायद्याने नियंत्रित असलेला एखादा इस्माईली मरण पावला तर दआइम्-उल्-इस्लामचा कायदा लागू ठरे. तद्वत्च हिंदूंमध्येसुद्धा विविध प्रांतांच्या आपल्या स्वतःच्या कायदा व न्यायिक अन्वयार्थ यांच्या पद्धती होत्या. काजीने आपले स्वतःचे किंवा राज्यसत्तेवर असलेल्या पंथाचे विधिनियम अनुसरावेत, हे जे मुस्लिम तत्त्व होते ते हिंदुस्थानात पाळले जात नव्हते.[५]

३. जिथे वादी–प्रतिवादी भिन्नधर्मीय असतील तिथे प्रतिवादीचा कायदा लागू केला जात असे. अशा प्रकारे जर वादी म्हणून एखाद्या हनफीने अग्रक्रयाधिकारासाठी एखाद्या इसना अशरी प्रतिवादीविरुद्ध दावा केला तर इसना अशरी शियापंथीय कायदा लागू केला जाईल. किंवा विवाहातील

दोन पक्ष जर भिन्नपंथीय असतील तर बचावपक्षाचा कायदा लागू केला जावा असा सर्वसाधारण दंडक होता.[६]

४. लोकांच्या धार्मिक भावनांना धक्का लागू नये म्हणून वैधानिक कायद्याची वाढ क्रमशः व्हायची होती. हिंदुस्थानच्या सर्वच राज्यकर्त्यांनी हिंदूंच्या व मुसलमानांच्या धार्मिक धारणांविषयीच्या बाबींसंबंधी, सहिष्णुतेच्या दीर्घकालीन परंपरेला धरून; लोकांच्या धार्मिक कायद्यांमध्ये वैधानिक हस्तक्षेप करण्यापूर्वी बराच काळ वाट पाहिली होती. त्यामुळे प्रगती जरी धीम्या गतीने झाली असली तरी परिणाम एकंदरीत हितावहच झाले आहेत.

१९५० साली स्थापन झालेले भारतीय गणराज्य हे तत्त्वतः धर्मनिरपेक्ष राज्य आहे. इथे शासनाचा असा धर्म नाही, प्रत्येक धर्माला संपूर्ण समतेची वागणूक मिळण्याचा हक्क आहे. तरीपण धर्मावर आधारित व्यक्तिगत कायदे नष्ट करण्यात आलेले नाहीत. आणि, ब्रिटिश परंपरा व प्रथा चालूच राहिल्या आहेत. व्यक्तिगत दर्जासंबंधीचे लोकांचे धार्मिक कायदे वाजवी मर्यादेत अमलात ठेवण्याचे धोरण आहे. परंतु हिंदु व मुस्लिम कायद्याचा अन्वयार्थ लावताना त्या कायद्याच्या काटेकोर शब्दांवर इंग्रजी समन्यायतत्त्व व सामाजिक न्यायाच्या नियमांशी संबंधित असलेले काळाचे व परिस्थितीचे तत्त्व — यांचे कलम बांधण्यात येते. त्यामुळे इथल्या दोन्ही देश्य विधिव्यवस्थांवर समन्यायतत्त्वासह इंग्रजी सामान्य कायद्याचा लक्षणीय प्रभाव पडला आहे.

उद्योगधंद्यांची वाढ आणि आर्थिक परिस्थितीतील बदल झाल्यानंतर लोकांच्या नव्या आर्थिक व सामाजिक जीवनाशी जुळतील अशा बऱ्याच नव्या कायद्यांची भर पडली. भारतीय संसदेने १९५१ आणि १९५२ साली केलेल्या कायदेविषयक कामगिरीवर नजर फिरविल्यास असे दिसून येईल की, तथाकथित कामगारवर्गाच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या हेतूने या देशाने द्रुतगतीने पावले उचलली. कोळशाच्या खाणींविषयीचा वटहुकूम, स्थावर मालमत्तेच्या मागणीविषयीचा आणि अर्जनाविषयीचा वटहुकूम, दिल्ली विद्यापीठ दुरुस्ती कायदा, खाणी–कायदा, चलच्चित्र कायदा, चौकशी आयोग कायदा आणि राखीव आणि सहाय्यक दलांविषयीचा कायदा अशी काही १९५२ साली पास करण्यात आलेल्या कायद्यांची उदाहरणे देता येतील.*

शरिआ किंवा धर्मशास्त्र यांच्यात सांगितलेल्या कायदेशीर, नैतिक व आध्यात्मिक निकषांशी ह्या धर्मातीत, आधुनिक व वैधानिक कायदे–संचाला काहीच कर्तव्य नाही. भूतकाळाशी ज्याचे कसलेच नाते नाही, व पवित्र कायद्यांना परिचित असलेली मूल्ये

ज्याला अडवू शकत नाहीत असे ते खास आपल्या काळाचे अपत्य आहे. जरी काही प्रसंगी त्याचे निकाल शरीआच्या निकालांसारखेच निघत असले, किंवा अन्य काही प्रसंगी कायद्याला **मुबाह्** ( क्षम्य ) म्हटले जाऊ शकत असले तरी न्यायिकदृष्टया ते फारसे महत्त्वाचे नाही. धर्मातीत आणि आधुनिक राज्यात राहणाऱ्या मुसलमानाला नव्या कायद्यांचे व नव्या विधिप्रमाणांचे, मग ते शरीआला धरून असोत वा नसोत, पालन करण्याची मुभा व स्वातंत्र्य असले पाहिजे, या गोष्टीला आपण सामोरे जायला हवे. काही योग्य आणि कायदेशीर बाबी शरीआच्या नियमांमधून पूर्णतया सुटलेल्या असतील, तसेच काही अन्याय्य व असमर्थनीय नियम शरीआला संमत असलेल्या कायद्यांच्या कक्षेत येत असतील हे उत्तरोत्तर स्पष्ट होत चालले आहे. भारतात **तलाक** ( घटस्फोट )-संबंधी जो हनफी कायदा आहे त्याच्या काही तरतुदींचा यासंदर्भात उदाहरणार्थ निर्देश करता येईल.

## ॥ ३ ॥

येथवर आपण निवळ कायद्याबद्दल म्हणजे न्यायालयासमोर येणाऱ्या कायद्याबद्दल बोललो. पण इस्लाममध्ये हा कायदा धार्मिक नियम आणि धर्मकृत्ये यांच्यात घट्टपणे गुंतलेला आहे. **इबादात** ( उपासनेचे भक्तिपर नियम ) आणि **मुआमलात** ( ऐहिक व्यवहारविषयक नियम ) या दोहोंशी संबंधित असलेल्या शरीआच्या पाठ्यपुस्तकांवरच आपल्याला भिस्त ठेवावी लागते. ज्या उलेमांकडे माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी आपल्याला जावे लागते ते मुख्यत्वे धार्मिक उपदेशक असतात. मी एकदा भारतातील एका इस्माईली विद्वानाला विचारले, 'आपण मला काही उपयुक्त माहिती देऊ शकाल काय ?' तो उत्तरला, 'तू जर सत्यान्वेषी ( **तालिब्-इ-हक** ) असशील आणि तुला जर तुझ्या आत्मिक कल्याणासाठी माहिती हवी असेल तर – होय; पण केवळ व्यर्थ कुतूहल किंवा नुसती विद्वत्ता म्हणून जर तुला ती हवी असेल तर – नाही !' चिकित्सक अभ्यासक आणि पारंपरिक धर्मशास्त्री यांच्या दृष्टिकोणातील फरक यावरून स्पष्ट होतो.

ब्रिटिश अमलाच्या सुरुवातीला **पंडित** ( हिंदु कायद्याचे विशेषज्ञ ) व **मुफ्ती** ( इस्लामी कायद्याचे सल्लागार ) हे न्यायालयाशी जोडलेले असत. **मुफ्ती** हे अगदी पूर्णतया प्रशिक्षित, शिस्तबद्ध आणि शास्त्रांवर पोसलेले उलेमा ( काटेकोर उच्चार उलमा ) असत. गादीवर असलेल्या सम्राटाने निवडलेल्या मुफ्तींनी सुप्रसिद्ध फतवा आलमगीरीची रचना आधुनिक दिल्ली शहराच्या परिसरातच केली. हिजरी शके अकरा/

ख्रिस्तोत्तर सतराव्या शतकात सम्राट औरंगजेब आलमगीर ह्याच्या आज्ञेवरून शेख निजाम बुऱ्हानपुरी व अन्य चौघे ह्यांना संगृहीत केलेले फतवे ( विधिसल्लागारांची मते) त्यात एकत्र आढळतात.

ख्रिस्तोत्तर १५ व्या शतकापासून, किंवा तत्पूर्वीपासूनच, भारतीय उपखंड हे हनफी कायद्याच्या सुप्रसिद्ध पाठशालांचे आश्रयस्थान बनले होते. १९५० सालच्या अंदाजी खानेसुमारीनुसार पारंपरिक पद्धतीचे ८८ अरबी मदरसे एकट्या भारतीय गणराज्यात अस्तित्वात होते. ते सगळेच महत्त्वाचे व प्रभावी होते असे नसले तरी ज्याच्यावर शिब्ली नूमानीने आपल्या खुतबात ' मध्ये टीका केली होती असा दर्स-इ निजामी म्हणून विख्यात असलेला अभ्यासक्रम तिथे शिकवला जात असे. अबुल हसनात नद्वीकृत [९] जुन्या धर्तीच्या मदरशांचे अगदी परिपूर्ण वर्णन, आणि मनाजिर अहसन जीलानी [१०] कृत भारतातील इस्लामी शिक्षणाचा इतिहास आज आपल्याला उपलब्ध आहे. इस्लामी शिक्षणाची भारतातील भव्य परंपरा आज पश्चिमेत माहीत नसण्याचे मुख्य कारण, जिवंत अशा इस्लामी संस्कृतीच्या अध्ययनासाठी सर्वात महत्वाच्या असलेल्या अरबी भाषेच्या खालोखाल माझ्या मते जी महत्वाची भाषा आहे त्या उर्दूची प्राच्यविद्याविशारदांनी दुर्दैवाने घोर उपेक्षा केली हेच होय. ज्याप्रमाणे अरबी भाषेच्या ज्ञानावाचून इस्लामचा प्राचीन इतिहास समजणे अशक्य आहे त्याप्रमाणेच इस्लामी विचारांमधील आधुनिक घडामोडींचे आकलन उर्दू भाषेच्या ज्ञानावाचून होणे अशक्य आहे. उर्दूतील धार्मिक लिखाण फार्सी आणि तुर्की भाषांमधीन धार्मिक लिखाणापेक्षा बहुधा अधिक अस्सल स्वरूपाचे आणि आधुनिक अरबी भाषेतील लिखाणाच्या व्याप्तीशी व अस्सलपणाशी तुल्यबळ ठरावे असे आहे. पुढे जेव्हा शाह वलिउल्लाह, सर सय्यद अहमदखान, शिब्ली आणि प्रा. मुहम्मद अजमल खान प्रभृतींच्या ग्रंथांचा आपण विचार करू तेव्हा हे दाखवले जाईल.

प्रचंड संख्येच्या या धार्मिक मदरशांपैकी सर्वात महत्त्वाचा म्हणून देवबंदच्या दारूल-उलूम [११] चा उल्लेख करता येईल. सुमारे ८० वर्षापूर्वी त्याची स्थापना झाली, आणि त्यात १२०० विद्यार्थी आहेत. 'पूर्वेकडील अजहर ' असे त्याला सार्थपणे म्हटले जाते, आणि अध्ययन, धर्मनिष्ठा, साधेपणा व आध्यात्मिक प्रभाव यांची तिथली परंपरा लक्षात घेता ही तुलना योग्यच ठरते. दारुल उलूम देवबंद हे हनफी पंथाच्या ईश्वरविज्ञानाचे विद्यालय आहे. सीरतुन नबी ( प्रेषिताचे सहाखंडात्मक चरित्र ) [१२] शीरूल-अजम ( फार्सी कवितेचा पंचखंडात्मक इतिहास ) आणि अबू हनीफ, रूमी, अल् गजाली, उमर अल्-फारूक व इतर यांच्यावरच्या अनेक पुस्तिका ( tracts ) व प्रबंधिका (Monographs ) लिहिणाऱ्या शिब्ली नूमानी ह्या १९ व्या शतकातल्या ओजस्वी विचारवंताच्या आश्रयामुळे सुविख्यात झालेली नद्वतुल उलमा ( लखनौ )

हे विद्यालयही याच प्रकारचे आहे. अरबी व फार्सी भाषांवरच्या अतुलनीय प्रभुत्वाबरोबरच शिब्ली नूमानी हे त्यांची जन्मभाषा नसलेल्या उर्दू भाषेत, नितळ, पीळदार आणि अभिजात शैलीत प्रभावीपणे लिहीत.

## ॥ ४ ॥

ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकाच्या आरंभी दिल्लीत सुलतानी सत्ता स्थापन झाल्यापासून अरबीच्या अध्ययनाची अभिजात परंपरा भारतात अखंड चालू राहिली आहे. काही फेरफार सोडता, मुस्लिम जगताच्या इतर भागांत आपल्याला चिरपरिचित असलेल्या वैशिष्ट्यांनी परिपूर्ण अशी ही प्रदीर्घ व सन्मान्य परंपरा आहे. इतर देशांत अरबीने स्थानिक बोलीभाषांना डावलले, पण भारतात मात्र तिने हिंदी व उर्दू या देशी भाषांना पुष्टी दिली, आणि राजभाषा असलेल्या फार्सीला आधार दिला.

इथे अनेक मदरसे असल्याचा एक परिणाम म्हणजे भारतीय शाळांमध्ये काही प्रमाणात अभ्यासाचे विशेषीकरण (स्पेशलायझेशन) झाले. पुढील चित्र हळूहळू आकारास आले : पंजाबात व्याकरण; दिल्लीत हदीस आणि विवरण; रामपूरला तर्कशास्त्र; व तत्त्वज्ञान; लखनौला कायदा आणि ईश्वर शास्त्र[15]

निसाबबद्दल म्हणजेच या शाळांमधील अभ्यासक्रमांबद्दल इथे थोडेसे लिहिणे आवश्यक आहे. भारतातील अरबी मदरशांमधील सध्याच्या अभ्यासक्रमाची भारतीय विद्वानांनी बरीच छाननी व समीक्षा केली आहे. इथे त्या सर्व तपशिलात शिरण्याचा हेतू नाही. ते तपशील जीलानी[16] किंवा अबूल हसनात नदवी[17] यांच्या लिखाणात सापडतील. अब्दुल हय्य लखनवीने १९०९ साली[18] लिहिलेला निबंध हा माहितीचा प्राचीन मूलस्त्रोत आहे. आणि जुन्या अभ्यासक्रमाच्या अनेक टीकाकारांमध्ये शिब्ली नूमानी हे सर्वात महत्त्वाचे आहेत.[19] अभ्यासक्रमाचा विचार त्याच्या विकासाच्या पाच टप्प्यांच्या अनुषंगाने करता येईल. ते टप्पे असे :

१. हिजरी शके ७ वे – १० वे शतक / ख्रिस्तोत्तर १३ वे – १६ वे शतक;
२. हिजरी शके १० वे – ११ वे शतक / ख्रिस्तोत्तर १६ वे – १७ वे शतक;
३. हिजरी शके ११ वे – १२ वे शतक / ख्रिस्तोत्तर १७ वे – १८ वे शतक;
४. हिजरी शके १२ वे – १३ वे शतक / ख्रिस्तोत्तर १८ वे – १९ वे शतक;
५. हिजरी शके १४ वे शतक / ख्रिस्तोत्तर १९ वे – २९ वे शतक.[20] आपण

शेवटच्या दोहोंवरच लक्ष केंद्रित करू.

चवथा टप्पा हिजरी शकाच्या १२ व्या शतकात मुल्ला निज़ामुद्दीन या थोर प्रकांड पंडिताच्या काळात अस्तित्वात आला. मुल्ला निज़ामुद्दीन हे भारतात एक विद्वान म्हणून आणि अभ्यासक्रमांचे निर्माते म्हणून अद्वितीय मानले गेले होते. लखनौच्या शेजारीच असलेल्या सोहाली नावाच्या खेड्यात त्यांचा १०९० / १६७९ मध्ये जन्म झाला. ११०५ / १६९३ मध्ये ते पंधरा वर्षे वयाचे असताना लखनो शहरात औरंगजेबच्या आज्ञेवरून ' फिरंगी महल ' नावाचा मदरसा स्थापन झाला. काही जमिनी व इमारती मदरशाला दान करून निज़ामुद्दीनच्या दोन थोरल्या भावांच्या हाती तो सोपवण्यात आला. आपले प्रशिक्षण संपल्यावर त्यांनी, निज़ामुद्दीनने मदरशात शिकवायला आरंभ केला आणि आपले वडील मुल्ला कुतूबुद्दीन यांच्याबरोबर ते सहाय्यक प्राध्यापक झाले. निज़ामुद्दीन ११६१ / १७४८ मध्ये वयाच्या सत्तराव्या वर्षी निधन पावले.

निज़ामुद्दीन विद्वान व सच्चरित्र होते तसेच अखंड दरिद्रीही होते. श्रीमंतांशी वागताना गर्वोन्नत व गरिबांशी वागताना विचारी असे त्यांचे वर्तन असे. त्यांचे पुत्र सुप्रसिद्ध अब्दुलअली बहरुल्-उलूम हेही थोर विद्वान होते. निज़ामुद्दीनचे विद्यार्थी सुविख्यात होते आणि त्यांचे वारस आजही ' फिरंगी महल 'या नामांकित विद्यालयात अध्यापनाचे कार्य करीत आहेत. पण त्यांना चिरंतनत्व मिळाले आहे ते मुख्यत्वे त्यांच्या नावाशी निगडीत असलेल्या, दर्स - इ निज़ामी या अभ्यासक्रमाच्या निर्मितीमुळे. संक्षेपाने तो अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे देता येईल :

१. व्याकरण – शब्द – रूपविचार ( सर्फ ) : मीज़ान, मुन्शैब, सर्फ–इ मीर, शाफ़िया.

२. व्याकरण – वाक्यरचना : नह्व् इ - मीर, काफ़िया, शरहजामी.

३. तर्कशास्त्र ( मंतिक ) : सुघ्रा, कुब्रा, धर्मग्रंथशास्त्र ( Isagogy ). तहजीब, कुत्बी.

४. तत्त्वज्ञान ( हिकमत ) : मीब्ज़ी, सद्रा, शम्सि बाज़िगा.

५. पदार्थविज्ञान ( रियजिय्यात ) : खुलासतुल - हिसाब ( युक्लिड–पुस्तक– )

६. अलंकारशास्त्र ( बलागत ) : मुख्तसर मआनी, मुतव्वल

७. कायदा ( फ़िक़ह ) : शरह् विकाया, हिदाया.

८. कायदा उसूल : नूरुल - अन्वार , तल्वीह्, मुसल्लिमुस् सुबूत.

९. ईश्वरशास्त्र ( कलाम ) : अकायदा नसफी, शरह अकाइद जलाली, मीर ज़ाहिद, शरह् मवाकिकिफ

१०. अर्थबोधनशास्त्र (तफ्सीर ) : जलालैन, बेजावी.

११. पैगंबरवचने व कृत्ये ( हदीस ) : मिश्कातुल् मसाबीह.[१९]

मुल्ला निज़ामुद्दीन यांनी स्थापन केलेल्या या परंपरेचे मुख्य वैशिष्टय असे होते की, तिथे क्रमिक पुस्तक जरी नेमलेले असले तरी त्या ग्रंथाकडे फारसे लक्ष न देता त्याच्या भोवती ज्ञानाचे इतके विस्तृत जाळे विणले जात असे की त्यामुळे विद्यार्थ्यांचा अंतःचक्षू उघडला जात असे.

पाचवा टप्पा हा अखेरचा आहे आणि इथे आपल्याला पुस्तकांच्या संख्येत वाढ आणि तर्कशास्त्र, घोकंपट्टी व स्मरण यांवर भर दिलेला आढळतो.[२०] शिब्ली नूमानीनी प्राचीन अभ्यासक्रमाविरुद्ध सर्वात जोरदार टीकास्त्र १८९४ मध्ये सोडले.[२१] त्यांची सर्वसाधारण टीका अशी होती की, क्रमिक पुस्तक, त्याचे अर्थ, त्याची अनुमाने आणि त्यांच्यातले बदल या गोष्टींना अमर्याद महत्त्व दिले जाते. परंतु मुळ विषयाच्या बृहत्तर बाजूंना हातच लावला जात नाही. त्यांना असेही आढळले की, अरबिय्य, म्हणजे अरबी भाषेवरील प्रभुत्व, अपेक्षित दर्जाचे नाही आणि कुराणप्रणित शास्त्रांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. विशेषत : कुराणाच्या अननुकरणीय शैली ( ईजाज़ ) कडे फारच अपुरे लक्ष दिले जाते. आणि शेवटी, ग्रीकांकडून जी शास्त्रे अरबांनी उचलली त्यांचा अभ्यास करताना ती जशी उचलली होती तशीच, नंतर त्यात झालेल्या कोणत्याही प्रगतीचा अंतर्भाव न करता, शिकली-शिकवली जातात.

या आक्षेपांना पुढील पुस्ती जोडता येईल :

१. पाश्चात्य प्राच्यविद्याविशारदांचे ग्रंथ उलेमांना सामान्यत: माहीतच नसतात, आणि योगायोगाने जर काही संशोधने त्यांच्यापर्यंत पोचलीच तर त्यांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण शत्रुभावनेचा असतो, धर्मवेडेपणापेक्षा तो फारसा निराळा नसतो.

२. विज्ञान, तत्त्वज्ञान, इतिहास किंवा तौलनिक धर्म या विषयांत झालेल्या आधुनिक प्रगतीकडे लक्ष दिले जात नाही.

३. सिरियाक, हिब्रू, अरमेइक किंवा इथिओपिक या अन्य सेमिटिक भाषांच्या परिचयाची जोड भाषिक संशोधनाला मिळणे अनिवार्य असूनही तो इथे अनावश्यक समजली जाते.

४. इंग्रजी, फ्रेंच किंवा जर्मन अशा आधुनिक युरोपियन भाषांशी परिचय होणे हे निरर्थक मानले जाते. त्यामुळे या मदरशांमध्ये दिले जाणारे धार्मिक शिक्षण २० व्या शतकाच्या दृष्टीने पाहिल्यास खूपच असमाधानकारक ठरते हे उघडच आहे. या प्रशिक्षणाची तुलना आधुनिक पाश्चात्य विद्यापीठांच्या दैवीशास्त्राच्या पदवीशी ( Degree in Divinity शी ) केलीच जाऊ शकत नाही. कारण त्यात धर्माचा इतिहास, तौलनिक धर्म, तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान वा अध्यात्मविद्या या विषयांचे, ते आज जसे अभ्यासले जातात तसे, ज्ञान मिळण्याचा पुरेसा प्रयत्न केला जात नाही.

## ॥ ५ ॥

भारतातील इस्लामी शिक्षणाच्या परंपरेचा इतिहास देणे हा माझा हेतु नाही. पण आधुनिक काळाकडे येण्याच्या दृष्टीने गेल्या तीन शतकातील काही प्रातिनिधिक व्यक्तींबद्दल बोलणे आवश्यक आहे. त्या व्यक्ती म्हणजे – शाह वलिउल्लाह, सर सय्यद अहमद खान, उबेदुल्लाह सिंधी, अब्दुल हय्य आणि अशरफ अली थानवी.

' शाह वलिउल्लाह ' नावाने विख्यात असलेले शेख अहमद बिन अब्दुर् रहीम देहवली यांचा जन्म हिजरी शके १११४ / ख्रिस्तोत्तर १७०३ साली झाला आणि ११७६/१७६२ मध्ये दिल्ली येथे ते मरण पावले. मोंगल साम्राज्य खिळखिळे झाले होते; वाढत्या ब्रिटिश सत्तेचे ताबेदार असलेले दुर्व्यसनी–दुराचारी, अधम व नीच राजे देशाचे नामधारी राज्यकर्ते होते. पाश्चात्य प्रभावाच्या उसळत्या लाटेपुढे इस्लामचा धर्म खिळखिळा होण्याच्या धोक्यात सापडला होता. आणि विशेषत: इंग्रजी सामान्य कायद्याच्या तुलनेत इथल्या कायद्याचा व वैधानिक पद्धतींचा कमजोरपणा अधिकाधिक उघड होऊ लागला होता.

अशा परिस्थितीत वलिउल्लाह इस्लामचे शुद्धीकरण करण्यासाठी, सूफीवाद आणि कर्मठपणा यांच्यात कामचलाऊ समझोता घडवून आणण्यासाठी, आणि विद्वत्ता, धर्मनिष्ठा व तत्त्वज्ञानात्मक अगाधता यांचा एक तेजस्वी आदर्श देण्यासाठी उभे राहिले. इस्लामचे दुसरे खलिफा महान उमर अल् फारूक यांचे ते वंशज होते. आणि मध्य आशियायी तुर्की रक्त त्यांच्या धमन्यांमधून वाहत होते. त्यांचे गूढवादी व ईश्वरशास्त्री वडील अब्दुर्

रहीम हे फतावा आलमगीरीचे संकलक आणि दिल्लीच्या ' रहीमिय्या ' या मदरशाचे, संस्थापक होते. वलिउल्लाह यांनी वयाच्या सातव्या वर्षीच कुराण मुखोद्गत केले; १५ व्या वर्षी त्यांचे शिक्षण पूर्ण झाले आणि वडील वारल्यानंतर १७ व्या वर्षी रहीमिय्या मदरशाची सूत्रे त्यांनी हाती घेतली. ११४३ / १७३० आणि ११४५ / १७३२ या दरम्यान ते हज्‌ला गेले आणि काही काळ हिजाझमध्ये राहिले. आपल्या वादळी आयुष्याच्या अवधीत त्यांनी दिल्लीच्या सात राजांचे उदय आणि अस्त पाहिले. शाह वलिउल्ला हे चार सुपुत्रांचे जन्मदाते होते : विख्यात विद्वान अब्दुल अझीझ, ईश्वरशास्त्री आणि फ़की अब्दुल कादिर, कुराणाचे उर्दू भाषेतील सर्वप्रथम भाषांतरकार रफीउद्दीन आणि विद्वान–शिक्षक अब्दुल गनी.

शंभरावर पुस्तिका, प्रबंधिका व पुस्तके लिहिणारे शाह वलिउल्लाह हे बहुप्रसव लेखक होते. त्यांचे सर्वात महत्त्वाचे ग्रंथ :

१. **हुज्जतुल्-लाहिल-बालिगा** ( कैरो मुनीरिय्य प्रेस, हिजरी शके १३५२ ) ही त्यांची सर्वोत्तम कलाकृती होय. त्यांना कळलेला धर्माचा गुह्यार्थ आणि धर्माचा आधार या विषयांची सर्वांगपरिपूर्ण चर्चा त्यात असून त्याची तुलना अल्–गज़ालीच्या इहया उलूमिद-दीनशी केली जाते ती काही अनुचितपणे नव्हे. अरबी भाषेत अत्यंत आकर्षक शैलीत ते लिहिलेले असून धार्मिक आदेशांमागचे अस्तित्वकारण ते स्पष्ट करते. अल् अज़्हरमध्ये आजही अभ्यासल्या जाणाऱ्या क्रमिक पुस्तकांपैकी ते एक आहे.

२. **फत्हुर रहमान** हे कुराणाचे समासनोंदीसह केलेले फार्सी भाषांतर आहे.

३. **अल्-फौजुल-कबीर** ( फार्सी भाषेत ) : हदीसच्या अध्ययनाच्या तत्त्वावरील पुस्तक.

४. **इकदुल-जीद** ( फ़िक़ह ) : अर्थबोधनाचे द्वार ( **बाबुल इज्तिहाद** ) कधीच बंद होत नसते हे महत्त्वाचे तत्त्व यात त्यांनी मांडले आहे.

५. **अत्-तफ्हीमातुल-इलाहिय्या** ( सूफिवाद ) : अरबी व फार्सी. इब्नुल अरबी यांच्या वहदत अल्-वुजूद या तत्त्वांचा इमाम–इ रब्बानी अहमद सरहिंदी यांच्या वहदत अल्-शुहूदच्या तत्त्वांशी मेळ घालण्याचा प्रयत्न या ग्रंथात करण्यात आला आहे.

वलिवुल्लाह हे मौलिक ( ओरिजिनल ) विचारवंत होते. अल्–गजालींप्रमाणे त्यांनी आपल्या धर्मशास्त्राला गूढवादाची छटा दिली. स्वतंत्र अर्थबोधनाच्या तत्त्वाचे

त्यांनी आग्रही प्रतिपादन केले. आणि केवळ तकलीद (धर्मशास्त्रीय अंधानुकरण)– ला वा गुलामगिरीला विरोध केला. ते महान धार्मिक विचारवंत असूनही त्यांचा दृष्टिकोण आधुनिक होता आणि मुस्लिम समाजाचे शूद्धीकरण आणि फेररचना झालीच पाहिजे असे त्यांनी सतत आवाहन केले.

या थोर विद्वानाविषयी अनेक लेख प्रकाशित झाले असून त्यात फझल महमूद असिरी यांच्या निबंधाचा[२२] खास उल्लेख करता येईल. परंतु त्यांच्याविषयी एकही शास्त्रीय प्रबंधिका उपलब्ध नसावी ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा उहापोह बी. ए. फारूकी यांनी लिहिलेल्या, द मुजद्दिद'स कन्सेप्शन ऑफ तौहीद (लाहोर, १९५०)[२३] या कौतुकास्पद सुबोध प्रबंधिकेत करण्यात आला आहे.

जिचा उल्लेख अपरिहार्य आहे अशी दुसरी व्यक्ती म्हणजे सर सय्यद अहमद खान (१८१७ – १८९८)[२४]

सर सय्यदांच्या काळात भारतीय मुसलमान आधुनिक शिक्षणात मुळीच रस घेत नसत. इंग्रजी वा पाश्चात्य विज्ञान आणि तत्त्वज्ञान शिकणे त्यांना पाप वाटत असे. सर सय्यदांच्या अंगी कमालीची उपक्रमशीलता व चिकाटी असल्यामुळे त्यांना स्वतःला जरी युरोपीय शिक्षणाचा कधीच लाभ झालेला नव्हता तरी त्यांनी या मताचा यशस्वीपणे पुरस्कार केला की, युरोपात आणि विशेषतः इंग्लंडात तरुणांना शिकवण्याची विकसित व सर्वसामान्य झालेली प्रचलित तंत्रे अंगिकारल्यावाचून भारतीय मुसलमानांचा कधीच अभ्युदय होऊ शकणार नाही. त्यामुळेच त्यांनी अँग्लो–मुहम्मडन कॉलेज स्थापन केले होते. त्याचे रूपांतर पुढे अलीगढ मुस्लिम विद्यापीठात झाले. मुस्लिम युवकांना ऐहिक विषयांचे शिक्षण देणारे हे विद्यापीठ सध्या केंद्र सरकारने ताब्यात घेतले असून तिथे शास्त्रीय तसेच मानव्यविद्या शिकविल्या जातात. पण मुख्य भर अरबी, फार्सी आणि इस्लामी संस्कृती या विषयांवर दिला जातो.

अनेकदा असे म्हटले जाते की, सर सय्यद यांनी ब्रिटिश शोषकांना साह्य व सहकार्य केले होते. त्यांनी त्यांच्याशी सहकार्य निश्चितच केले, पण केवळ याच हेतूने की त्यांच्या मागास समाजाला इंग्रजी शिक्षणाचा पूर्ण लाभ मिळून त्यांचा अभ्युदय व्हावा. इंग्रजी भाषा ही त्यांच्या मते युरोपीय विचारधनाचे प्रवेशद्वार होती आणि त्यांचे मत बरोबरच होते; 'अलीगढ चळवळ' नावाने ओळखल्या जाणाऱ्या या चळवळीने एक पुरोगामी, आधुनिक मुस्लिम 'सभ्य गृहस्थ' निर्माण केला. त्याच्या ठिकाणी भूतकालीन इस्लामची शिष्टता होती आणि पाठीशी आधुनिक ज्ञानाचे सामर्थ्य होते.

भारतीय मुसलमानाच्या जीवनात धर्माला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आणि सर

सय्यदांनी याही पातळीवर त्याला जागे केले. तहजीबुल् अरब्लाक नावाचे उर्दू नियतकालिक काढून इस्लामी आणि आधुनिक दृष्टिकोणाचा समन्वय साधण्याची जोरदार तरफदारी करणारे लेखन त्यांनी केले. नंतर तफसीरुल कुर्‌आन नावाचे कुराणावरचे उर्दू भाष्य त्यांनी लिहायला घेतले, ते अपूर्ण राहिले. तरीपण आहे तेवढयावरूनही त्यांची चिकाटी, कामसूपणा व चिकित्सक कुशाग्रबुद्धी यांचा प्रत्यय येतो. त्यातून त्यांनी इस्लाम आणि त्याचा पवित्र धर्मग्रंथ यांना, १९ व्या शतकातील बुद्धिप्रामाण्यवादी वृत्तीच्या जागृतीतून प्राप्त झालेल्या नव्या प्रकाशात सादर केले आहे. प्रेषित महंमदावर आणि विविध धार्मिक विषयांवर त्यांनी निबंधही लिहिले आहेत. खऱ्या धर्मश्रद्धेचा अर्थ इस्लामच्या हदीस वाङ्मयाने परिमित करू नये आणि मुसलमानांनी प्रेरणेचा एक आणि एकमेव मूलस्त्रोत म्हणून हळहळू कुराणाकडे परत जावे, पण त्याचा अन्वयार्थ मात्र आधुनिक विज्ञानाच्या व संस्कृतीच्या संदर्भात लावावा, या मताचे आधुनिक भारतातील आद्य पुरस्कर्ते सर सय्यद होते.

सर सय्यद हे मूलतः राजकारणी, समाजकार्यकर्ते व सुधारणावादी होते. पण एक धार्मिक शस्त्रधारी वीर म्हणून प्रत्यक्ष क्षेत्रात प्रविष्ट झाल्याखेरीज आपण आपली उद्दिष्टे साध्य करू शकणार नाही हे त्यांना दिसत होते. ते त्यांनी विलक्षण यशस्वीपणे केले. आणि भारतातील इस्लामी विचाराच्या आधुनिक प्रवाहाचे तेच संस्थापक होत असे सार्थपणे म्हणता येईल.

आता आपण एका अगदीच निराळया प्रकारच्या व्यक्तीकडे – उबय्दुल्लाह सिंधी यांच्याकडे– वळू. ते शाह वलिउल्लाह यांचे आध्यामिक वारस होते. १८७२ साली ते जन्मले आणि १९४४ साली वारले. ते मूळचे शीख होते. घरातून पळून ते सिंध प्रांतात गेले. तिथे त्यांनी इस्लामी धर्म स्वीकारला आणि ईश्वरशास्त्रीय अध्ययनासाठी वयाच्या पंचविसाव्या वर्षी ते देवबंदला परत आले. पुढे परत सिंधला गेले आणि काही काळ त्यांनी तिथे अध्यापन केले. अफगाणिस्तान, रशिया, तुर्कस्थान ( साडेतीन वर्षे ) आणि हिजाझ ( बारा वर्षे ) या प्रदेशांत त्यांनी बरीच भ्रमंती केली.

शाह वलिउल्लांचे ते कट्टर अनुयायी होते. राजकीय नेते व इस्लामी विचारवंत होते. शीख कुलोत्पन्न असल्यामुळे वहदत् अल्–वुजूद ( अस्तित्वाची एकता )–चा सिद्धांत आणि वेदांताचे सर्वेश्वरवादाचे ( pantheismचे ) तत्त्व यांच्यातील साधर्म्यस्थळे स्पष्टपणे त्यांच्या लक्षात आली. भारतातील हिंदु आणि मुसलमान यांच्यात परस्परांबद्दल अधिक समजूतदारपणा यावा यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले, आणि हिंदुधर्मात जे जे उत्तम होते त्याबद्दल त्यांनी नितांत आदर बाळगला.

ज्या तत्त्वांचा त्यांनी पुरस्कार केला ती थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील :

१. भारतीय वंश अशी एखादी गोष्ट अस्तित्वात नाही.

२. अनेक लोकांचे व वंशाचे भारत हे घर आहे. त्या सर्वांनी इथे शांततापूर्वक एकत्र राहिले पाहिजे.

३. जेव्हा काही लोक एका सलग भूभागावर राहातात, एक भाषा बोलतात आणि एक संस्कृती निर्माण करतात तेव्हा त्यांना एक राष्ट्र म्हटले जाते.

४. भारत हा बहुवंशीय व बहुभाषिक देश असल्यामुळे इथे प्रत्येक वंशाला व जमातीला स्वतःची भाषा व संस्कृती विकसित करण्याचा समान हक्क आहे.

५. अशा विकसनानंतर या सर्व जमातींनी एकत्र येऊन एक राजकीय एकक निर्माण केले पाहिजे. हे एकक, म्हणजे भारताचे राज्य, बहुवांशिक असेल.

६. या एकत्रित राज्याची काही वैशिष्टये पुढीलप्रमाणे असतील :

अ) राजकीय : प्रौढ मताधिकाराधिष्ठित लोकशाही इथे असेल.

ब) आर्थिक : उद्योगधंद्यांना उत्तेजन दिले जावे. कामगारांचा आर्थिक दर्जा सुधारावा. सर्व कामगार जमातींचे हक्क समान असावेत. शेती व्यवसायाला सहर्ष दिले जावे.

क) सामाजिक : जुन्या सामाजिक रचना बदलून नव्या आकारास आणाव्यात.

ड) धार्मिक : सर्व धर्मांचे साध्य एकच आहे; भारतात आढळणाऱ्या धर्मांमध्ये एकहेतुकत्व आहे, याचे एक उदाहरण असे की वहदत् अल्-वुजूद चे इस्लामी तत्त्व वेदांताशी जुळणारे आहे. भारतातील सर्व धर्मांनी उद्दिष्टांच्या एकतेवर भर द्यावा आणि फुटीर प्रवृत्ती टाळाव्यात.

उबयदुल्लाह सिंधी हे २० व्या शतकातील भारताचे एक अग्रगण्य इस्लामी विचारवंत व राजकीय नेते होते. त्यांच्या जीवनाचे आणि कार्याचे समुचित वर्णन जामिया मिल्लीयाचे प्राध्यापक मुहम्मद सरवर यांनी केले आहे. [२५]

शाह वलिउल्लाह आणि उबय् दुल्लाह सिंधी हे त्यांच्या समकालीन उलेमांचे अग्रदूत होत. भारतातील आधुनिक धर्मशास्त्रीय विचारप्रवाहाला त्यांच्या कार्यातून प्रेरणा

मिळाली. तरीपण अभिजात परंपरा आपल्या पूर्ण सामर्थ्यानिशी अखंडितच राहिली आणि वर्चस्व गाजवीतच राहिली. या ( अभिजात ) विचारप्रवाहातील दोन उत्तुंग व्यक्तींचा आता आपण विचार करू.

अब्दुल हय्य लखनवींचा जन्म १२६४ / १८४८ मध्ये झाला. त्यांचे वडील अब्दुल हलीम उत्तर प्रदेशातल्या बांदा येथे १२६० / १८४४ मध्ये गेले होते. तिथे जौनपूरला त्यांनी अध्यापन केले. नंतर ते दक्षिण हैदराबादला गेले आणि तिथेच त्यांचे १२८४/ १८६७ मध्ये निधन झाले. अब्दुल हय्य यांनी वयाच्या दहाव्या वर्षी कुराण पाठ केले होते आणि सतराव्या वर्षापूर्वीच आपल्या अध्ययनाचा पारंपरिक असलेला भाग वडिलांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला होता. नंतर त्यांनी आपल्या शिक्षकी पेशाला प्रारंभ केला आणि हाच पवित्र व्यवसाय, १३०४ / १८८७ साली वयाच्या ४० व्या वर्षी त्यांचे अकाली निधन होईपर्यंत, ते करीत राहिले होते. अभिजात ग्रंथांच्या अर्थबोधनपर प्रस्तावना, टिपण्या व पुस्तिका उपलब्ध करवून देणे हे त्यांच्या लिखाणाचे मुख्य प्रयोजन होते. ते लिखाणाबाबत बहुप्रसव होते. शंभरहून अधिक ग्रंथ त्यांच्या लेखणीतून उतरले. नियंत्याने त्यांना दिलेले अल्पावधीचे आयुष्य पाहाता, त्यात त्यांनी मिळवलेले यश त्यांना पारंपरिक पद्धतीचे महान विद्वान म्हणवून घेण्यास पात्र ठरवते.

अब्दुल हय्य लखनवी यांची अरबी, फार्सी व उर्दू या तिन्ही भाषांशी सारखीच जवळीक होती. त्यांच्या महत्त्वाच्या ग्रंथांत तीन खंडात्मक फतावा ( १० वी आवृत्ती, लखनौ, १९३५ )– चा खास उल्लेख करावा लागेल. हे खंड बव्हंशी उर्दूत लिहिलेले असले तरी काही मते फार्सीत मांडलेली आहेत. केवळ वैधानिक व धर्मशास्त्रीय दृष्टीने नव्हे तर १९ व्या शतकाच्या उतरार्धात मुस्लिम समाजाच्या मनाला अस्वस्थ करणाऱ्या अनेक सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय प्रश्नांचे पूर्ण ज्ञान होण्याच्या दृष्टीनेही फतावा अब्दुल हय्य महत्त्वाचे आहेत. या थोर धर्मशास्त्रज्ञाच्या मनाचे व स्वभावाचे चिकित्सक अध्ययन एखाद्या शास्त्रीय पद्धतीचे प्रशिक्षण घेतलेल्या आधुनिक विद्वानाच्या हातून होण्याची अत्यंत गरज आहे.

पारंपरिक विचारसंप्रदायातील दुसरी महत्त्वाची व्यक्ती म्हणजे मौलाना अरफ अली थानवी, जन्म १२८० / १८६३. १० व्या शतकाचा उत्तरार्ध व २० व्या शतकाचा पूर्वार्ध हा त्यांच्या जीवनाचा आणि कार्याचा कालखंड होता

त्यांच्या काळातील उलेमा सामान्यपणे जसे करीत तसे अशरफ अलींनी दिल्लीत कुराणपठणाने व मेरठला फार्सीच्या अध्ययनाने आपल्या शिक्षणाचा प्रारंभ केला. देवबंदमधील अभ्यासक्रम संपवून १३०० / १८८२ साली ते स्नातक झाले. ते उत्तम

शिक्षक आणि वक्तृत्वशाली धर्मोपदेशक होते, माणसांच्या काळजाला हात घालण्याचे कौशल्य त्यांना अवगत होते. कानपूरला १४ वर्षे त्यांनी पारंपरिक शास्त्राचे अध्यापन केले. १३०१ / १८८३ मध्ये ते मक्का येथील हाजी शाह इम्दादुल्लाह यांच्या आध्यात्मिक प्रभावाखाली आले आणि त्यांनी त्यांचे बयत स्वीकारले.

अश्रफ अलींचा कल नेहमी धर्माच्या गूढ मार्गाकडे व आध्यात्मिक बाजूंकडेच झुकलेला असायचा. त्यांची विद्वत्ता, धर्मनिष्ठा आणि अध्यात्मबळ सतत वाढत होते. शेवटी कानपूर सोडून ते आपल्या थानभवन या मूळगावी शिकवण्यासाठी गेले. लोकोत्तर विद्वत्ता व आध्यात्मिक सूक्ष्मदृष्टी यांच्या जोडीलाच ओघवत्या शैलीचे वरदान त्यांना होते. ९०० हून अधिक पुस्तिका व ग्रंथ त्यांनी लिहिले. [२६] **बयानुल कुर्आन** हे त्यांचे भाष्य सनातनी हनफी धर्तीचे, पण समावेशक आहे; आणि कुराणावरच्या उर्दू भाषेतील सर्व भाष्यांमध्ये ते सर्वोत्तम समजले जाते. ते काहीसे अवघड आणि दुर्बोध आहे, आणि नवशिक्यांसाठी त्याची शिफारस केली जात नाही, पण ज्यांना पारंपरिक साधनांवर आधारलेली परिपूर्ण माहिती हवी असते त्यांच्यासाठी मात्र ही विद्वत्तेची व पूर्ण ज्ञानाची एक मोल्यवान खाणच आहे.

त्यांचा ( **फतावा अश्रफिया** म्हणून लोकांना ठाऊक असलेला ) **फतावा** हा ग्रंथ त्यांच्या विद्वत्तेची खोली आणि वाचनाची व्याप्ती यांची साक्ष देतो. अश्रफ अली परिपक्व वयाच्या ८० व्या वर्षी – १९४३ साली – वारले. संपूर्ण देशभर त्यांच्याविषयी आदरभाव होता. ते जरी सनातनी असले आणि काही अंशी प्रतिगामी असले, तरी विद्वत्ता आणि धर्मनिष्ठा यासाठी ते विख्यात होते. २० व्या शतकाच्या पूर्वार्धातील आघाडीच्या धर्मशास्त्रवेत्त्यांपैकी ते एक निश्चितच होते. मात्र त्यांचा दृष्टिकोण संकुचित, प्रबोधनविरोधी व अशास्त्रीय होता आणि ते कोणत्याही अर्थाने मौलिक विचारवंत वा सुधारक नव्हते.

## ॥ ६ ॥

भारतातील धार्मिक विचार आणि धर्मशास्त्रीय परंपरा ह्यांबद्दलच्या सद्यस्थितीची चर्चा आता आपण करू. मुसलमानांमध्ये आज अस्तित्वात असलेल्या वैचारिक पंथांचे वर्गीकरण करणे कोणत्याच प्रकारे सोपे नाही. विशेषतः त्यांच्यातले दोन गट तरी असे आहेत की जे वर्गीकरणाच्या काटेकोर चौकटीत मुळीच बसू शकत नाहीत. त्यांना वर्गीकरणाच्या चौकटीत बसवणे अशक्य आहे याची प्रस्तुत लेखकास पूर्ण जाणीव आहे.

त्यापैकी पहिला गट सुधारणावादी विचारवंतांचा आहे. ते कोणत्याही विशिष्ट पंथाचे गणले जात नाहीत. कुठे तरी काहीतरी चुकते आहे ही जाणीव त्यांना असली तरी आपले आक्षेप नेमकेपणाने ते मांडू शकत नाहीत. किंवा आपली श्रद्धा ठामपणे जाहीर करू शकत नाहीत. दुसऱ्या गटात, ज्यांची भूमिका समावेशक ( ambient ) आहे आणि जे दोन वा अधिक गटांची लक्षणें धारण करतात अशा विचारवंतांचा अंतर्भाव होतो.

उदाहरणार्थ, प्रस्तुत लेखकालाच जर असे विचारले की तू कोणत्या गटाचा आहेस, तर त्याला आपली स्वतःची भूमिकाही ठामपणे मांडता येणार नाही. एवढे मात्र तो आवर्जून सांगेल की त्याने पुढे नोंदवलेली निरीक्षणे ही एका सत्यशोधकाने केलेल्या चाचपडीच्या स्वरूपाची आहेत. इस्लामच्या थोर आध्यात्मिक वारशाची त्याला पूर्ण कल्पना आहे, तरीपण या मूल-श्रद्धेला आज आलेले स्वरूप आणि तिच्या सनातनी पुरस्कर्त्यांची विचारपद्धती, वृत्ती व प्रवृत्ती पाहून तो अत्यंत अस्वस्थ झाला आहे. ( इस्लामी ) श्रद्धेचे अधिक नेमके स्वरूप ठरवणे शक्य होण्यापूर्वी, प्रस्तुतच्या प्रयत्नासारखे व्यक्तिगत पातळीवरील प्रयत्न आणखी झाले पाहिजेत असे त्याला वाटते.

वरील मर्यादा ध्यानात ठेवून भारतातील इस्लामी विचाराची सद्यस्थिती संक्षेपाने पुढीलप्रमाणे सांगता येईल : (१) सनातनी संप्रदाय ( सुन्नी व शिया ); (२) मुख्यत्वे इकबालच्या प्रभावाखाली असलेल्यांचा गट; आणि (३) आधुनिक विचार संप्रदाय म्हणजे सर सय्यद अहमद खान, शिब्ली, आजाद आणि अजमलखान यांच्या व्यापक परंपरेत जे मुसलमान आहेत त्यांचा गट. यांच्या जोडीला आणखी एक मोठा गट जोडावा लागेल. धर्माच्या काही बाजूंबद्दल ज्यांना असमाधान असते, तरीपण धार्मिक तत्त्वांचा विचार करण्याची ज्यांना पर्वा आणि उसंतही नसते अशा सुशिक्षितांचा हा गट आहे. अहमदी व कादियानी यांचा उल्लेख मी मुद्दामच टाळलेला आहे. तो एक स्वतंत्र संप्रदाय असून त्यांचा स्वतःचा, वेगळया तत्त्वांवर अधिष्ठित असलेला निश्चित असा मजहब आहे.

सनातनी संप्रदायाबद्दल इथे फार विस्तार करण्याची गरज नाही. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे अरबी अध्ययनाची व ईश्वरशास्त्रीय शिक्षणाची अभिजात परंपरा भारतात अखंड चालत आलेली आहे. हनफी संप्रदायाचे मदरसे देवबंद येथे, तसेच फिरंगी महल (लखनौ) नदवतुल उलमा (लखनौ), सहारनपूर, जौनाजपूर आणि अन्यत्रही भरभराटत आहेत. इसना अशरी शियांच्या मदरसतुल वाइझीन – ( लखनौ ) – सारख्या शाळा असून त्याठिकाणी भारतातील प्राथमिक प्रशिक्षण संपवून ते ( शिया विद्यार्थी ) पुढील शिक्षणासाठी इराकला जातात आणि परिपूर्ण मुज्तहिद होऊन मायदेशी परत येतात. शाफिई, मालिकी किंवा हनबली यांचे मदरसे येथे नाहीत. दाऊदी व सुलैमानी बोहरांचे लहान लहान गट आपल्या स्वत.च्या ईश्वरशास्त्राचा ( त्यास हकाइक असे म्हणतात )

अभ्यास सुरत ( मदरसा सैफिय्या ), बडोदा, हैद्राबाद आणि मुंबई या शहरांत करतात. तरीपण तथाकथित 'शिक्षित' वर्गाच्या अधार्मिकतेने तिच्यावर केलेल्या हल्ल्यामुळे, लोकांच्या आर्थिक परिस्थितीच्या निकडीमुळे आणि साम्यवादी व स्वतंत्र विचारवंत अशांसारख्या भौतिकवादी गटांमुळे या विद्वत्परंपरेची शक्ती झपाट्याने क्षीण होत आहे.

यानंतर सर मुहम्मद इक्बाल यांच्या आध्यात्मिक वारसदारांकडे आपण वळू. सामान्यतः इक्बाल हे एक कवी म्हणून ओळखले जातात. त्यांनी जर्मनी आणि इंग्लंडमध्ये शिक्षण मिळवले होते. आणि हेगेल, फिएटे व नीत्शे या १९ व्या शतकातील जर्मन विचारवंतांचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला होता. फार्सी व उर्दू भाषेत त्यांनी काव्यरचना केली. जर्मन आदर्शवादी आणि इस्लामी गूढवादी यांच्या शिकवणुकीवर आधारलेल्या कर्तृत्वाच्या ( कृतीच्या ) तत्त्वज्ञानाची त्यांनी तरफदारी केली. मुख्यतः ते कवी होते, पद्धतशीर विचारवंत वा प्रशिक्षित ईश्वरशास्त्रवेत्ते नव्हते; आणि त्यांच्या 'पद्धती'त असे अनेक अंतर्विरोध आहेत की ज्यांचा मेळ घालणे अशक्य, आणि खरे तर अनावश्यक आहे.

आपल्या दृष्टीने त्यांचा महत्त्वाचा विचार पुढीलप्रमाणे मांडता येईल : एक, त्यांनी कर्तृत्वाचे (कृतीचे) तत्त्वज्ञान शिकवले, सूफींचा पारंपरिक कृतिराहित्याचा (quietism) दृष्टिकोण त्यांना पसंत नव्हता. दुसरा, ते आदर्शवादी व एकेश्वरवादी होते; **वहदत् अल्–वुजूदवर** त्यांचा विश्वास होता की नाही सांगता येणे अवघड आहे, आणि तरीही त्यांच्या लिखाणातून व कवितांमधून सर्वेश्वरवादी विचार आढळून येतात. तिसरा, अर्थबोधनाचे द्वार बंद केलेले नाही अशी त्यांची धारणा असून इज्माची जागा आधुनिक विधिनिर्माण-प्रक्रियेने घ्यावी अशी सूचना ते करतात.[२७] शेवटी, त्यांचा **मर्द - इ - मूमिन** हा मुसलमान असण्यापेक्षा आधुनिक माणूस आहे, खऱ्या मुसलमानांचे सद्‌गुण त्याच्या अंगी आहेत, जर्मन तत्त्ववेत्त्यांचा 'सुपरमॅन' आणि सूफींचा आरिफ आहे.

इक्बाल हे जरी प्रशिक्षित मुल्ला नसले तरी भारतात आणि पाकिस्तानात त्यांना प्रचंड मोठा अनुयायीवर्ग लाभला आहे. या वर्गाचा दृष्टिकोण तत्त्वज्ञानात्मक वा ईश्वर-शास्त्रीय असण्यापेक्षा भावनिक आणि भावविवश अशा स्वरूपाचा आहे. कवी म्हणून इक्बालना मोठा वाचकवर्ग मिळाला आहे, आणि पूर्वेकडील सर्व मुसलमान वर्गामध्ये आत्मशोधन करण्याची प्रेरणा त्यांच्यापासून मिळाली आहे. इस्लामी जगतातील गेल्या शतकातला हा कदाचित सर्वश्रेष्ठ कवी ठरावा. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, या कविश्रेष्ठाचे जीवन काव्य अणि तत्त्वज्ञान यासंबंधी एकही चिकित्सक प्रबंधिका आजतागायत लिहिली गेलेली नाही.[२८] इक्बालवर समाधानकारक प्रबंधिका लिहिणे तसे सोपेही नाही. कारण त्यासाठी समीक्षकाला प्रथम अरबी, फार्सी व उर्दू भाषांवर प्रभुत्व मिळवावे

लागेल आणि इक्बाल ज्या काळात जगले तो काळ समजून घ्यावा लागेल: मग त्याला मॅक टगार्टच्या काळातील केंब्रिजला जावे लागेल, त्यानंतर हेगेल आणि त्याच्याही पुढे जाऊन त्याला नीत्शेच्या विचारांचा मूळ स्वरूपात दृढ परिचय करून घ्यावा लागेल. जीली आणि त्याचबरोबर इस्लामचे अरबी–फार्सी गूढवादी व इन्सान-इ कामिल ( परिपूर्ण माणसा– ) ची संकल्पना निर्माण करणारे भारतीय सूफी यांच्या चिंतनासंबंधी सखोल विचार करावा लागेल, आणि अखेरीस त्याच्या अंगी चिकित्सक दृष्टी व कवितेची गोडी असावी लागेल. असा काव्याबद्दल संवेदनशील आणि तत्त्वचिंतक मनोरचना असलेला इक्बालचा भाष्यकार अजून जन्माला यायचा आहे.

मौलाना अबुल कलाम आजाद हे भारतीय मुसलमानांच्या अविवाद्य नेत्यांपैकी एक होते. २० व्या शतकाच्या आरंभीच्या काळात एक दमदार पत्रकार म्हणून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात कलकत्त्यास केली. पुढे त्यांनी खिलाफतच्या चळवळीत भाग घेतला व ते तिचे एक प्रेरणास्थान बनले. जेव्हा १९२१ साली गांधींचा ( भारतीय राजकारणात ) प्रवेश झाला तेव्हा आजाद त्यांना जाऊन मिळाले, आणि एकंदरीत भारतीय उलैमा भारताच्या स्वातंत्र्यासाठी हिंदूंच्या खांद्याला खांदा भिडवून कसे लढले ते दाखवून दिले. पुढे काही काळ त्यांचा वैविध्यपूर्ण ( colourful ) जीवनप्रवाह अनेक कारावासांमुळे अडत–अडखळत राहिला. नंतर १९४७ साली स्वातंत्र्य-प्राप्ती झाली. ते पहिल्या भारतीय मंत्रिमंडळाचे सदस्य झाले. केंद्रीय शिक्षणमंत्री म्हणून त्यांची नेमणूक झाली. नेहमीचे काम सर्व सन्मानांनिशी सांभाळीत असतानाच १९५८ साली त्यांचे निधन झाले.

आजाद हे अत्यंत प्रभावी वक्ते, उर्दू गद्याचे शैलीकार, प्रबुद्ध धर्मज्ञ, इस्लामी विचारवंत व राजकीय नेते होते. त्यांच्या अनेक देशबांधवांना असे वाटते की, आजादांच्या राजकीय व्यवधानांमुळे उर्दू साहित्याची अपरिमित हानी झाली आहे. प्रस्तुत लेखकास हे मत मान्य नाही. प्रत्येक मानवी व्यक्तिमत्त्व संमिश्र असते, आणि कित्येकदा तर ते अंतर्विरोधाचे गाठोडेच असते. बीजगणितांतल्या सारख्या सरळ सूत्राने आजादांच्या चरित्रातील रहस्याच्या उलगडा होणार नाही. व्युत्पन्न प्रतिभेचा चरित्रलेखकच या संपन्न, इतक्या व्यामिश्र, इतक्या सुसंस्कृत आणि इतक्या अत्युत्तम व्यक्तिमत्त्वाच्या ओझरत्या किरणशलाका दाखवू शकेल.

इस्लामी विचारवंत या नात्याने आजादांच्या मुख्य ग्रंथांचा इथे उल्लेख करणे योग्य होईल. द्विखंडात्मक **तर्जुमानुल कुरआन** हा त्यांच्या लेखनातील बहुधा ग्रंथराज ठरावा.[२९] त्याचा तिसरा खंडही ते लिहिणार होते. पण त्यांच्या सक्रिय राजकीय जीवनामुळे त्यांना हे कार्य पूर्ण करता आले नाही. या ग्रंथात समांतर रकान्यांमध्ये कुराणाचे

भाषांतर दिलेले असून कुराण संहितेवर टिप्पणांसह भाष्यही दिलेले आहे. शैलीच्या लावण्याबरोबरच मतसंग्राहक वृत्ती (eclectic spirit) आणि आधुनिक शास्त्रीय दृष्टिकोण यासाठीही हे भाष्य उर्दू वाङ्मयात अद्वितीय ठरावे. प्रचंड प्रमाणावर वाचल्या जाणाऱ्या उर्दू धार्मिक ग्रंथांत **तर्जुमान्**चा समावेश होतो. आणि सनातनी **उलेमा** जरी या ना त्या कारणास्तव त्याच्याबद्दल नापसंती दर्शवीत असले तरी संपूर्ण मुस्लिम समाजावर त्याचा फार सखोल व व्यापक प्रभाव पडला आहे.

आजादांच्या इतर ग्रंथांपैकीही काहींचा निर्देश करता येईल. कलकत्याहून प्रसिध्द होणारे उर्दू साप्ताहिक **अल् हिलाल** ह्याचे संपादक म्हणून ते प्रथम प्रसिध्दीस आले. हे साप्ताहिक पांडित्य, इस्लामविषयक आस्था व तीव्र राष्ट्रभक्तीची भावना मनात बाळगून राजकीय व धार्मिक प्रश्नांची चर्चा करीत असे. आजादांचा **तजकिरा** हा समर्थपर ग्रंथ (apologia) उत्कृष्ट पण दुर्बोध शैलीत लिहिलेला आहे. **मसाल-इ खिलाफत** (कलकत्ता, १९२०) या त्यांच्या छोटेखानी पुस्तिकेतील विद्वत्तेने व अरबी धर्तीच्या शैलीने अनेकांचे लक्ष वेधून घेतले होते. आणि शेवटी, त्यांनी कारागृहातून लिहिलेली पत्रे **गुबार-इ खातिर**[३०] या तुलनेने छोटया असलेल्या पुस्तकाला जेवढा प्रतिसाद मिळाला तेवढा उर्दू साहित्यातील कोणत्याही समकालीन गद्यलेखनाला क्वचितच मिळाला असावा. त्याचे अनुपम सौंदर्य, त्याची काव्यात्मक गुणवत्ता, त्यातील प्रकांड पांडित्य व नजाकत यामुळे या पुस्तकाला अभिजात ग्रंथाचा दर्जा प्राप्त झाला आहे.

ईश्वरशास्त्राच्या क्षेत्रातील नवतावादी चळवळीचे एक नेते या भूमिकेतून आजादांनी केलेल्या कार्याची आता संक्षेपाने नोंद करता येईल. ते एक मतसंग्राहक ( eclectic ) होते, धर्म व राजकारण या दोन्ही क्षेत्रात ते सक्रिय होते, इस्लाम हा मानवतेचा धर्म म्हणून आधुनिक माणसाने स्वीकारावा यासाठी शिया व सुन्नी ईश्वरशास्त्र, आधुनिक विज्ञान, समकालीन विचार आणि तत्त्वज्ञान ही सर्व साधने त्यांनी उपयोगात आणली. त्यामुळे देशातल्या एका वेगळयाच धार्मिक मनःस्थितीचे ते प्रतिनिधी ठरले. परंतु पारंपरिक **उलेमा**, आजादांची विद्वत्ता व सचोटी मान्य करूनही त्यांची ईश्वरशास्त्रविषयक भूमिका व एकूण सर्वच बाबतीतला त्यांचा दृष्टिकोण स्वीकारायला तयार नव्हते, हे अपेक्षित होते.

आज ज्यांच्याविषयी फारसे कुणाला माहीत नाही पण पारंपरिक पध्दतींचे जे स्वतंत्र बुध्दीचे टीकाकार होते ते प्राध्यापक मुहम्मद अजमल खान हे एक आजादांचे समकालीन लेखक होते. मुळात प्राध्यापक असलेले हे गृहस्थ आजादांच्या मृत्यूपर्यंत त्यांचे खाजगी सचिव म्हणून काम पाहत होते. १८९७ साली अलाहाबादजवळच्या एका छोटया गावात त्यांचा जन्म झाला होता. अलीगढ येथे कायदा व तत्त्वज्ञान या विषयांचा

अभ्यास केल्यानंतर ते अलाहाबाद विद्यापीठात आले. तिथे ते १९२७ ते १९२९ या काळात अरबी–फार्सीचे अधिव्याख्याता होते. १९४० साली त्यांनी गांधींच्या असहकारितेच्या चळवळीत भाग घेतला. नेहरू आणि अन्य कॉंग्रेसनेत्यांच्या बरोबर ते काम करीत होते. अजमल खानांना आजादांशी जोडणारा हा दुसरा दुवा होता.

त्यांचे चार प्रमुख ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत : (१) **द क्रॉनालॉजिकल ऑर्डर ऑफ द कुरान** (अलाहाबाद, १९४२); (२) **पस-मंझर-इ कुरान** ( इस्लामची पार्श्वभूमी भाग, ४ दिल्ली, १९४९ ) (३) **मुख्तसर सीरत-इकुरआ नियुया** (दिल्ली, १९५१) आणि **लाइफ ऑफ मुहम्मद** ( उर्दू, दिल्ली, १९५६ )

पहिला ग्रंथ नोएलडेक ( Noeldeke ) व अन्य युरोपीय प्राच्यविद्याविशारदांच्या संशोधनांचा मागोवा घेणारा आहे. कुराणाचा अभ्यास त्यातील आयतींच्या प्रकटीकरणाच्या कालक्रमाच्या आधारे करण्याचे महत्त्व त्यात प्रस्थापित केले आहे. कुराणातील प्रत्येक आज्ञेचा काळ आणि प्रसंग यांचे योग्य ते भान ठेवल्यावाचून एकंदरीत इस्लामचे बुद्धिनिष्ठ आकलन होणेच शक्य नाही; असे ह्या ग्रंथाचे प्रतिपादन आहे. दुसरा ग्रंथ व्यापक दृष्टी आणि आधुनिक, शास्त्रीय दृष्टिकोण यामुळे प्रकाशमान झालेला आहे. ह्या ग्रंथात त्यांनी इस्लामची पार्श्वभूमी वर्णन केली आहे, आणि (अ) इस्लामपूर्व जगाचा संक्षिप्त इतिहास; (ब) इस्लामपूर्व अरबांचा संक्षिप्त इतिहास; (क) प्रेषिताच्या जीवनाचा प्रस्ताव आणि (ड) प्रेषिताच्या जीवनाचा रूपरेखावजा सारांश– या विषयांची चर्चा केली आहे. तिसरे पुस्तक हे प्रेषिताच्या एका बृहत्तर ( सुमारे २००० पानी ) चरित्राचे संक्षिप्त संस्करण आहे. भारतातील धार्मिक विचारांच्या क्षेत्रात होत असलेल्या प्रचलित घडामोडींशी सुसंवादी असलेले अभिनव विचाराचे, असे हे पुस्तक आहे. आधुनिक दृष्टिकोण, शास्त्रीय काटेकोरपणा व इस्लामविषयक पूज्यभावाचा २० व्या शतकातील प्राच्यविद्याविशारदांच्या चिकित्सक वृत्तीशी घातलेला समन्वय ही या विचारवंताची वैशिष्ट्ये होत. सनातनी उलेमांना जरी ते आवडत नसले तरी ज्याची दखल घ्यावीच लागेल असे सामर्थ्यशाली त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे.

॥ ७ ॥

आपल्या या संक्षिप्त ऐतिहासिक विश्लेषणाच्या समाप्तीपाशी आपण आता आलो आहोत. हा आढावा धावता आणि अपुरा असला तरी पुढे जी काही गृहीतके मांडली जाणार आहेत त्यांच्यामागील तत्त्वांच्या यथार्थ आकलनासाठी तो घेणे आवश्यक होते.

भारतामध्ये एक दीर्घ व सन्मान्य अशी ( इस्लामी ) ईश्वरशास्त्राची परंपरा आहे. गेल्या सहा शतकांपासून हनफी संप्रदायाचे इस्लामी ईश्वरशास्त्र या देशात मोठ्या प्रमाणावर जोपासले जात आहे आणि भारतीय विद्वानांचे ह्या क्षेत्रातले कार्य, विशेषतः हदीस वाङ्मयाच्या संदर्भात, जगातील कोणत्याही इस्लामी देशांतील विद्वानांच्या कार्याच्या तोडीचे ठरू शकेल. कायद्याच्या क्षेत्रात भारतात सर्वांत प्रभावी असलेला हनफी संप्रदाय हा मुस्लिम राजवटीच्या सुरुवातीच्या काळात सुरू झालेला असून ब्रिटिश काळातही टिकून राहिला. इथल्या गणराज्यात्म राजवटीनेसुद्धा हनफी कायद्याला व्यक्तिगत दर्जाच्या संदर्भात अमलात ठेवलेले आहे, परंतु विधिकरणाने त्याच्या क्षेत्रात अनेक प्रकारे आक्रमण केले असून येत्या काही वर्षांत तो त्याचा चेहरामोहरा बराच बदलून टाकण्याची शक्यता दिसते. 'कायद्याच्या दृष्टीने समानता' आणि 'सर्वांसाठी एकच कायदा' हे आधुनिक सिद्धांत कालान्ती व अनुभवान्ती निःसंशय आपला प्रभाव पाडल्यावाचून राहणार नाहीत. काटेकोर कायद्याच्याच दृष्टीने पाहिल्यास मात्र आपण तीन वैशिष्ट्ये नोंदवू शकू : असंवेद्य तरीही महत्त्वाचा असा रूढीचा प्रभाव; इंग्रजी सामान्य कायदा व समन्यायतत्त्व यांचा प्रभाव; आणि विधिविषयक वडामोडींचा सतत वाढत जाणारा दबाव– अलीकडच्या 'विशेष विवाह कायद्या' ( Special Marriage Act, 1954 )–नुसार व्यक्तीला मुसलमान राहूनही मृत्युपत्राद्वारे आणि मृत्युपत्रावाचूनही वारसाहक्कासंबंधी, मुस्लिम कायद्यात घालून दिलेल्या तत्त्वांशी एकंदरीत विसंवादी असलेल्या, आधुनिक पद्धतींचा अवलंब करणे शक्य झाले आहे. त्यावरून कोणत्याही निरीक्षकाला हे स्पष्ट दिसेल की भारतातील इस्लामी कायद्याच्या क्षेत्रात, कानूनने शरीआवर अतिक्रमण केले आहे आणि ते तो करीत राहणार आहे.

भावी काळाबद्दल दोन शब्द इथे लिहिले तर ते अप्रस्तुत ठरणार नाहीत. प्रस्तुत लेखकाची अशी खात्री आहे की, समुदायाचे सामाजिक जीवन नियंत्रित करणाऱ्या प्राचीन तत्त्वांवर आधारित असलेले सर्व वैयक्तिक व व्यक्तिगत कायदे हळूहळू नष्ट होतील किंवा धार्मिक भेद विचारात न घेता सर्व व्यक्तींना लागू असणाऱ्या कायद्यांच्या एकूण रचनेशी सुसंवादी व्हावे अशाप्रकारे ते बदलले जातील. औद्योगिक कायदे, शासकीय प्रक्रियेच्या विविध शाखा – अशा अनेक बाबतीत ही चळवळ आजच जोरदार झालेली असून नागरी विवाहाशी व घटस्फोटाशी संबंधित अशा व्यक्तिगत कायद्यांच्या बाबतीतही ती जाणवते आहे. अशा हळूहळू होणाऱ्या दुरुस्त्यांमुळे, अगदी त्या शरीआच्या नियमात जरी झाल्या तरी त्यामुळे, इस्लामच्या मूलभूत सत्याला धक्का लागण्याचे काहीच कारण नाही. अधिक चोख आणि सखोल तपासणी केल्यास असे दिसून येईल की, शरीआचे काही भाग हे इस्लामच्या मध्यवर्ती गाभ्याभोवतालच्या केवळ बाह्य कवचासारखे आहेत. प्रत्येक युगात आणि सभ्यतेच्या वाटचालीतील प्रत्येक टप्प्यावर त्यांचे जर

पुररर्थबोधन व पुनःप्रतिपादन झाले तरच हा गाभा टिकून राहू शकेल. इस्लामच्या तत्त्वांपैकी कोणती अचल वा स्थिर आहेत व कोणती चल वा परिवर्तनीय आहेत हे नव्याने ठरवण्याची जबाबदारी आज आपल्यावर आहे. वर्तमान शतकातील मनांचे व दृष्टिकोणाचे समाधान उलेमांचे पारंपरिक ईश्वरशास्त्र करू शकत नाही. इस्लामच्या मूलतत्त्वांची फेरतपासणी, पुनरर्थबोधन, पुनःसूत्रीकरण व फेरमांडणी आपल्या काळात नितांत आवश्यक झाली आहे.

निकटपूर्व, मध्यपूर्व वा सुदूरपूर्व यापैकी इस्लामी जगताच्या कोणत्याही भागाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास लोकांच्या सामाजिक जीवनात काही ठळक समान वैशिष्ट्ये दिसून येतात. राजकीय दौर्बल्य, आर्थिक अस्थैर्य व आध्यात्मिक दिवाळखोरी सर्वत्र आपल्या नजरेत भरते. या सगळ्यांचे मूलकारण आध्यात्मिक दिवाळखोरी आहे असे म्हणावे लागेल. इस्लामी समाजाचा गाभा पोखरून खाणारा तो कर्कच आहे. ज्यांच्या इस्लामविषयीच्या सद्भावनेबद्दल आणि इस्लामच्या आध्यात्मिक महात्मतेच्या कौतुकाबद्दल शंका घेतली जाऊ शकणार नाही अशा मुस्लिम आणि पाश्चात्य अधिकारी विद्वज्जनांनी हे आग्रहपूर्वक सांगितले आहे. म्हणूनच 'तर मग काय करावे ?' हा प्रश्न विचारात घेण्याची हीच योग्य वेळ ठरते.

या प्रश्नाचे उत्तर सुलभ नाही, आणि प्रस्तुत लेखकाजवळ कोणतेच आवडते सिद्धांत नाहीत, किंवा अंमलात आणावयाच्या पद्धती व त्यांची अंतिम फलिते याबद्दलची त्याला ठाम खात्रीही नाही. परंतु जगभरच्या मुस्लिम विचारवंतांच्या उत्कट इच्छेला साकार करण्याच्या दिशेने प्रारंभ हा केलाच पाहिजे, आणि त्या दृष्टीने पुढच्या प्रकरणात शरीआच्या आधुनिक पुनरर्थबोधनाची एक संक्षिप्त, माफक व प्रयोगात्मक तात्पुरती योजना सुचवलेली आहे. आतापर्यंत केलेल्या ऐतिहासिक विश्लेषणावरून हे दिसून आले असेल की, मी सुचवीत असलेला दृष्टिकोण पूर्णपणे अभिनव नाही किंवा आकस्मिक स्फोटासारखाही नाही तर या उद्दिष्टाप्रत जाणाऱ्या भारतीय आणि इतर अनेक विचारप्रवाहांच्या संगमावर तो आधारलेला आहे. *

* पाहा, मिडलईस्ट जर्नल, १९५४, खंड ८, १६३–८३.

## संदर्भ टीपा

१. अभिजात चर्चेसाठी पाहा, तफ्ताझानी, **तल्बीह ( कैरो आवृत्ती ) खंड १ :** सुन्नींच्या फिकहशी हे पुस्तक संबंधित आहे. याचे शियापंथीय प्रतिरूप हसन बिन झयनुद्दीन बिन अली बिन अहमद अल् आमिली—लिखित **मआलिमुद्दीन फिल् उसूल** ( तेहरान, हिजरी शके १३१२ ) या ग्रंथात आढळते. आधुनिक चर्चा अनेक आहेत. त्यांचा सारांश माझ्या **आउटलाइन्स ऑफ मुहामडन लॉ** ( दुसरी आवृत्ती, पुनर्मुद्रित १९६०, ऑक्स्फर्ड युनि. प्रेस ) प्रास्ताविक १३– तद्नंतरची संबंधित पृष्ठे. ( यापुढे याचा संदर्भ ओ. एम्. एल्. असा दिला जाईल. )

२. डब्ल्यू. एच्. मोर्ले, **अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ जस्टीस इन् ब्रिटिश इंडिया,** ( लंडन, १९५८ ), १९३.

३. किस्ता, १९७.

४. ओ. एम्. एल्., ३७, मोर्ले याचे अवतरण, पूर्वोक्त, १७८. जेंटू हा 'जेंटाइल' ( gentile म्हणजे यहूदीतर ) या शब्दापासून बनलेला अँग्लोइंडियन शब्द आहे ( शॉर्टर ऑक्स्फर्ड डिक्शनरी ); हिंदु समाजाचा मुसलमानांपासून वेगळेपणा स्पष्ट करण्यासाठी तो वापरला जात असे. 'Gentoo', 'Moohummudan', 'Moselman' आणि 'दिल्ली' वा 'देहली' चे 'Delhi' हे रूपांतर चुकीची स्पेलिंगे करण्याच्या इंग्रजी प्रतिभेने आपल्याला देणगीरूपाने दिलेली ही शब्दरत्ने होत.

५. ओ. एम्. एल्, २७९.

६. ओ. एन्. एल्., ४३, या ठिकाणी या नियमाचे परिपूर्ण स्पष्टीकरण आढळेल.

७. प्रस्तुत शोधनिबंध १९५२ साली लिहिला गेला होता. १९६२ साली तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात या गोष्टीवर अधिकच भर दिला असल्याचे दिसून येईल.

८. शिब्ली नूमानी, **खुतबात** (आझमगढ, १९४१), १६-तद्नंतरची संबंधित पृष्ठे.

९. अबूल हसनात नदवी, **हिंदुस्तानकी कदीम इस्लामी दर्स-गाहें**, ( आझमगढ, १९३६ ).

१०. मनाझिर अहसन जीलानी, **हिंदुस्तानमें मुसलमानोंका निजाम-इ तालीम व तर्बियत** ( दिल्ली, १९४४ ).

११. सय्यद महबूब रिजवीकृत **तारीख-इ देवबंद** ( दिल्ली, १९५३ ) या ग्रंथात याचा इतिहास अलीकडे लिहिला गेला आहे.

१२. पहिले सहा खंडच शिब्लीने लिहिले होते. उरलेले त्याचा शिष्य सुलेमान नदवी याने शिब्लीच्या मृत्यूनंतर पूर्ण केले. **सीरा** चे प्रकाशन दारुल मुसन्निफीन ( आझमगढ, उत्तर प्रदेश ) तर्फे झाले आणि त्यानंतर त्याचे वारंवार पुनर्मुद्रण होत राहिले.

१३ नदवी, पूर्वोक्त, १०४.

१४. पूर्वोक्त.

१५. पूर्वोक्त.

१६. नद्वी, पूर्वोक्त, ८९.

१७. नूमानी, **खुतबात**, १६.

१८. तपशीलासाठी पाहा, नद्वी, पूर्वोक्त, ९०-१०२.

१९. नूमानी, **मकालात** ( आझमगढ, १३५१/१९३२ ) प्रकरण-३, ९१-१२५.

२०. नद्वी, पूर्वोक्त, ९७-१०१.

२१. नूमानी, खुतबात, १६.

२२. पाहा, **विश्वभारती ॲनल्स**, खंड ४. मी पाहिलेल्या ५० पानी पुनर्मुद्रितावर दिनांक नव्हता.

२३. उबयदुल्लाह सिंधी यांच्या पुढील दोन ग्रंथांचाही उल्लेख करता येईल : (१) **शाह वलिउल्लाह और उनकी सियासी तहरीक**, आणि ( २ ) **शाह**

वलिउल्लाह और उनका फल्सफा, हे दोन्ही ग्रंथ उर्दू भाषेत असून लाहोर येथे प्रकाशित झालेले आहेत.

२४. सर सय्यद अहमद खान यांच्या चरित्रासाठी पाहा, अल्ताफ हुसैन हाली, हयात-इ-जावीद (आग्रा, १९०३; वारंवार पुनर्मुद्रित), आधुनिक रसग्रहणासाठी पाहा, विल्फ्रेड कॅन्टवेल स्मिथ, **मॉडर्न इस्लाम इन् इंडिया** (लाहोर, १९४३), पृष्ठ ५–४२. आधुनिक भारतातील इस्लामी जीवन आणि प्रवाह अभ्यासावयाचे असल्यास प्राध्यापक स्मिथ यांचे हे पुस्तक अनिवार्य आहे. याची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे.

२५ एम्. ए. सरवर, **मौलाना उबयदुल्लाह सिंधी : हिज लाइफ, टीचिंग अँड पोलिटिकल व्ह्यूज** (सिंधसागर ॲकॅडमी, लाहोर, १९४३).

२६. त्यांचे महत्त्वाचे ग्रंथ असे : चार दुबंदी आकाराच्या खंडांत कुराणावरचे उर्दू भाष्य, **बयानुल् कुर्आन** (दिल्ली, १३४९/१९३१), आणि **इम्दादुल फतावा** (४ खंड, दिल्ली, १९३५).

२७. **रिकन्स्ट्रक्शन ऑफ रिलीजस थॉट इन् इस्लाम** या विषयावर त्यांनी एक संपूर्ण ग्रंथ लिहिला आहे (लाहोर, १९३०, ऑक्सफर्ड युनि. प्रेस द्वारे पुनर्मुद्रित). धर्माच्या क्षेत्रातील इक्बालचे हे सर्वात महत्त्वाचे पुस्तक आहे; विशेषत: शेवटची 'द प्रिंसिपल्स ऑफ मूव्हमेंट इन् द स्ट्रक्चर ऑफ इस्लाम' या विषयावरची सहा व्याख्याने पाहावीत.

२८. काही लेखकांनी त्यांच्यासंबंधी लिहिले आहे ते नाकारणे हा इथे हेतु नाही, तर शास्त्रीय, परिपूर्ण व चिकित्सक अभ्यास अजून झालेले नाहीत एवढेच फक्त सुचवायचे आहे. एक अप्रतिम व्यासंगी स्वरूपाची प्रबंधिका **'इक्बाल'स् एज्युकेशनल फिलॉसफी'**, के. जी. सैयिदेन यांनी लिहिली आहे, त्याशिवाय अलीकडे उर्दू भाषेत एक चांगला अभ्यास डॉ. युसुफ हुसैन यांच्या **रूह-इ इक्बाल** या ग्रंथाच्या रूपाने उपलब्ध झाला आहे.

२९. खंड-१ दिल्ली, दिनांक दिलेला नाही, पण प्राक्कथनावर १२ सप्टेंबर, १९३१ ही तिथी आढळते. खंड-२, बिजनोर, दिनांक दिलेला नाही, बहुधा १९४०-४१ च्या सुमाराचा असावा. पहिल्या खंडाची सुधारित आवृत्तीसुद्धा प्रकाशित झाली आहे.

३०. प्रथम प्रकाशन, दिल्ली, १९४६; अनेक आवृत्त्या, काही कायदेशीर आणि काही चोरून काढलेल्या.

प्रकरण चौथे

# इस्लामचे पुनरर्थबोधन

## १ : प्रास्ताविक

एक ऐतिहासिक घटना या दृष्टीने गेल्या दोन शतकांत इस्लामच्या प्रसाराचा काळजीपूर्वक अभ्यास करण्यात आला आहे. सोळा-सतरा देशात झालेली प्रगती आणि त्याला मिळालेला प्रचंड अनुयायी वर्ग हा अनेक आर्थिक, धार्मिक व वांशिक शक्ति-प्रवाहांचा परिपाक आहे. जगात सुमारे ४० कोटी मुसलमान आहेत.[१] इस्लामने एक महान सभ्यता (civilization) निर्माण केली. वाङ्मय, विज्ञान, तत्त्वज्ञान, ईश्वरशास्त्र, इतिहास, कायदा या क्षेत्रांमध्ये मुस्लिम विद्वानांनी भर घातली. सौंदर्यविषयक क्षेत्रात, स्थापत्यकलेत मुसलमान सर्वश्रेष्ठ होते; मुस्लिम कलावंतांनी चित्रकला, संगीत यावर सखोल प्रभाव टाकला; जडावकाम, मातीची भांडी, सुंदर अक्षरलेखन, पुस्तकबांधणी, भरतकाम, वेषभूषा व पाकविद्या अशा कलाकौशल्यांचा विकास केला हे आता सर्वमान्य झाले आहे. इस्लामचा उदय रक्तपिपासू अरबांच्या उगारलेल्या हातातील तलवारीच्या बळावर झालेला नसून, टॉयन्बी ज्याचे वर्णन मानवतेचा एक सर्वश्रेष्ठ उपकारकर्ता अशा शब्दात करतो [१] त्या अब्दल्ला पुत्र मुहम्मद नामक अरबाची शिकवणूक व व्यक्तिमत्त्व यांच्यामुळे झाला आहे, हे मत आता हळूहळू विद्वज्जनांत एकंदरीत मान्य झाले आहे.

हे अलीकडचे मत आहे; पूर्वी युरोपात मुहंमद हा मूर्तिपूजकाचे प्रतीक, अपस्माराचा रुग्ण, भोंदू, फुटपाड्या व खोटा प्रेषित मानला जात असे.[१] इस्लाम आणि त्याच्या भाषा यांच्या अध्ययनांत झालेली वाढ आणि शास्त्रीय पध्दतीचा अवलंब केल्यामुळे झालेले सत्याचे दर्शन यामुळे हे मतपरिवर्तन घडून आले. सुधारणा घडवून आणणारी इतिहासकालातील एक विलक्षण शक्ती, पाशवी बळ वापरण्याला सरावलेल्या एका खोट्या प्रेषितामुळे कार्यान्वित होऊ शकली ही उपपत्ती फारच भोळसटपणाची होती. गांधींचा उदय आणि भारताचे स्वातंत्र्य यांनी हेच दाखवून दिले की, तलवारीचे बळ हे माणसाच्या आत्मिक सामर्थ्याहून कमजोर असते. अशा प्रकारे इस्लाम हा अभ्यासाला योग्य विषय असल्याचे अभ्यासकांना हळूहळू मान्य झाले आहे, आणि इस्लाम आणि त्याने निर्माण केलेले शक्तिप्रवाह समजावून घेणे हे इस्लाम

धर्म आणि इस्लामी कायदा यांचा, म्हणजेच शरीआचा, सखोल अभ्यास केल्याबाचून अशक्य आहे, ही गोष्ट आता स्वयंसिध्दच मानली जाते.[४] एकोणिसाव्या शतकात युरोपीय प्राच्यविद्याविशारदांनी या दिशेने बरीच प्रगती केली आहे. पण सर्वाधिक ऋण मान्य केले पाहिजे ते सी. स्नावक हुरग्रॉंज ( C. Snouck Hurgronje ) या डच प्राच्यविद्यापंडिताचे. इस्लामी विधिशास्त्राच्या 'आधुनिक' अध्ययन परंपरेचे ते संस्थापक होत. गोल्डझिहेर (Goldziher), वेन्सिन्क (Wensink), बेस्ट्रॅयझर(Berstraesser); ह्यांनी त्यांच्यानंतर हे कार्य चालविले आणि त्यानंतर सांतिलाना ( Santillana ). मिलियट ( Milliot ), शाख्ट ( Schacht ) व तिआन ( T'yan ) यांनी.

इस्लाममध्ये कायदा धर्मापासून निराळा नाही. ते दोन्ही प्रवाह एकाच पात्रातून वाहातात आणि एकमेकांपासून मुळीच वेगळे दाखवता येत नाहीत. त्यांना **शरीआ** ( फार्सी, तुर्की व उर्दू भाषांमध्ये–शरीयत ) आणि **फिकह** या नावानी ओळखले जाते. इस्लामच्या धार्मिक कायद्याच्या त्या दोन बाजू होत. शरीआ हे व्यापक वर्तुळ असून सर्व मानवी कृतींचा त्याच्या परिघात अंतर्भाव होतो. फिकह त्यापेक्षा संकुचित आहे. आणि ज्यांना सामान्यः वैधानिक कृत्ये (legal acts) म्हणून ओळखले जाते त्यांच्याशी ते संबंधित आहे. शरीआ नेहमी आपल्याला प्रकटीकरणाचे ( revelations ) स्मरण देते. कुराण वा हदीस यांच्यावाचून जे कधीच प्राप्त होऊ शकले नसते असे '**इल्म**' (ज्ञान) म्हणजे हे प्रकटीकरण होय. फिकह मध्ये विवेकबुध्दीवर भर आहे आणि इल्मवर आधारित अनुमाने त्यात सतत संमतिपूर्वक उदाहरणे म्हणून दिली जातात.

शरीआचा मार्ग ईश्वराने व त्याच्या प्रेषिताने घालून दिला आहे, **फिकहचा** प्रासाद हा मानवी प्रयत्नांनी उभारण्यात आला आहे. फिकहच्या अनुसार एखादे कृत्य एकतर वैध असेल वा अवैध, मा **यजुझु** व **मा ला यजुझू**, अनुमत असेल वा अनुमत नसेल, मंजुरी वा नामंजुरी यांच्या अनेक श्रेणी शरीआमध्ये आहेत. फिकह ही संज्ञा कायद्यासाठी–एक शास्त्र या दृष्टीने वापरली जाते; आणि ईश्वराने आज्ञापिलेला सचोटीचा मार्ग या अर्थाने कायद्यासाठी शरीआ ही संज्ञा वापरली जाते. अर्थात हे मोकळया मनाने मान्यच करायला हवे की, ही विभाजनरेषा नेहमीच स्पष्ट नसते आणि बऱ्याचदा तर स्वतः मुस्लिम विद्वान या संज्ञांचा समानार्थी वापर करतात; कारण शरीआमध्ये असो वा फिकहमध्ये सर्व मानवी कृतींचा निकष एकच मानला आहे तो म्हणजे आदर्शरूप परिपूर्णता असलेल्या संहितेनुसार वागून अल्लाची मान्यता मिळवणे.[५]

धर्म असे आग्रहाने सांगतो की, ईश्वर एक असून आपण सारी त्याची लेकरे आहोत. लोकशाहीचा भर यावर असतो की राज्यसंस्था एक असून तिचे कायदे सर्वांना सारखेच लागू आहेत. राज्यसंस्था जे तिच्या सर्व नागरिकांना निरपवादपणे लागू करते

असे व्यक्तिनिरपेक्ष व वस्तुनिष्ठ नियम म्हणजे कायदे. पण धर्म हा महान् प्रेषितांच्या व्यक्तिगत अनुभवावर आधारित असतो, त्याचे आवाहन व्यक्तिगत साक्षात् व अंतर्ज्ञानात्मक असते. त्याचे नियम, पूजाविधी व बाह्योपचार जरी सर्वसाधारण समुदायाशी संबंधित असले तरी श्रध्देचा आतला गाभा हा संपूर्णपणे व्यक्तिगत असतो. राज्यसंस्थाचा तिच्या कायद्यांची जशी अंमलबजावणी करू शकते तशी धार्मिक निष्ठेची सक्ती करू शकत नाही. त्यामुळेच न्यायालयांसमोर सर्व धर्म समान असतात. विशिष्ट धर्मश्रध्देचा प्रश्न हे कायद्याच्या संदर्भात इतर कोणत्याही तथ्याप्रमाणे सिध्द वा असिध्द होऊ शकणारे एक वस्तुनिष्ठ तथ्य आहे. आणि एखादी धार्मिक श्रध्दा सत्य आहे किंवा नाही, हे ठरविण्यासाठी न्यायालयात आवाहन केले जाऊ शकत नाही. अशी वचने त्यामुळेच सर्वज्ञात झाली आहेत. एकाच ईश्वरावर व त्याच्या प्रेषितांवर विश्वास ही इस्लामची शिकवण आहे परंतु असे आज्ञापालन कसे करवून घ्यावे हे सांगणे इस्लामला शक्य नाही व त्याने तसे सांगताही कामा नये. ' करवून घ्यावे ' असे म्हणण्यात (अ) एखादी गोष्ट करण्याची आज्ञा करणे आणि (ब) आज्ञा पाळली न गेल्यास शासन करणे असा अर्थ आहे. श्रध्दा ही एखाद्या बाह्य यंत्रणेकडून जबरीने कशी लादली जाऊ शकेल ? शिक्षक मला शिकवू शकेल; स्वतःच्या उदाहरणाने तो मला प्रेरणा देऊ शकेल; मला तो उत्साहित करू शकेल. पण मला तो श्रद्धा ठेवण्याला भाग पाडू कसा शकेल ? राज्यसंस्थेकडून अंमलात आणला जाऊ शकणारा कायदा आणि पूर्णपणे मनुष्याची व्यक्तिगत बाब असलेला सद्‌सद्‌विवेकनिष्ठ नियम या दोहोत असे स्पष्ट अंतर आहे.

आज इस्लाममध्ये हीच सर्वात मोठी अडचण आहे. कायदा व धर्म या दोहोंना शरीआने व्यापलेले आहे. धर्म हा आध्यात्मिक अनुभवावर आधारित असतो, कायदा हा विधिमंडळाच्या वा अन्य विधिनिर्मात्या अधिसत्तेच्या द्वारे व्यक्त झालेल्या समुदायाच्या इच्छेवर आधारित असतो. धर्माचा गाभा अपरिवर्तनीयच असतो. जगभरच्या सूफींनी आणि गूढवाद्यांनी ईश्वराच्या भक्तीचे गान ईश्वरासाठीच केले आहे. शरीआ हे जर ह्या द्वित्वाचे नाव असेल तर या शक्तिप्रवाहांपैकी एक प्रवाह सततच विरुद्ध दिशेला खेचीत राहील. ईश्वराचे ज्ञान हे एक गूढ आहे, आणि मानव नेहमीच त्याचा पाठपुरावा करीत आला आहे. या पाठपुराव्यात सर्व श्रद्धावंत माणसे, मग त्यांचा विशिष्ट धर्म कोणताही असो, समान आहेत. पण कायदे मात्र देशादेशात व वेळोवेळी विभिन्न असतात. समाजाच्या बदलत्या आकृतिबंधाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न त्यांना सदैव करावा लागतो. अरबांचे कायदे एस्किमोंना लागू केले जाऊ शकणार नाहीत; आणि ऑस्ट्रेलियातील अरण्यवासीयांचे कायदे उत्तर प्रदेशाच्या सुपीक प्रदेशाला गैरलागू ठरतील. काळ आणि परिस्थिती यांच्या मुशीत कायदे हे धातूंसारखे असतात; ते वितळतात, हळूहळू निरनिराळ्या आकारात ते गोठतात; ते पुन्हा वितळतात आणि अनेक वेगवेगळे आकार धारण करतात. ही क्रमविकास-प्रक्रिया मानवी समाजाशी समकक्ष असते. जे मृत आणि

चैतन्यहीन आहे, ते सोडल्यास काहीच अपरिवर्तनीय नसते. कायदे कधीच अपरिवर्तनीय असू शकत नाहीत. प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांसमोर बाकीच्या जगाबरोबर भारतही बदलतो आहे. निसर्गावरची आपली सत्ता, आपले जीवनविषयक दृष्टिकोण आणि माणसांची सामाजिक स्थिती सुधारण्याची आपली इच्छा ह्यामुळे ही परिवर्तने घडत आहेत. आपली विधिमंडळे एकामागून एक कायदे करीत आहेत, आणि ही विधिनिर्माण–क्रिया समाजातील आपले व्यवहार नियंत्रित करू पाहात आहे.

पण माणसाचे मन आणि सदसद्विवेकबुद्धी मुक्त आहे. विश्वातील अंतिम गोष्टींसंबंधी जी श्रद्धा बाळगावीशी वाटेल ती बाळगण्याची त्याला मुभा असली पाहिजे, आणि श्रद्धा व कल्पना याबाबत त्याच्यावर निर्बंध घालता येणार नाहीत. अशा प्रकारे इस्लाममध्ये एक अंतर्गत संघर्ष आहे. पहिली गोष्ट म्हणजे धार्मिक कायद्याच्या अनाद्यनंत संकल्पनांचा आधुनिक नागरी कायद्याशी संघर्ष निर्माण होतो. उदा० विमा किंवा सरकारने उभी केलेली कर्जे. विमा आणि नफा देणे–घेणे या गोष्टींना शरीआने मनाई केली आहे; आधुनिक राज्यसंस्था मात्र त्यांना केवळ परवानगीच नव्हे तर प्रोत्साहनही देते.

दुसरी गोष्ट म्हणजे, जुन्या कायद्याचा जाचकपणा कमी करण्याच्या दृष्टीने इस्लामच्या प्राचीन कायद्यावर नवीन व्यवस्थेच्या तत्त्वांची कलमे बांधली जातात; किंवा शरीआच्या जागी नव्या कायद्यांची प्रतिष्ठापना केली जाते. यातील पहिल्या प्रकारचे उदाहरण म्हणून भारतात प्रचलित असलेल्या, भेटीबद्दलच्या ( gifts ) मुस्लिम कायद्याचा उल्लेख करता येईल. त्यात फ़िक़्हवर ( मूळ इस्लामी कायद्यावर ) इंग्रजी समन्यायबुद्धीच्या तत्त्वांचे कलम बांधण्यात आले आहे. दुसऱ्या प्रकारचे उदाहरण भारतातील पुराव्याच्या कायद्यात ( लॉ ऑफ एव्हिडन्स ) सापडते. या कायद्याने पुराव्यासंबंधीच्या इस्लामी कायद्याची जागा संपूर्णतया घेतली आहे. इस्लामी देशांमध्ये सर्वत्र ही दुहेरी प्रक्रिया सुरू आहे.–क़ानून, ( इहवादी कायदा ) शरीआच्या कायद्यांना पोखरून किंवा उखडून टाकीत आहे. उत्तर आफ्रिकेत फ्रेंच विधिशास्त्राचा, मध्य आशियात सोविएत कायद्यांचा, भारतात इंग्रजी सामान्य कायद्यांचा, इंडोनेशियात डच कायद्याचा आणि वरील सर्वांपेक्षाही आंतरराष्ट्रीय कायद्याचा ( तिथल्या ) कायद्यांवर सखोल परिणाम पडला आहे. एवढेच नाही तर मुस्लिमांच्या संदर्भात न्यायदानाचा अर्थच त्याच्यामुळे बदलत गेला आहे.

शरीआ हा कायदा व धर्म हे दोन्ही असल्याचे आपण पाहिले आहे. कायदा हा स्वभावतःच परिवर्तनशील असतो. उलट धर्माचा गाभा हा अपरिवर्तनीय असतो, निदानपक्षी ईश्वरावरील श्रद्धा हा एक अपरिवर्तनीय आदर्श असतो. तो एक निरंतर चालणारा शोध असतो. असे दोन अंतर्विरोधी प्रवाह एकत्र आले तर संघर्ष निर्माण होणे अटळ

आहे. हा संघर्षच या माझ्या निबंधाचा मुख्य प्रतिपाद्य विषय आहे. माझे उत्तर असे आहे : ( अ ) विसाव्या शतकातील विचाराच्या संदर्भात धर्म आणि कायदा यांच्या व्याख्या करणे. ( ब ) इस्लाममधील धर्म व कायदा यातील फरक स्पष्ट करणे, आणि ( क ) या आधारावर इस्लामचे अर्थबोधन करणे व इस्लामला नवा अर्थ देणे. ज्यांना आपण इस्लामच्या सारतत्त्वाचे घटक मानून चालत होतो असे काही भाग जर ह्या विश्लेषणामुळे बदलावे किंवा पूर्णपणे टाकून द्यावे लागले तर ह्या परिणामांना आपण तयार राहिले पाहिजे. पण या उलट ह्या विश्लेषणामुळे इस्लामच्या गाभ्यावरचा विश्वास जर टिकवता आणि दृढ करता आला तर ते दुःखदायक असले तरीही, नव्या आदर्शाअभावी दिशाहीन अवस्थेत मरगळून पडलेल्या शरीराला नवे स्वास्थ्य आणि जोम लाभेल.

**नवीन अर्थबोधनाची गरज :** आपण मुसलमानांच्या धर्मश्रद्धांची चिकित्सा करू लागलो म्हणजे आपल्याला त्यांचे कर्मठ आणि अकर्मठ असे दोन गट करता येतील. हे शास्त्रीय वर्गीकरण नव्हे; आणि श्रद्धेच्या बाबींचे काटेकोर पद्धतीने वर्गीकरण करणे शक्य आहे, असे गृहीत धरून आपण चालूच नये. श्रद्धा, अज्ञेयवाद व अश्रद्धा अशा अनेक छटा असतात. श्रद्धेचे स्वरूपच असे हवे असते की, वर्गीकरणाच्या गणिती वा केवळ आकरिक ( formal ) पद्धतींचा अवलंब आपल्याला चुकीच्या दिशेने नेण्याची शक्यता असते. त्यामुळे आपण ( १ )कर्मठ आणि ( २ ) अकर्मठ ( किंवा अननुसारी ( non-conformist ) म्हणणे अधिक बरे. ) असे सर्वसाधारण व लवचिक वर्गीकरण करू. एकंदरीत कोणत्याही पंथाच्या इमामांनी घालून दिलेला धर्माचा प्रकार हाच ( खरा ) धर्म व उपासनापद्धती असून आपल्या काळातील मुसलमानांसाठी ती उपकारक आहे व त्यात कोणताही मूलगामी बदल करणे धोक्याचे ठरेल, असे ज्यांना खात्रीपूर्वक वाटते त्यांची इस्लामच्या नित्याच्या धर्मकृत्यांवर श्रद्धा असली किंवा नसली आणि ती कृत्ये ते करीत असले किंवा नसले तरी त्यांचा अंतर्भाव कर्मठ या संज्ञेत होतो.

या गटाबद्दल अधिक तपशीलात शिरणे अशक्य आहे आणि कदाचित् अनिष्टही ठरेल. उदाहरणार्थ, काही लोकांची नमाज, रोज़ा, हज़ वगैरे विशिष्ट धर्मकृत्यांवर प्रामाणिक श्रद्धा असते आणि मोठ्या प्रमाणावर ते त्याप्रमाणे आचरण करीत असतात. जरी काही अहकाम ( शरीअतचे नियम ) ते पाळू शकत नसले तरी, आपण निष्काळजी असल्याचे ते कबूल करतात आणि परंपरागत धर्मकृत्यांचे काटेकोर आचरण करता आले तर आपल्याला ते अधिक बरे ठरेल असे त्यांना वाटत असते. काही जण असे असतात की, कर्मकांडाच्या आचरणाबाबत ते पक्के असतात पण श्रद्धेत व चारित्र्यात उणे पडतात. काहीजण चारित्र्यात पक्के असतात पण कर्मकांडाबाबत बेपर्वा असतात.

काहींचा परमेश्वरावर आणि इस्लामच्या पुनरुज्जीवनावर ठाम विश्वास असतो. तर काही जीवनप्रवाहाबरोबर वाहत जाणारे, प्राक्तनाबाबत बेफिकीर आणि सदसद्–विवेकाच्या टोचणीतून मुक्त असणारे पण बालसुलभ श्रद्धेने काठोकाठ भरलेले असे असतात. इस्लामच्या कर्मठ रूपावर व नियमावर विश्वास ठेवणारे हे सगळे, आणि इतरही अनुल्लेखित सर्व, त्यांची श्रद्धा, चारित्र्य व कृती कशीही असो, आणि तो पथ त्यांना पूर्णतया स्वीकार्य असो वा नसो, त्यांना ' कर्मठ ' म्हणावे लागेल.

याउलट ' अननुसारी ' म्हणजे धर्माचरण न करणारे ( non-conformist ) (किंवा तुम्हाला पसंत असल्यास अकर्मठ म्हणा) हे मूलतः वरच्यापेक्षा निराळे असतात. ' अकर्मठ ' ही संज्ञा टाळणे बरे असे मला वाटते; कारण, काटेकोर अर्थाने इस्लाममध्ये ' कर्मठपणा ' व ' अकर्मठपणा ' असा प्रकारच नाही. केवळ सुसंघटित धर्मपीठच ( चर्च ) कर्मठपणा, पाखंडीपणा आणि अकर्मठपणा त्यासंबंधीचे नियम करू शकते. जर धर्मपीठ नसेल तर पाखंडी वा अकर्मठ व्यक्तींची कल्पना करणे अवघड ठरेल. पण, सांगायचेच तर असे म्हणता येईल की, जो माणूस इस्लामच्या नियमित धर्मकृत्यांवर विश्वास ठेवीत नाही आणि इमामांनी ठरवून दिलेला धर्माचा पाया मान्य करीत नाही तो माणूस अननुसारी ( non-conformist ) म्हणवला जाईल. ईमानची सर्वसाधारण व्याख्या अशी :

१. वाचेने उच्चारण;

२. विश्वासाचा प्रामाणिक; आणि

३. अधिकृत विधिकारांनी घालून दिलेल्या तत्त्वानुसार कृती. ' यापैकी पहिली बाब वगळल्यास अन्य कोणतीचाच तो पूर्णांशाने स्वीकार करीत नाही. श्रद्धेचे प्रामाणिक उच्चारण ही इस्लामची एकमेव कसोटी आहे; काही विश्वासांबाबत ती श्रद्धा चुकीची असू शकेल; इस्लामची धर्मकृत्ये त्यांच्या सर्व तपशीलांसह मान्य न करूनही चालू शकेल—ही वृत्ती म्हणजे अननुसारिता ( non-conformity ) जर तुम्हाला तत्त्वतः ते मान्य असेल पण तुम्ही कृती करीत नसाल तरी तुम्ही कर्मठ आहात, पण परमेश्वर व प्रेषित यांच्यावरच्या विश्वासाखेरीज दुसरी कोणतीही धर्मश्रद्धा वा तत्त्व तुम्ही नाकारीत असाल तर तुम्ही ' अननुसारी ' ( non-conformist ) आहात.

शिक्षित भारतीय मुसलमानांपैकी बराच मोठा भाग या वर्गात मोडतो. काहींना इमामांची अधिसत्ता मान्य नाही; काहींना नमाज आवश्यक वाटत नाही; काम हेच नमाज आहे असा काहींचा विश्वास असतो; काही खुद्द धर्माबद्दलच संदिग्धपणे बोलत असतात. पण मुख्य कसोटी उरतेच —— अधिकृत इमामांनी अर्थ लावून प्रतिपादन

केलेला इस्लाम एकंदरीत मानवमात्राच्या दृष्टीने उपकारक व सत्य आहे हे तुम्हाला मान्य आहे की नाही ?

इस्लामच्या सत्याबद्दल आदर आणि श्रद्धा बाळगूनही या प्रश्नाला माझे विनम्र उत्तर नकारार्थी आहे आणि म्हणून मी एक अननुसारी आहे. पण तरीही मी अश्रद्ध मात्र नाही हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. अश्रद्ध व्यक्तीच धर्माचा वा इस्लामचा खरेपणाच नाकारीत असते किंवा किमान धार्मिक श्रद्धेच्या काही मूलभूत तत्त्वांबद्दल शंका प्रकट करते. अननुसारी व्यक्ती धर्माचे काही प्रकार व तत्त्वे नाकारीत असेल किंवा त्याबद्दल शंका प्रकट करीत असेल पण ती तत्त्वत: धार्मिक व्यक्ती असते. धर्मावर तिचा तिच्या कल्पनेनुसार विश्वास असतो, पारंपरिक दृष्टीने नसतो. अननुसारी व्यक्ती अनेकदा सखोल धार्मिक निष्ठा बाळगणाऱ्या आणि धर्मावरच्या अविचल विश्वासामुळेच अननुसारी असल्याचा ऐतिहासिक दाखला आहे. सध्याच्या स्वरूपातील धर्माची मांडणी आजच्या जगाच्या दृष्टीने उपकारक वा सत्य आहे हे मला मान्य नाही आणि माझ्या श्रद्धेची फेरमांडणी करावी असे मला वाटते. नवा पंथ स्थापन करण्याचा माझा इरादा नाही, आणि मी धर्मशिक्षक असल्याचाही माझा दावा नाही; पण हा शोध आणि हे साहस करीत असताना मला असा ठाम विश्वास वाटतो की, इस्लामचा मला कळलेला अर्थ, विसाव्या शतकातील मानवी जीवनाला बरेच काही देऊ शकेल. सुन्नी इमामांनी वा शिया पंथाच्या कोणत्याही संप्रदायाने केलेली व सर्वसाधारणपणे मान्यता पावलेली इस्लामची व्याख्या मात्र मी मान्य करू शकत नाही. गोंधळात टाकणारे तपशील, अर्थशून्य कर्मकांड आणि निष्प्राण सूत्रे ह्यांचा मनुष्यावर काहीही परिणाम होऊ शकत नाही. यापुढील पृष्ठांमधून इस्लामच्या उदारमतवादी अर्थबोधनाची एक योजना संक्षेपाने मांडण्याचा माझा मनोदय आहे.

## २ : पुनरर्थबोधनाची साधारण तत्त्वे

**ऐतिहासिक दृष्टिकोण :** इस्लामचा संदेश जगाला चौदा शतकांपूर्वी दिला गेला. त्याचा नव्याने अर्थ लावण्याची गरज आहे काय ? तो संपूर्ण जगासाठी व सर्वकाळासाठी नाही काय ? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे होकारार्थी आहेत. एखादा संदेश असला आणि चिरंतन असला तरी या आधारविधानानुसारच ( by the very premises ) आधुनिक विज्ञान, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, अध्यात्मविद्या आणि ईश्वरशास्त्र यांच्या अनुषंगानेच समजून घेतला पाहिजे, इतकेच नव्हे तर जगातील एकत्रित विचारशक्तींचा व तिच्या दीप्तिमान प्रकाशाच्या झोताखालीच त्याचे आकलन करून घेतले पाहिजे.

आपले प्राक्तन नियंत्रित करणाऱ्या देवतांची कल्पना मानवी इतिहासात सुमारे दहा हजार वर्षांपूर्वीच मानवाला सुचली. आकाशातील नक्षत्रें, अरण्यातील प्राणी, हवेत

उडणारे पक्षी, जमिनीवर सरपटणारे प्राणी, समुद्रातील मासे हे अलौकिक जीवमात्र असून त्यांच्या अंगी अपाय करण्याची शक्ती आहे, आणि जगभर सर्वत्र माणसाने ह्या देवतांची पूजाअर्चा केली आहे; बळी, मंत्रोच्चार, धार्मिक आचार आणि उपासनाविधी आणि नृत्य करून अरिष्ट निवारण्याचा त्याने प्रयत्न केला. त्यानंतर सुमारे पाच हजार वर्षांनी म्हणजे आजपासून पाच हजार वर्षांपूर्वी मेसोपोटेमियामध्ये किंवा त्याच्या जवळपास आणि भारतातसुद्धा, लिखित इतिहासात प्रथमच माणसाला असा विश्वास वाटू लागला की परम तत्त्व, एकम्, ब्रह्म, केवल, निर्माता, राम वा रहीम यापैकी कोणत्याही नावाने ओळखला जाणारा एकमात्रच पूजेचा विषय असतो, हजार देवता नव्हेत. मानवी चित्‌शक्तीला प्रदीर्घ क्लेश सोसावे लागल्यानंतरच हा महान, कदाचित् मानवी इतिहासातील महत्तम, शोध लागला. शून्याच्या शोधापेक्षा, अग्नि, लोह, सापेक्षता यांच्या किंवा कोणत्याही ज्ञात वस्तूच्या शोधापेक्षा हा शोध मोठा आहे. ही संकल्पनाच विलक्षण आहे. तिच्या ठायी एक गूढ आणि प्रभावी शक्ती आहे; विकल झालेल्या आत्म्यांना ती पुन्हा चैतन्यमय करते, जीवनाला अर्थ देते, अश्राव्याला श्राव्य आणि अज्ञाताला ज्ञात करते. मानवी विज्ञान व त्याच्या बदलत्या मनोवृत्ती यांच्यावर ती अवलंबून नसते; ती एक चिरंतन संकल्पना आहे, परिवर्तन, क्षय, न्यूनत्व यापैकी कसलीच बाधा तिला होत नाही. हा संदेश माणसाला संवेदनक्षम मनाच्या कंपनात्मक चित्‌शक्तींच्या द्वारेच बहुधा मिळत आला आहे. प्रेषित महंमद हा असा ' निवडलेल्यां ' पैकी एक होता. त्याने केलेल्या शोधाचा इतिहास, त्याच्या मनाला झालेल्या यातना आणि त्याला झालेला अंतिम साक्षात्कार याविषयीची माहिती कुराणात मिळते. ज्या सत्याच्या आंतरिक संवेदनेतून माणसाला क्रमशः झालेल्या परमेश्वराच्या ज्ञानाचा इतिहास गवसतो त्या सत्याने हा ग्रंथ ओतप्रोत भरला आहे. एक उदाहरण असे आहे :

' ज्यावेळी सूर्या ( च्या प्रकाशपटला )– स गुंडाळलें जाईल, व जेव्हां तारे झडून पडतील,
आणि ज्या वेळां पर्वत ( आपल्या जागेवरून ) चालविले जातील, व जेव्हां दहा महिन्यांच्या गर्भिणी सांडण्या मोकळ्या मोकळ्या फिरतील; व ( कोणीही त्याचा राखणदार नसेल );
आणि ज्यावेळीं रानटी जनावरें ( भयाने वस्त्यांत ) येऊन मरतील;
व जेव्हां समुद्रांस ऊत येऊन ते एक होऊन जातील,
आणि ज्यावेळी आत्मे आपापल्या शरीराशीं जोडिलें जातील,
व जेव्हा जिवंत पुरून टाकलेल्या मुलीस विचारलें जाईल,
की तिला कोणत्या अपराधाबद्दल ठार केलें गेलें ?

आणि ज्यावेळीं ( लोकांचे ) कर्मपट उघडले जातील;
व जेव्हां आकाशाचें कातडें काढलें जाईल;
आणि ज्या वेळीं नरकाग्नि धगधगविला जाईल;
आणि जेव्हां स्वर्ग जवळ आणिला जाईल;
( त्यावेळीं ) प्रत्येक जीवाला, त्यानें जें कांहीं ( पुढच्या सामुग्री दाखल ) आणून हजर केलें आहे तें ( प्रत्यक्ष ) कळून येईल.
तर मला अशा ( नक्षत्रां )-ची शपथ कीं, जीं ( एका दिशेस ) चालतां चालतां उलटून मागें हटूं लागतात;
व जीं नीट जातां जातां ( डोळ्यापुढून ) लपून जातात;
आणि रात्रीची शपथ कीं, जेव्हां ती फटफटीत होते. ( सारांश, मला या सर्व वस्तूंची शपथ आहे );
कीं हें कुराण सन्माननीय दूता ( म्हणजे 'जिब्रील' ) नें पोहोचविलेला निरोप होय;
( व तो प्रकटीकरणाचें भारी ओझें उचलण्याची ) ताकद बाळगितो, ( आणि ) महासिंहासनाधीश ( परमेश्वरा )- समीप त्याचा मोठा दर्जा होय;
( व ) तेथें तो ( दूतांचा ) सरदार ( व ) प्रामाणिक होय ....."

परमेश्वराच्या अस्तित्वावरचा विश्वास हा प्रत्ययावर आधारित असतो. तो सिद्ध केला जाऊ शकत नाही वा असिद्धही केला जाऊ शकत नाही म्हणून काळाच्या कसोटीवर तो टिकला आहे. मानवी बुद्धीचे कार्य वा ज्ञान वा विज्ञान यांचे असे नाही. विज्ञानाची गृहीते, अनुमाने, सिद्धांत आणि 'तथ्ये' मूलतःच परिवर्तनक्षम असतात, पण परमेश्वरावरचा विश्वास एकमात्र आणि अपरिवर्तनीय, साक्षात् व अंतर्ज्ञानजन्य असतो. मी आधी म्हटल्याप्रमाणे, त्याच्यावर विश्वास ठेवतात त्यांच्यासाठी हा मानवाला लागलेला एकमेव महत्तम शोध आहे.

पण हे सत्य केवळ भाषा हे जे अपूर्ण साधन आहे तिच्या द्वारेच संक्रमित केले जाऊ शकते. भाषा मानवीय, बदलती व परिवर्तनशील असते. कोणतीच भाषा पाच वा दहा हजार वर्षांपेक्षा अधिक काळ वाचली किंवा समजली जाऊ शकली नाही. ज्यांचा अर्थ विस्मृत झाला आहे अशा, मानवाने लिहिलेल्या अनेक गोष्टी या जगात आहेत. गेल्या २००० वर्षांत अरबांची अभिजात भाषा बरीच बदलली आहे, आणि भाषाशास्त्रीय अभ्यासांनी हे स्पष्ट केले आहे की, शब्दांचे अर्थ, त्यांच्यातील अतिसूक्ष्म भेद व छटा यांच्यात क्रमविकासात्मक बदल होत जातो. कोणतीच भाषा स्थिर राहत नाही. शब्दांची

व वाक्प्रचारांची आवाहन करण्याची शक्ती वाढते व घटते; तो अचल राहणारा घटक नाही. ज्ञात अशा ज्या परिवर्तनीय गोष्टी आहेत त्यांपैकी तो एक आहे. आणि म्हणून हे स्पष्ट आहे की, प्रेषिताच्या काळात अरबांनी वापरलेल्या भाषेतील शब्द, वाक्प्रचार, म्हणी, रूपके आणि प्रतिमा यांचे अर्थ बदलले आहेत, बदलत आहेत आणि बदलत जाणार आहेत. इतके की काही काळानंतर अशी वेळ येईल की, मोहंजोदडोच्या भाषेप्रमाणेच ही भाषा सुद्धा समजणे अवघड होऊन बसेल. पण आम्हा मुसलमानांचा असा विश्वास आहे की, भाषा संपली तरी तिने दिलेला मुख्य संदेश म्हणजे परमेश्वरावरील श्रद्धा; ती मात्र टिकून राहील. ' स्वर्ग आणि पृथ्वी नष्ट होतील, परंतु माझे शब्द मात्र कधीच नाहीसे होणार नाहीत. ' ' त्यामुळे माझे असे स्पष्ट मत आहे की, आपल्याला कुराणाकडे ' परत ' जाता येणार नाही, आपल्याला त्याच्यासवे ' पुढेच ' जायला हवे. प्रेषिताच्या काळांत अरबांना कळलेला कुराणाचा अर्थ मला समजून घ्यायचा आहे तो केवळ त्याचे पुनरर्थबोधन करण्यासाठी, माझ्या जीवनाच्या परिस्थितीला तो लागू करण्यासाठी आणि २० व्या शतकातील माणूस या नात्याने मला पटेल त्या मर्यादेपर्यंत त्यावर विश्वास ठेवण्यासाठी. मला कोणी वाळवंटात राहायला, उंटाच्या पाठीवर बसून प्रवास करायला, टोळ खायला, सूड घ्यायला, दाढी वाढवून मोठा अंगरखा घालायला आणि व्याज-अरब ( Pseudo–Arab ) मनोवृत्ती जोपासायला सांगू शकणार नाही. काव्यात्म सत्य आणि वास्तव सत्य यांच्यात मी फरक करायलाच हवा. धर्माची फोलपटे आणि धर्माचा गाभा, कायदा आणि आख्यायिका यांच्यात मी फरक करायलाच हवा. एक आधुनिक माणूस म्हणून इस्लामचा संदेश समजावून घ्यायला व मान्य करायला मी बांधील आहे. शतकांपूर्वी राहून गेलेला माणूस म्हणून नव्हे. अधिसत्तेबद्दल मला आदर आहे, पण सदसद्विवेकाच्या क्षेत्रात ' हे असे का ? ' ( बिला कय्फा ) असे विचारल्यावाचून तिला मी मान्यता देऊ शकणार नाही.

इस्लाम कुराणावर आधारित आहे, आणि कुराणाचा अर्थ त्याच्या ऐतिहासिक संदर्भात व कालक्रमात्मक तत्त्वांच्या आधारे लावण्यात आला पाहिजे. इस्लामचा अभ्यास करण्यापूर्वी यहुदी धर्म ( Judaism ) आणि ख्रिस्ती धर्म ह्यांची मूलतत्त्वे आपण अभ्यासली पाहिजेत. सेमिटिक लोकांच्या धर्माच्या सहानुभूतीपूर्ण आकलनापासून आपण प्रारंभ केला पाहिजे. यहुदी धर्म आणि ख्रिस्ती धर्म त्यांच्या ऐतिहासिक संदर्भात पूर्णतया समजल्यानंतरच प्रेषिताचा संदेश व त्याचा अर्थ स्पष्ट होतो.

भारत हा एक धर्मनिष्ठ देश आहे. धर्माचा अन्वयार्थ लावण्याच्या बाबतीत आम्हा भारतीयांना विशेष अनुकूल परिस्थिती आहे. इथे हिंदू, बौद्ध, जैन, शीख, ख्रिस्ती झरतोस्ती, यहूदी आणि मुसलमान सारेच, सर्व धर्मांना संपूर्ण समतेचे कायदेशीर आश्वासन देणाऱ्या धर्मनिरपेक्ष राज्यघटनेच्या संरक्षणाखालीं एकत्र राहातात. काहीं

कुल्यात अपवाद वगळता हिंदू, मुसलमान आणि इंग्रज या सर्वच राज्यकर्त्यांना आदरणीय वाटलेल्या, सहिष्णुतेच्या प्रदीर्घ परंपरेला धरून इथली राज्यघटना प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचा उच्चार, आचार व प्रचार यांची मुभा देते. अशी परिस्थिती असल्यामुळें भारतीय मुसलमानाने आयुष्यात दररोज आपल्या धार्मिक निष्ठांची व कृतींची आपल्या इतर देशबांधवांच्या निष्ठांशी–कृतींशी तुलना करावी. मुसलमानांना वंद्य असलेले हिंदू व हिंदूंना वंद्य असलेले मुसलमान– असे समान संत हे या देशाचे खास वैशिष्टय आहे. इस्लामच्या भारतीय अर्थबोधनाला, आणि माझा हा प्रयत्न त्याच प्रकारचा आहे, धर्मवेड आणि माथेफिरूपणा ह्यांचे ज्याला वावडे आहे असा धार्मिक सहजीवनाचा आणि गूढ सहानुभवाचा लाभ होतो आणि त्यातून मतसंग्राहकवृत्ती व मनाचा मोठेपणा निर्माण होतात. इस्लामसारख्या जागतिक धर्माच्या दृष्टीने हे फार मोठे फायदे होत.

## ३ : अर्थबोधनाच विशिष्ट नियम

**मूलभूत तत्त्वे** : इस्लामच्या आधुनिक पुनरर्थबोधनासाठीं जी सहा तत्त्वे योजिली आहेत ती पुढीलप्रमाणे होत :

१. धर्माच्या इतिहासाचा अभ्यास.

२. सेमिटिक वंशांच्या धर्माचा तौलनिक अभ्यास.

३. सेमिटिक भाषांचा व भाषाशास्त्राचा अभ्यास.

४. कायदा आणि धर्म यांचे अलगीकरण.

५. **शरीआ** आणि **कलाम** यांची फेरतपासणी.

६. विश्वघटनाशास्त्र आणि शास्त्रीय तत्त्वे ह्यांचे पुनरर्थबोधन.

**१. धर्माचा इतिहास** : धर्माचा इतिहास हे शास्त्र आता एक महत्त्वाची विद्याशाखा म्हणून अनेक विद्यापीठांत मान्यता पावले आहे. प्रा. जोसेफ एम्. कितागावा ( Kitagawa ) (शिकागो) यांनी अलीकडच्या एका निबंधात ' धर्माच्या इतिहासाच्या क्षेत्राचे स्वरूप आणि कार्यक्रम [अभ्यास / अभ्यासपद्धती ][१] यांचे वर्णन केले आहे. त्यांनी असे दाखविले आहे की ' धर्माच्या इतिहासाला ' पूर्वी ' तुलनात्मक धर्म ' असे संबोधिले जाई. शिकागो विद्यापीठातील तुलनात्मक धर्मविभाग हा देववाद–विभागाच्या ( Dept. of Divinity) घनिष्ठ सहयोगाने कार्य करतो. हॅस्केल व्याख्यानमालेच्या प्रतिष्ठापनेमुळे हा संप्रदाय बळकट झाला असून डी. बी. मॅकडोनाल्ड ( हार्टफर्ड सेमिनरी ), ए. व्ही. विल्यम्स जॅक्सन ( कोलंबिया ), मॉरिस ब्लूमफील्ड ( जॉन हॉप्किन्स ), कार्ल बेझॉल्ड

( हायडेलबर्ग ), [सर्वपल्ली] राधाकृष्णन् (कलकत्ता), एच्. ए. आर्. गिब (ऑक्स्फर्ड) आणि लुई मॅस्सिग्नॉन ( पॅरिस ) अशांसारख्या मान्यवर विद्वानांच्या नावांमुळे ही पंडिती परंपरा उभारली गेली आहे.

या विद्याशाखेचे स्वरूप कितागावा पुढे स्पष्ट करतात. ते म्हणतात :

धर्माचा इतिहास किंवा Religions wissenschaft या विषयाची धर्माच्या अभ्यासाबाबत मक्तेदारी असत नाही हे उघडच आहे. ईश्वरशास्त्र व तत्त्वज्ञान यांच्यासारख्या प्रमाणपर ( normative ) विद्याशाखांचा आणि समाजशास्त्र, मानवशास्त्र व अन्य वर्णनपर ( descriptive ) विद्याशाखांचा धर्मांच्या व धार्मिक घटनांच्या विविध अंगाशी संबध असतो. त्याबरोबरच धर्माचा इतिहास ही इस्लाम, खिरस्ती धर्म, बौद्ध धर्म, हिंदु धर्म आणि आदिम धर्म यांच्या इतिहासांच्या परस्परसंबंध अभ्यासाला किंवा विविध धर्मांचे सिद्धांत, आचार आणि धार्मिक संस्था यांच्या तौलनिक अभ्यासाला दिलेली समुच्चयात्मक संज्ञा नाही. थोडक्यात, तिचा जरी प्रमाणपर व वर्णनपर या दोन्ही शाखांशी संबंध असला तरी धर्माचा इतिहास म्हणजे केवळ प्रमाणपर वा केवळ वर्णनपर विद्याशाखा नाही."

पुढे असेच एक महत्वाचे विधान आढळते : धर्माचे उगम, वंशाच्या जीवन-विकासात धर्माचे कार्य. एकेका धर्माचा विकास, महान धर्मांच्या मूलतत्त्वांची तुलना आणि वास्तवकार्याच्या दृष्टीने धर्माचे महत्त्व या गोष्टींच्या अभ्यासाशी तौलनिक धर्म-विभागाचे कार्य संबंधित असते. धर्मशास्त्राच्या विविध टप्प्यांच्या संदर्भात विचारांच्या इतिहासाला वेळ दिला जातो."

इस्लामच्या खऱ्या मूल्यमापनासाठी या प्रकारच्या प्रशिक्षणाची व अभ्यासाची पार्श्वभूमी असायला पाहिजे. ईश्वरशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या आपल्या विद्यार्थ्यांसाठी ही उत्तम सुरुवात ठरेल. अल्-अझर आणि देवबंद संस्थामध्ये शिकून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना अशा अभ्यासांचा खूप उपयोग होईल.

२. **सेमिटिक धर्म** : या पायाभूत अभ्यासानंतर मूसाच्या आगमनापूर्वीच्या सेमिटिक धर्मांचे काही ज्ञान आपण मिळविलेच पाहिजे. आणि अशा अभ्यासासाठी

रॉबर्टसन स्मिथच्या ' रिलिजन ऑफ द सीमाइटस् ' पासून आरंभ केला पाहिजे. नंतर यहुदी धर्म, ख्रिस्ती धर्म व इस्लाम यांचा ऐतिहासिक अभ्यास करावा. या तीन धर्मातील साधर्म्य इतके विविध व इतके मूलभूत आहे की ' सेमिटिक धर्माचे तौलनिक शास्त्र ' अशी स्वतंत्र विद्याशाखा सहजच निर्माण करता येईल. अशा एकत्रित व तौलनिक अभ्यासाची आज फारच गरज निर्माण झाली आहे. इस्लामचे उत्तम ज्ञान असलेले ख्रिस्तीधर्माचे विद्वान्, ख्रिस्ती धर्माशी वा यहुदी धर्माशी परिचित असलेले इस्लामचे विद्वान आणि ख्रिस्ती धर्म वा इस्लाम यापैकी एकावर प्रभुत्व मिळवलेले यहुदी धर्माचे विद्वान् अशी मंडळी आहेत; आणि त्या त्या संबंधित भाषाही त्यांनी अवगत करून घेतल्या आहेत. परंतु इस्लाम, ख्रिस्ती धर्म आणि यहुदी धर्म या परस्परांशी निकट संबंध असलेल्या अशा धर्मश्रद्धा आहेत अशा जाणिवेने या तिन्ही धर्मांच्या तत्त्वांशी, इतिहासाशी व नंतरच्या घडामोडींशी सारखाच परिचय असलेले, असलेच तर, फारच थोडे विद्वान् आहेत. धार्मिक आदर्शांमध्ये झालेला हा संकर ही या अभ्यासाची एक खास बाजू असेल. इस्माइली खोजा हे इस्लाम व हिंदू धर्म यांच्या संकरातून झाले आहेत. नोझाइरी लोकांनी ख्रिस्ती धर्मातल्याच ' त्रयी ' चा (Trinity)– स्वीकार करून त्याचे इस्लामच्या एका प्रकारावर कलम केले आहे. मुस्लिम व यहूदी यांच्यातही परस्पराच्या ( Counterparts च्या ) – प्रभावाखाली आलेले असे काही संप्रदाय निश्चितच असले पाहिजेत की ज्यांचा शास्त्रीय व वस्तुनिष्ठ वृत्तीने असा अभ्यास केला गेला तर कुराण आणि प्रेषिताचे जीवन अधिक स्पष्टपणे कळू शकेल.

३. **सेमिटिक भाषांचे तौलनिक भाषाशास्त्र** : आता आपण भाषेकडे व तिच्या काटेकोर आकलनाकडे वळू. अरबी भाषेचा अभ्यास तिच्या भाषाशास्त्रीय संबंधाच्या संदर्भात केला पाहिजे. अरबी, हिब्रू, अॅरमेइक, सिरियॅक, इथिओपिक वगैरे भाषांचा अंतर्भाव सेमिटिक भाषा या भाषाशास्त्रीय समूहात होतो हे स्पष्ट लक्षात घेतले पाहिजे. अरबी भाषेत नैपुण्य मिळवायचे असेल तर, आधी या गटातील अन्य भाषांशी थोडीफार तोंडओळख असणे तसेच सेमिटिक भाषांच्या तौलनिक व्याकरणाचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे. मध्ययुगीन अरबी कोशकर्त्यांच्या चुकांमुळे व तर्कांमुळे आपली दिशाभूल होऊ नये यासाठी नोअेल्डेक (Noeldekhe), ब्राकल्मॅन ( Brocklemann ) व इतर जर्मन प्राच्यविद्याविशारदांचे ह्या विषयांवरचे ग्रंथ काळजीपूर्वक अभ्यासावे लागतील. काही परिचित उदाहरणे द्यायची झाल्यास एस्. फ्रेंकेल ( S. Fraenkel ) कृत Die aramaischen Fremdwoerter in Arabischen ( लायडन ( Leiden, १८८६ ), किंवा अे. जेफरी ( A Jeffery ) च्या फॉरिन व्हॉकॅबूलरी ऑफ दि कुरआन ( बडोदा, १९३८ ) या प्रमाण ग्रंथांकडे ओझरती दृष्टी टाकली तरी युरोपीय भाषाशास्त्रज्ञांनी गेल्या दोन शतकात केवढी मजल मारली आहे हे लक्षात येऊ शकेल. उदाहरणार्थ, पारोका, म्हणजे मुक्तिदाता, ( सोडवणूक करणारा ) या

सरिॲक शब्दापासून फारूक शब्द आलेला आहे उमर हा ख्रिस्ती लोकांना मुसल्मानांच्या जुलुमातून सोडवणारा ' मुक्तिदाता ' म्हणवला गेला होता, हे लक्षात आल्यावर फारूकची व्युत्पत्ती फरक ( अंतर दाखविणे ) या मूळ शब्दापासुन झालेली आहे असे आपण मानून चालणार नाही. सिरिॲक भाषा वापरणाऱ्या ख्रिस्त्यांनी हा किताब एका बखरीस दिलेला होता. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

४. **कायद्याचे धर्मापासून अलगीकरण** : इस्लाममधील नागरी कायद्यांचे नैतिक किंवा धार्मिक कायद्यापासून अलगीकरण तातडीने केले जाणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट म्हणजे सत्यवृत्ती, वैवाहिक संबंधातील पावित्र्य, सचोटी इत्यादी सार्वत्रिक नीतिनियम, आणि डुकरांच्या मांसाचे भक्षण व मद्यपान यावर बंदी यासारखे विशिष्ट नीतिनियम यांच्यात फरक केला पाहिजे. पहिल्या प्रकारच्या नीतिनियमांचा सर्वच धर्मांनी पुरस्कार केला आहे, तर दुसऱ्या प्रकारच्या नव्हे. कोणत्या गोष्टींना महत्त्व आहे व कोणत्या गोष्टींना नाही हे अशा बाबींवरून स्पष्ट होते.

आणि नंतर आपण कायद्याचा विचार करावा. धार्मिक तत्त्वे व सिद्धांत यांना कायद्याच्या नियमांपासून व तत्त्वांपासून तर्कदृष्टया अलग करणे हे आपले पहिले कर्तव्य आहे. माणसाची मूलभूत ( आंतरिक ) श्रद्धा ही त्याच्या बाह्य नियमपालनापासून निराळी असते; नीतिनियमांचा संबंध सद्सद्विवेकबुद्धीशी असतो, तर विधिनियमांची ( कायद्याची ) अंमलबजावणी राज्यसत्तेमार्फतच केली जाऊ शकते. नैतिक वर्तनाचे आदर्श ( horms ) हे व्यक्तिनिष्ठ असतात, विधिनियम ( कायदे ) वस्तुनिष्ठ असतात. चित्तशक्तीचे आंतरिक जीवन, ' पवित्रतेची कल्पना ' ही काही मर्यादेपर्यंत सामाजिक वर्तनाच्या बाह्य प्रकाराहून वेगळी केली गेली पाहिजे. हे अलगीकरण सोपे नाही, कदाचित् ते इस्लामविरोधीसुद्धा समजले जाऊ शकेल. पण हे तत्त्व मान्य केले तरच शरीअच्या पुनर्विचाराचा प्रयत्न सुरू होऊ शकतो.

म्हणून, कृतीच्या वैधतेचे ( Legality of Action ) नवे प्रवर्ग ( Categories ) निर्धारित केले पाहिजेत. आपल्यासमोर शरीआची अभिजात मूल्ये ( **अल्-अह्कामलखम्सा** ) आहेत ती अशी -- **फर्ज** ( आवश्यक कर्तव्य ), **मंदूब** ( शिफारसवजा ), **मुबाह** ( मोकळीक वजा ), **मक्रूह** ( आक्षेपार्ह ), **हराम** (निषिद्ध) ; यात आणखी काहींची भर घातली पाहिजे. ती म्हणजे ज्या कृती शरीआच्या कक्षेबाहेर आहेत, आणि तरीही ज्या विशिष्ट परिस्थितीत नागरी न्यायालयाच्या कायद्यानुसार पूर्णपणे कायदेशीर ठरतात. उदाहरणार्थ, तुर्कस्थानात लागू करण्यात आलेला नागरी कायदा, विवाह आणि घटस्फोटाविषयीचा नागरी कायदा, कंपन्यांविषयीचा कायदा, विमा-विषयक कायदा, हवाईपरिवहन-विषयक कायदा, खरेदी-विक्री विषयक करारनामे,

व्याजाची देवाण–घेवाण ज्यात होते असे आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार, सरकारी कर्जे आणि तत्सम बाबी. देशातील न्यायालयांमार्फत व विशेष न्यायाधिकरणांमार्फत राबविल्या जाणाऱ्या आयकर वा महसूल वा औद्योगिक तंटे अशा प्रकरणांविषयीच्या कायद्यांना प्राप्त होणाऱ्या अधिमान्यतेकडे पाहण्याचा मुसलमानांचा दृष्टिकोण काहीसा निराळा असू शकेल. तरीही धर्मनिरपेक्ष कायद्याला तत्त्वतः मान्यता दिली गेली पाहिजे. यहुदी धर्मामध्ये हे झाले आहे; रब्बी इग्नाज मेंबोम म्हणतो की, 'आम्ही 'तोराहचा त्याग केला नाही पण पाश्चात्य सभ्यता ( Civilization ) स्वीकारलेल्या देशांचे आम्ही नागरिक बनलो, त्याक्षणी आमच्या जीवनांमध्ये असलेले तोराहाचे कार्य, दिवाणी आणि फौजदारी कायद्यांच्या बाबतीत संपुष्टात आले.' [११]

इस्लामी देशाच्या राज्यघटनेवर अशा उदारमतवादी अर्थबोधनाचा परिणाम घडू शकेल. इस्लाम मतानुसार परमेश्वर हा प्रत्येक गोष्टीचा स्वामी आहे; राज्यामध्ये खरा सार्वभौम तोच आहे. आधुनिक जगात असा सिद्धांत अव्यवहार्य ठरेल. कोणत्याही देशातील लोक हेच आपल्या भूभागापुरते सार्वभौम होत, हे अनेक आधुनिक लोकशाही राज्यघटनांनी निर्धारित केलेले तत्त्वच व्यवहार्य ठरेल. नागरी कायद्याच्या शृंखलांमधून धर्माला जर क्रमशः मुक्त केले आणि कायद्याला ( क़ानूनला ) मुक्तपणे वाढू व विकास पावू दिले तर मुसलमान समाजाची भरधाव प्रगती झाल्यावाचून राहणार नाही.

ईश्वराबद्दल भक्ती, आत्म्याची विशुद्धता, जीवनात व्यवस्थितपणा या गोष्टींवर धर्माने भर द्यावा, हे करा ते करू नका अशा विशिष्ट बारीकसारीक गोष्टींमध्ये त्याने शिरू नये. इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा औदार्य, विनम्रता, भातृभाव, धारिष्टय व पुरुषार्थ हे इस्लामप्रणित सद्‌गुण मुसलमानांच्या प्राचीन इतिहासातील दाखले देऊन शिकवले गेले पाहिजेत. शिवाय, आधुनिक जगातील नैतिक व दार्शनिक विचारवंतांच्या शिकवणुकीच्या आधारे इस्लामच्या नीतिशास्त्राला व नीतिमत्तेला बळकटी आणली पाहिजे. बार्थ, टिलिच, किर्कगार्ड आणि राधाकृष्णन यांचे विचार आपण मोकळ्या मनाने पाहिले पाहिजेत. 'ज्यात परमेश्वराचा जिवंत शब्द बंदिस्त झाला आहे, आणि परंपरेला स्खलनातीत मूलस्त्रोत ठरविले गेले आहे,' अशा पुस्तकाचे स्वरूप आपण कुराणला देऊ नये. ' रब्बी लोक आपल्या सदसद्‌विवेकबुद्धीचे ऐकत नाहीत, ते कायद्याच्या पुस्तकांचा सल्ला घेतात. [१२] इस्लामचे धर्मोपदेशकही हेच करतात.

५. **शरीआ आणि कलाम ( ईश्वरशास्त्र ) यांची फेरतपासणी :** इस्लामच्या ईश्वरशास्त्राची फेरतपासणी सर्वांगांनी होणे आवश्यक आहे, आणि तिच्या सारभूत तत्त्वांची फेररचना व फेरमांडणी करण्यासाठी आधुनिक तत्त्वज्ञान, अध्यात्मविद्या, नीतिशास्त्र, मानसशास्त्र व तर्कशास्त्र यांचा उपयोग केला पाहिजे. इस्लामच्या पंडिती

( Scholastic ) ईश्वरशास्त्रास ( इल्मूल-कलाम ) सर्वांगांसह सुधारण्याचा मोठ्या प्रमाणावर प्रयत्न ग़ज़ालीच्या काळानंतर कधी झालाच नाही. युरोपीय विचारातील आधुनिक प्रवाह, लूथर आणि त्याच्यानंतरच्या प्रॉटेस्टंट विचारवंतांनी, तसेच सेंट थॉमस अक्वायनास आणि सुआरेझ पासून मॉरिटेन आणि बेर्देयेव्ह पर्यंतच्या विद्‌वज्जनांनी केलेली प्रगती; तसेच आधुनिक जगातील यहुदी आणि अन्य विचारवंत यांचे चिंतन या सगळ्या गोष्टींचा इस्लामी ईश्वरशास्त्रीय तत्त्वांच्या पुनर्रचनेसाठी व त्यांना बळकटी आणण्यासाठी तारतम्याने उपयोग केला पाहिजे.

६. **विश्वघटनाशास्त्र व शास्त्रीय तथ्यं यांचे पुनरर्थबोधन** : प्राचीन धर्मग्रंथ वा हदीस नैसर्गिक घटनांबद्दल वा शास्त्रीय तथ्यांबद्दल जिथे जिथे बोलतात तिथे त्यांचे धर्मतात्त्विक स्वरूप चिकित्सेला खुले असले पाहिजे. ज्यात मानवशास्त्र, जीवशास्त्र, पदार्थविज्ञान, गणित, रसायनशास्त्र व वैद्यकशास्त्र या सर्वांचा अंतर्भाव होतो, त्या आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीने त्या ग्रंथातील वचनांचे अर्थबोधन व स्वीकार, सुधारणा वा त्याग झाला पाहिजे. जग, काळ आणि विश्व यासंबंधीच्या संकल्पना कोपर्निकासच्या काळी होत्या, त्यापेक्षा आज आमूलाग्र बदलल्या आहेत. इस्लामने या बदलांची दखल घेतली पाहिजे, आणि शास्त्रीयदृष्टया धर्मात ज्या विसंगती असतील त्या दूर केल्या पाहिजेत.

उदाहरणार्थ, येशूच्या कुमारीपुत्रत्वावर किंवा स्वर्ग आणि नरक यांच्या कुराणातील वर्णनांवर [१४] फार भर द्यायची गरज नाही. त्याच्या शाब्दिक खरेपणावर भर देण्याची गरज नाही. त्यातील काव्यात्म सत्य हे मुख्य व सर्वात महत्त्वाचे आहे. रोज़ा पाळण्याचे आध्यात्मिक सौंदर्य व सामर्थ्य कडक नियम न घालून देताही तरुणांच्या मनांवर बिंबवता येईल. पूर्वेकडील सर्व अरब देशात रमज़ानच्या महिन्यात रात्रीच्या वेळी मेजवान्या, मित्रांच्या भेटी, संगीताच्या मैफिली, कामुक नृत्ये आणि वेळेची व पैशाची उधळपट्टी असे प्रकार होत असतात. यापेक्षा धर्माचरणात साधेपणा आणि लवचिकपणा आणणे हे नक्कीच इस्लामच्या भावाशयाशी अधिक सुसंगत ठरेल.

**दुय्यम तत्त्वे** : जेव्हा कुराणात किंवा शरीआमध्ये एखादा नियम सांगितलेला असतो तेव्हा तो विधिनियम (कायदा) आहे की नीतिनियम आहे हे ठरविणे आवश्यक असते. जर तो विधिनियम असेल, तर त्याची अमंलबजावणी राजसत्तेने करावी; जर नीतिनियम असेल तर राज्यसत्ता त्याची अमंलबजावणी करू शकत नाही. वर सांगितलेल्या तत्त्वांच्या आधारे एकदा की हे निश्चित झाले की **कुराणात अमुक एक स्पष्ट विधिनियम सांगितलेला** आहे, तर मग त्या प्रश्नाला महत्त्व प्राप्त होते. ईश्वरी कायद्याची अवज्ञा अशक्य आहे असे सांगितले जाते. पूर्ण आदर बाळगूनही येथे म्हणावेसे वाटते की, या विधानाची काळजीपूर्वक फेरतपासणी करणे आवश्यक आहे. मानवी वर्तनासंबंधीचा

एखादा मूलभूत नियम कुराणात घालून दिलेला असेल, किंवा चिरकालीन असे एखादे सत्य सांगितलेले नसून काळ आणि परिस्थिती यांनी सीमित केलेला एखादा विशिष्ट उपनियम त्यात सांगितलेला असेल, किंवा त्यात जे सांगितले असेल ते काव्याच्या, रूपकाच्या, मिथ्यकथांच्या वा आख्यायिकांच्या भाषेत सांगितलेले असेल.

> ( हे पैगंबरा ! ) तोच ( ३ शासन करणारा त्र [ ? ] ) होय कीं ज्यानें तुला हें पुस्तक प्रकट केलें; की त्यांत कांहीं वाक्यें ठाम ( अर्थाची व सुबोध ) ( मुहकमात ) आहेत ( व ) तींच पुस्तकाची मूलतत्त्वे होत. आणि कांहीं इतर मोघम ( दृष्टांतरूप कीं त्यांतून अनेक अर्थ निघतात ) ( मुत शाबिहात ) ( आहेत ).
>
> ( कुराण ३, ७ )

अशावेळी आपल्याला असे अनुमान काढता येईल की, हा प्रश्न अर्थ लावण्याचा आहे आणि कायदा हा बदलता येतो पण धर्म हा अधिक स्थायी असतो आणि तो बदलण्याची गरज नाही.

मद्यपाननिषेध किंवा सूकरमांसभक्षणनिषेध अशासारखा कुराणाचा एखादा स्पष्ट आदेश जर तपासणीसाठी घ्यायचा झाला तर आपल्याला एक विशिष्ट पद्धती अनुसरली पाहिजे. मी पुढील पद्धती सुचवतो :

१. **इस्लामपूर्वी नियम वा रूढी काय होती ? :** प्रेषिताने केलेल्या सुधारणांचे मूल्यमापन करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या सर्व पुराव्याची आधी योग्य ती छाननी करणे आवश्यक आहे. ह्या बाबतीत मुस्लिम लेखकांवर अवलंबून राहणे पुरेसे नाही. इस्लामपूर्व वाङ्मय, शिलालेख, भूर्जपत्रां ( papyri )-सकट सर्व दस्तऐवज सेमिटिक बोली हिब्रू, सिरियाक व ईथोपिक, ग्रीक, लॅटिन आणि इतर कोणतीही साधने यामधील पुरावा यांचाही विचार आपल्याला करावा लागेल. फक्त विसाव्या शतकांतील अभ्याससाधनांनीच ही तपासणी केली गेली पाहिजे.

२. **प्रेषिताने ती सुधारण्याचा प्रयत्न कसा केला ? :** वक्फसारखा एखादा सिद्धांत, खाद्यपेयें, नमाज व वजू (प्रक्षालन), रोजा आणि खैरात यासंबंधीचे नियम ह्यांचा उगम होण्यामागची नेमकी परिस्थिती काय होती हे पाहाणे उद्‌बोधक ठरेल. कालक्रमानुसार सेमिटिक अभ्यासपद्धतीच्या टीकासाधनांच्या ( apparatus criticus )-द्वारे कुराणातील आयतींचा खरा अन्वयार्थ नव्याने लावावा लागेल. प्राचीन विद्वानांची

व इमामांची अधिसत्ता अंतिम (किंवा शंका घेण्यासारखी नाही असे) मानून चालणार नाही.

३. या सुधारणेचे परिणाम काय झाले ? : स्त्रीविषयक परिस्थिती येथे उदाहरण म्हणून घेता येईल. इस्लामचा विवाहविषयक कायदा, काही महत्वाचे अपवाद वगळता, स्त्रियांना फायदेशीर आहे, तसाच वारसाहक्काविषयीचा कायदासुद्धा, मग इस्लामी देशात सर्वत्र स्त्रियांना स्थावर मालमत्तेवरचे हक्क रूढीने नाकारले गेले आहेत ते का ? भारत, इंडोनेशिया, ईजिप्त, पर्शिया व उत्तर आफ्रिका या सर्वच देशात ही स्थिती आहे. पण केवळ कुराणप्रणित हक्क स्त्रीला नाकारण्यात आले एवढेच नाही तर ती पुरुषापेक्षा गौण समजली जाऊन काही राजकीय हक्कांसाठीही अपात्र ठरवली गेली आहे; ही अधिकच अस्वस्थ करणारी बाब आहे. मुस्लिम देशात प्रवास केल्यास अशी दुःखकारक वस्तुस्थिती दिसून येते की स्त्री ही पुरुषाच्या हातातील खेळणे समजली जाते आणि ती जीवनसाथी, सहकारी किंवा सोबती क्वचित्‌च मानली जाते. विशिष्ट प्रथा गैरइस्लामी आहे किंवा इस्लामच्या भूमिकेच्या विरुद्ध आहे एवढे म्हणून या स्थितीकडे दुर्लक्ष करून भागणार नाही. वस्तुस्थितीला सामोरे जाण्याची, प्रश्नांचे मूळ गाठण्याची, कुराणाचे अन्याय्य अर्थ सोडून देण्याची व लोकांना पुनःशिक्षित करण्याची गरज आहे. 'पुरुष हे स्त्रियांवर सत्ताधारक होत, (त्यास) कारण (एक तर हें) कीं (मानवजातींत) परमेश्वराने कित्येकां (म्हणजे पुरुषां)–ना कित्येकां (म्हणजे स्त्रियां)–वर (मानसिक व शारीरिक बलांत श्रेष्ठत्व दिलें आहे.'[५] या कुराणातील आयतीचा संदर्भ केवळ स्थानिक आहे आणि त्याची अंमलबजावणी केवळ त्या विशिष्ट काळापुरती आहे हे लक्षात घेऊनच तिचा नव्याने अर्थ लावला पाहिजे. तिच्या व्यापक उपयोगाचा फेरविचार झाला पाहिजे; आणि मग तिचा असा अन्वय लावणे शक्य होईल की, तो केवळ प्रेषिताच्या काळात अरबस्तानात असलेल्या परिस्थितीपुरता मर्यादित असा सामाजिक वर्तनाचा नियम होता आणि आधुनिक जगाला तो लागू होऊ शकत नाही.

४. इस्लामी कायद्याच्या विविध संप्रदायात, नियमांची पुढल्या शतकां'मध्ये अंमलबजावणी कशी झाली आणि त्यांचे अर्थ कसे लावण्यात आले ? : उपरोल्लिखित दोन नियम परस्पराशी निगडित आहेत. तात्कालिक परिणाम काय झाले हे पाहण्यासाठी समकालीन साधनांची, विशेषतः स्वतंत्र व टीकात्मक वृत्तांतांची छाननी करावी लागेल आणि धर्मतत्त्वांचा ऐतिहासिक क्रमविकास कसा झाला हे तपासावे लागेल. पुढील शतकांमध्ये या आज्ञांचे पालन शब्दशः व आशयशः होत असे काय ? त्यांच्याविषयी गैरसमज झाला काय ? त्यात फेरबदल झाला काय ? किंवा ते विकृत झाले काय ? राजकीय वा व्यक्तिगत उद्देशांनी त्यांचा गैरवापर केला गेला काय ? असे काही प्रश्न निर्माण होतात.

५. व्यक्तिगत कायद्याबाबत सद्य:स्थिती कशी काय आहे ? आधुनिक विधिशास्त्रीय चिंतनाने निर्धारित केलेल्या सर्वोच्च प्रमाणांच्या दृष्टीने तो कितपत तोकडा पडतो ? सामाजिक न्यायासारख्या आधुनिक संकल्पनांच्या अनुषंगाने आणि सर्वसाधारण समाजाचा एक अविभाज्य घटक या नात्याने मुसलमान समाजाच्या सामाजिक कल्याणाला चालना देण्याच्या दृष्टीने या नियमांना टिकवून ठेवण्याचे, सुधारण्याचे वा रद्द करण्याचे कोणते मार्ग संभवतात ? हिंदुस्थानातील व्यक्तिगत कायद्याचा अन्वयार्थ लावण्याची ही पद्धती असून ईश्वरशास्त्रीय व नैतिक नियमांच्या बाबतीतही अशीच प्रक्रिया लागू करता येईल.

शरीअतच्या संपूर्ण तरतुदींचे असे चिकित्सक पद्धतीने परीक्षण केले तर धर्माच्या कर्मठ आणि स्थिर आकृतिबंधाच्या जोडीला नवा 'प्रॉटेस्टंट' इस्लाम अवतीर्ण होईल हे उघडच आहे. विसाव्या शतकातील जीवनस्थितीशी तो जुळणारा असेल, आणि भूतकाळाचे निर्जीव भाग कापून टाकून तो भवितव्याकडे अधिक आशावादी दृष्टीने पाहू शकेल. त्याला नाव कोणते द्यायचे याची चिंता करण्याचे आपल्याला कारण नाही, पण जर एखादे नाव द्यायचे असेल तर त्याला आपण 'उदारमतवादी इस्लाम' असे म्हणू या.

## ४ : निष्कर्ष

आधुनिक जगाने माणसाला दिलेली सर्वांत मोठी देणगी म्हणजे स्वातंत्र्य–विचारस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, कृतिस्वातंत्र्य. हे स्वातंत्र्य कायद्याने मर्यादित केले आहे. प्रत्येक माणसाचे स्वातंत्र्य हे प्रत्येक दुसऱ्या माणसाच्या तेवढ्याच स्वातंत्र्याने मर्यादित असल्याचे कायदा सांगतो. त्यामुळे आपण इतरांची निंदा करू शकत नाही, ती बदनामी ठरेल. आणि राज्यसत्तेचीही आपण नालस्ती करू शकत नाही; कारण तो राजद्रोह ठरेल. टीका ही बदनामी व राजद्रोह यांच्यापेक्षा वेगळी आहे. योग्य टीका आणि बदनामी वा राजद्रोह ठरू शकणारे बिनबुडाचे आरोप ह्यांच्या मर्यादा न्यायालयांनी काटेकोरपणाने आखून दिलेल्या आहेत. पण एवढी बाब वगळता आधुनिक युगाचा भर विचार, उच्चार आणि आचार यांच्या स्वातंत्र्यावर आहे.

धार्मिक सिद्धांताच्या संदर्भात इस्लामची काय भूमिका आहे ? अन्वयार्थाची दारे तो बंद करतो.[१९] त्याच्या मते, विधिज्ञांचे आणि विधिसल्लागारांचे काही प्रकारात वर्गीकरण करता येते; आणि विचारस्वातंत्र्याला मनाई आहे. अलीकडच्या भारतीय लेखकांमध्ये इकबाल आणि अब्दुर् रहीम यांनी या सिद्धांताविरुद्ध उठाव केला. आणि तरीही उलेमाचा क्रोध ओढवून घ्यायची कोणाची हिंमत होत नाही. सुमारे दहा वर्षांपूर्वी पाकिस्तानात काही गोंधळ झाले आणि चौकशी करण्यात आली. पाकिस्तानच्या

सरन्यायाधीशांनी अनेक उलेमांना इस्लामसंबंधी व इस्लामच्या सारतत्त्वासंबंधी प्रश्न विचारले; आणि सरन्यायाधीशांच्या विश्लेषणानुसार काही उलेमा, त्यांच्या सहउलेमांच्याच मते, पाखंडी होते." आपल्या धर्मात विचारांचे प्रस्तरीकरण ( fossilization ) ह्या मर्यादेपर्यंत झाले आहे. आधुनिक विचार व जीवन यांच्याशी जुळवून घेण्यासाठी जो लवचिकपणा लागतो तोच इस्लाम आपल्या कर्मठ अन्वयार्थामुळे हरवून बसला आहे. अलीकडच्या एका लेखात हुमायून कबीर म्हणतात :

आधुनिक काळातल्या परिस्थितीची गुंतागुंत इतकी गोंधळवून टाकणारी आहे की, तिला तोंड देण्यासाठी ( तिच्यात टिकाव धरण्यासाठी ) स्वभावतः विवेकनिष्ठ आणि आशयदृष्ट्या विश्वव्यापी अशा श्रद्धेची आवश्यकता आहे. जे आस्तिक आहेत त्यांना ईश्वराच्या ठिकाणी विश्वात्मक अर्थाचे असे एक नैसर्गिक केंद्र आढळते. जे नास्तिक आहेत त्यांनाही मानवी प्रतिष्ठेच्या संकल्पनेत एक ( मानवी जीवनाचे ) प्रयोजन आढळू शकेल. सत्य, सौंदर्य व सद्भाव ही मूलतत्त्वे व्यक्तिगत अस्मितेपेक्षा अधिक व्यापक आणि अधिक चिरस्थायी आहेत. त्यांच्याशी एकरूप झाल्याने माणसाला धारिष्ट्याची आणि त्यागाची कृत्ये करण्याची प्रेरणा मिळते. बाह्य जगाविषयीचे आमचे ज्ञान सतत विस्तारत आहे. याला आपल्या स्वतःसंबंधीच्या वाढत्या ज्ञानाची जोड मिळाली पाहिजे. ' ज्ञान म्हणजेच शक्ती ' हे सॉक्रेटिसाचे वचन पूर्वी कधीही नव्हते एवढे आज सत्य ठरले आहे. पुढे ते म्हणतात : दुर्भिक्ष आणि दैन्य यांचे प्रश्न सोडवण्याची गुरुकिल्ली माणसाच्या हातात वैज्ञानिक प्रगतीने दिली आहे. भूक आणि रोगराई यांच्यावर विजय मिळविणे आज आपल्या हातचे झाले आहे. मानवी समाजाला आणि खरोखर, भौतिक जगाला उध्वस्त करणे हेही तितकेच आपल्या हातचे झाले आहे. आपले ज्ञान विनाशासाठी वापरले जाणार, की सृजनाच्या कार्यासाठी हे आपल्याला कोणती श्रद्धा प्रेरित करते यावर अवलंबून राहाणार आहे. यापुढे आपली धर्मश्रद्धा साक्षात्कार किंवा गूढवाद ह्यावर आधारित असून चालणार नाही, तर ती ' स्व 'च्या मर्यादा ओलांडून पलीकडे जायला पाहिजे. बाह्य जग आणि मानवी व्यक्तिमत्त्व यांच्या स्वरूपाचे विवेकाधिष्ठित आकलन, विविध दृष्टिकोणांविषयी सहिष्णुता आणि समजुतदारपणा व सहृदयता यांच्याद्वारे इतर माणसांशी

कल्पनानिष्ठ ( imaginative ) तादात्म्य हे ह्या नव्या श्रद्धेचे आवश्यक घटक आहेत. आजच्या त्रस्त व गुंतागुंतीच्या जगात आपल्या आशा त्यामुळेच टिकून राहू शकतील.[१८]

मुक्त विचाराला इस्लामने किती गोठवून टाकले आहे याची लक्षणीय साक्ष रब्बी इग्नाझ मेबौम ह्यांच्या ज्यूईश मिशन ह्या ग्रंथात मिळते.[१९] ते एक पुरोगामी यहुदी आहेत, आणि आपल्या भूमिकेचे समर्थन करताना ते म्हणतात की, यहुद्यांनी तोराहला सोडले नाही, पण दिवाणी व फौजदारी कायद्यांच्या बाबतीत आधुनिक यहुद्यांच्या जीवनातला तोराहचा कार्यभाग संपुष्टात आला आहे. ''प्रकटने' हे इस्लाममध्ये कायदा मानले गेले आहे, यहुदी धर्मामध्ये नाही.' जेव्हा आधुनिक रब्बी म्हणतात की एकही कायदा मोडला जाऊ शकत नाही तेव्हा त्यांची ती भूमिका इस्लामच्या उलेमाच्या भूमिकेसारखी असते, रब्बींची--म्हणजे यहुदी धर्माच्या धर्मगुरूंची--ती नसते. इस्लामने रानटी लोकांना विवेकनिष्ठ सभ्यता शिकवली असे सांगून ते पुढे म्हणतात, 'पण हे करण्याची किंमत त्याने वसूल केली आहे. त्यात कोणालाही स्वातंत्र्य नाही. इस्लाम हा धार्मिक सर्वंकषवाद ( totalitarianism ) आहे.' आणि स्वातंत्र्याविना खऱ्या यहुदी धर्माची भरभराट होऊच शकत नाही.

इथे हे सांगणे आवश्यक आहे की, प्रत्येक गोष्टीबाबत, प्रत्येक धर्मसिद्धांताबाबत व प्रत्येक धर्मतत्त्वाबाबत विचारस्वातंत्र्य असल्यावाचून खऱ्या इस्लामचा उत्कर्ष होऊच शकणार नाही. जसे लूथरने ख्रिस्ती धर्मातील पोथीनिष्ठ तत्त्वांचे ( dogma ) अडथळे मोडून काढले आणि व्यक्तिगत अर्थबोधनाच्या हक्काचे प्रतिपादन केले, पुरोगामी यहुद्यांनी यहुदी लोकांना सुधारलेला यहुदी धर्म मिळवून देण्याचा प्रयत्न केला तशीच मान्यता उदारमतवादी इस्लामलाही मिळाली पाहिजे आणि सनातनी लोकांनी त्याला जागा दिली पाहिजे. जर कर्मठपणाबद्दल आम्हाला आदरभाव असेल तर मग श्रद्धेच्या उदारमतवादी पुनरर्थबोधनाला पाखंडीपणा म्हणजे कुफ्र असे का समजावे ? जो कुणी आपण मुसलमान असल्याचे मनापासून ठामपणे सांगत असेल तो, उलेमा काहीही म्हणत असले तरी, मुसलमान आहे हे ठामपणे प्रतिपादले पाहिजे. त्याच्या श्रद्धेबद्दल शंका घेण्याचा व त्याला बहिष्कृत करण्याचा कोणालाही अधिकार नाही. तक्फीरचा फत्वा हे कालचे भयंकर शस्त्र हास्यास्पद आणि कालबाह्य ठरले आहे. भरकटलेल्या आत्म्याला ताकीद देणे वा सुधारणे त्याला शक्य नसते, ते आपल्या कार्याविरुद्ध उलटते. श्रद्धा ही सद्सद्विवेकाची ( Conscience ) बाब आहे, आणि श्रद्धेच्या बाबतीत सद्सद्विवेकाचे स्वातंत्र्य मान्य करणारे हे युग आहे. अमूक माणसाची मते चुकीची आहेत असे फार तर योग्य त्या चिकित्सेअती म्हणता येईल, पण 'तो काफिर आहे' असे मात्र म्हणता यावयाचे नाही.

जवाहरलाल नेहरू म्हणतात :

प्राचीन काळापासून महान धर्म चालत आलेले आहेत आणि त्यांचा मानव समाजावर फार मोठा प्रभाव पडला आहे. तरीही संपूर्ण आदर बाळगून आणि कोणत्याही व्यक्तीबद्दल असद्भाव मनात न बाळगता मला असे म्हणावेसे वाटते की त्या धर्मांचा प्रभाव ज्या प्रमाणात माणसाची मने अवरूद्ध, पोथीनिष्ठ व धर्मांध करण्याला कारण झाला त्या प्रमाणात तो प्रभाव अनिष्ट ठरला. धर्म जे सांगतात ते भलेही उत्तम असेल, पण अंतिम शब्द त्यांनी सांगून टाकला आहे असा दावा जेव्हा केला जातो तेव्हा समाज गतिशून्य होतो.[२०]

इतर अनेकांप्रमाणेच माझीही अशी खात्री झाली आहे की, इस्लामची गतिशीलता कधीच नष्ट झाली आहे. लोकांना योग्य त्या दिशेने घेऊन जाण्याचे कार्य आज तो करू शकत नाही. आणि त्यामुळे त्याच्या सिद्धांतांचे नवे अर्थ करणे ही एक तातडीची गरज आहे. मुसलमानांनी योग्य त्या वृत्तीने या आव्हानाचा स्वीकार केला पाहिजे.

धार्मिक विधी आज निष्प्राण कर्मकांडे ठरली आहेत; नमाज आणि रोजा या पारंपरिक धर्मकृत्यांमधून बहुसंख्य सत्प्रवृत्त मुसलमानांना आज दिलासा वा सांत्वन लाभेनासे झाले आहे; आधुनिक काळाला धरून धर्मावर चांगली पुस्तके लिहिली जात नाहीत; आर्थिक आणि नैतिक बाबतीत स्त्रियांना वाईट रीतीने वागवले जाते. बऱ्याच सुधारलेल्या देशांमध्येसुद्धा त्यांचे राजकीय हक्क प्रतिगामी उलेमांच्या फतव्यांनुसार नाकारले जातात; ज्या देशांमध्ये मुसलमान बहुसंख्य आहेत तिथेही ते बहुधा आर्थिकदृष्ट्या दरिद्री, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले, आध्यात्मिकदृष्ट्या कंगाल ( दिवाळखोर ) असलेले दिसतात आणि 'संरक्षणे' मागण्यावरच भर देतात; प्राचीन इस्लामचे हितकारी कायदे बऱ्याच बाबतीत काळाच्या मागे पडलेले आढळतात; इस्लामी धर्मशासन ( theocracy ) आधुनिक राज्यात रुजवण्याचा किंवा जीवनाला प्राचीन इस्लामानुसार घाट देण्याचा कोणताही निरर्थक प्रयत्न अयशस्वी होणे अपरिहार्य आहे हे लक्षात घेतलेच पाहिजे.

शेवटी सांगणे एकच की, आत्मपरीक्षणाची वेळ येऊन ठेपली आहे. इस्लामचे पुनरर्थबोधन झालेच पाहिजे, नाहीतर त्याचे पारंपरिक स्वरूप इतके कालबाह्य होऊन जाईल की, पुन्हा ते पूर्वस्थितीवर आणणे दुरापास्त होऊन बसेल.

काही वर्षांपूर्वी इलस्ट्रेटेड लंडन न्यूजच्या नाताळ विशेषांकात येशूच्या जन्माचा एक संवेदनापूर्ण वृत्तांत दिलेला होता :

तरीही या मोसमात आपल्याला या गोष्टीचे स्मरण दिले जाते की, जवळजवळ दोन हजार वर्षांपूर्वी, आपल्या काळापेक्षाही अधिक क्रूर असलेल्या काळात एक यहुदी स्त्री एका गजबजलेल्या खानावळीच्या तबेल्यात आपल्या नवऱ्यासह आश्रयाला गेली असताना तिने येशू नावाच्या मुलास जन्म दिला. त्याच्या जीवनाने व शिकवणुकीने इतिहासाचा क्रम बदलला आणि त्याला सर्वाधिक ओळखणारे आणि त्यानंतर ज्यांना आपल्याला प्रत्यय मिळाला आहे असे वाटले असे दुसरेही अगणित लोक त्याला दैवी मानू लागले. ' ईश्वरी शब्दाला मानवी रूप आले आणि ते आमच्यात राहिले, आम्हाला त्याचे वैभव, कृपा आणि सत्य यांनी परिपूर्ण असलेल्या परमेश्वराने ज्यास जन्मास घातले त्या पित्याच्या एकमेव पुत्राचे वैभव, दृश्यमान झाले. ' त्याच्याकडे दैवी म्हणून पाहा वा मानवी म्हणून, त्याच्या जीवनातले व मरणातले नोंदवले गेलेले प्रत्येक कृत्य त्याच्या शिकवणुकीला अधोरेखित करते — ती त्याची सगळी शिकवण अशी होती की, केवळ प्रेमाने व आत्मत्यागानेच माणसांना या जगात सुख आणि दुसऱ्या कोणत्या तरी जगात चिरंतन जीवन लाभू शकेल. अंशतः ही शिकवण प्राचीन हिब्रूंच्या तत्त्वज्ञानावर व सखोल धर्मावर आधारित होती, पण तीत बराच मोठा भाग पूर्णपणे नवीन होता, आणि तो येशूचा स्वतःचा होता. प्रत्येक पौरस्त्य राज्यात आणि नव्या भूमध्यसामुद्रिक साम्राज्यात प्रचलित असलेल्या श्रद्धांच्या आणि आचरणाच्या विरुद्ध जाणारी अशी ही शिकवणूक होती. भूमध्यसामुद्रिक साम्राज्याचे प्रयत्न त्यावेळी सबंध जगावर सत्ता गाजवण्याचे होते, आणि येशू ज्या जगात जन्मला ते सगळे त्या साम्राजाच्या अधिपत्याखाली होते. ही शिकवणूक दिल्याबद्दल तिच्या एकाकी प्रेषिताला सुळावर घोर अपराध्याचे यातनामय व लज्जास्पद मरण पत्करावे लागले आणि क्रौर्य, असूया, आकस आणि विपर्यास यांच्या शक्तिप्रवाहांना संपूर्ण विजय लाभल्याचे वरकरणी दिसले, आणि कॅल्व्हरी नामक ठिकाणी जेव्हा त्याला सुळावर चढवले गेले तेव्हा, आपल्या जीवन–संदेशाशी एकनिष्ठ राहून येशू,